


सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

आसमंतसह

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | रविवार, १२ जुलै २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २२४ | पाने १२+८ | किंमत रु. ८/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



आम्ही आक्रमक नाही. आम्ही आत्मविश्वासू आहोत. आम्ही सत्य बोलतो. दृढता आणि विश्वासाने बाजू मांडतो. आम्हाला आत्मविश्वासाने राहावे लागते, ज्यायोगे आमचा कोणी अपमान करणार नाही. हिंदू विचार मानवतावादी आहे.

**-स्व. प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**

रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

## महत्त्वाचे

### लखनौमध्ये विमानाला धडकला पक्षी

**लखनौ :** येथे शनिवारी सकाळी फ्लाय दुबई विमानाचे आपत्कालीन लॅण्डिंग करण्यात आले. चौधरी चरणसिंह आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ लॅण्डिंग करताना पक्ष्याने विमानाला धडक दिली. वैमानिकाने प्रसंगावधान राखून विमान सुरक्षितरीत्या उतरवले. विमानातील सर्व १६३ प्रवासी आणि चालक दलाचे सदस्य सुरक्षित आहेत. दुबईहून लखनौला येणारे विमान सकाळी लखनौला पोहोचणार होते. खराब हवामानामुळे विमाना सुमारे ३८ मिनिटे उशिर झाला.

# भारत-न्यूझीलंड व्यापार करार मैलाचा दगड

### पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन | द्विपक्षीय व्यापार २०३० पर्यंत दुप्पट | भारत-प्रशांत क्षेत्रात सहकार्यावर भर

**ऑकलंड, ११ जुलै**

भारत-न्यूझीलंड यांच्यात दशकांच्या प्रयत्नानंतर झालेला मुक्त व्यापार करार आता प्रत्यक्षात येत आहे. द्विपक्षीय संबंधाला बळकटी आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यासाठी हा करार मैलाचा दगड ठरेल. हा करार अंतिम केल्याबद्दल पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांचे मी आभार मानतो. व्यापार, संरक्षण, सागरी सुरक्षा, पर्यटन, संस्कृती, क्रीडा, कृषी तंत्रज्ञान आणि भारत-प्रशांत क्षेत्रातील सहकार्यासंदर्भात झालेल्या द्विपक्षीय कराराचा फायदा दोन्ही देशांना होईल. २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करून सात अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे आम्ही निश्चित केल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

न्यूझीलंडचे पंतप्रधान लक्सन आणि पंतप्रधान मोदी यांच्यात शनिवारी बैठक झाली, त्यानंतर दोन्ही देशांत विविध करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. यात व्यापार, संरक्षण, सागरी सुरक्षा,



पर्यटन, संस्कृती, क्रीडा, कृषी तंत्रज्ञान, भारत-प्रशांत क्षेत्रातील सहकार्य यांचा समावेश आहे. बैठकीनंतर संयुक्त संबोधनात मोदी यांनी म्हटले की, भारतीय अर्थव्यवस्था जगात सर्वांत वेगाने वाढत आहे. आम्ही फिनटेकमध्ये जागतिक स्तरावर अग्रणी आहोत. गुंतवणूकदारांसाठी भारत जगात सर्वांत संधीचा देश आहे. त्यामळे न्यूझीलंडच्या गुंतवणूकदारांना आणि व्यावसायिक संस्थांनी पायाभूत सुविधा, नागरी विमान वाहतूक, लॉजिस्टिक्स, स्वच्छ ऊर्जा, शहरी गतिशीलता, जल व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि डिजिटल अर्थव्यवस्था या क्षेत्रांमध्ये भारतासोबत भागीदारी करावी. न्यूझीलंडसोबत झालेला मुक्त व्यापार करार आता प्रत्यक्षात येणार असून, ७५ टक्के उत्पादने शुल्कमुक्त असेल. या कराराचा फायदा दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्था आणि व्यापाराला चालना मिळण्यासाठी होईल.

**भारतावर जगाचा विश्वास**

लोकशाही मूल्यांवरील दृढ विश्वासामुळे भारतावर जगाचा विश्वास वाढला आहे. भारत आणि न्यूझीलंड नैसर्गिक भागीदार आहे. भारत-प्रशांत प्रदेशातील दोन सागरी राष्ट्रे म्हणून त्यांचे सहकार्य या प्रदेशाला नवीन बळ देते. मला विश्वास आहे की या दौऱ्यामुळे आमचे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होतील आणि जागतिक शांतता, स्थिरता आणि सुरक्षेसाठी आमचे संयुक्त योगदान वाढेल.

(वृत्तसंस्था)

# भूकंपाने पुन्हा हादरला मराठवाडा

**हिंगोली, ११ जुलै**

मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्याला पुन्हा एकदा भूकंपाचा जोरदार हादरा बसला आहे. शनिवारी सकाळी ११ वाजून २६ मिनिटांच्या सुमारास हिंगोली शहरासह वसमत आणि औंढा नागनाथ परिसरातील जमीन अचानक हादरली. नॅशनल सिस्मॉलॉजी सेंटरच्या (भूमापक केंद्र) माहितीनुसार, या भूकंपाची तीव्रता ३.५ रिश्टर स्केल इतकी नोंदवली.

अचानक घरांचे पत्रे आणि घरातील भांडी वाजू लागल्याने नागरिकांमध्ये प्रचंड भीती पसरली आणि अनेकांनी सुरक्षेसाठी थेट रस्त्यावर धाव घेतली. यात अद्याप कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळच्या सुमारास नागरिक आपापल्या दैनंदिन कामात व्यस्त असताना, ११ वाजून २६ मिनिटांनी जमिनीतून गूढ आवाज आला आणि जोरदार हादरा बसला. हिंगोली शहरासह शेजारील वसमत आणि औंढा नागनाथ तालुक्याला या भूकंपाचा सर्वाधिक फटका बसला.

(वृत्तसंस्था)




# दुधनी येथे लवकरच 'एमआयडीसी' : उद्योगमंत्री सामंत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ जुलै -**


ज्यांनी दुधनी बाजार समिती उभी केली, त्यांचा आदर राखलाच पाहिजे. शिवसेना आणि महायुती सरकार ज्येष्ठ नेते सिद्धाराम म्हेत्रे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, त्यांच्यावर अन्याय होऊ दिला जाणार नाही. दुधनी येथे लवकरच 'एमआयडीसी' मंजूर करण्यात येईल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

दुधनी येथे शिवसेनेच्या मेळाव्यात सामंत बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर खासदार ज्योती वाघमारे, खासदार धैर्यशील माने, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, ज्येष्ठ नेते शंकर म्हेत्रे, जिल्हा परिषद सदस्य शिवराज म्हेत्रे, नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे, जिल्हा परिषद सदस्य प्रवीण तानवडे, पंचायत समिती सदस्य शितल म्हेत्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, नगरसेवक बसवराज हौदे, पंचायत समिती सदस्य मोरे, सरपंच व्यंकट मोरे, रविना राठोड, रईस टिनवाला आदी उपस्थित होते.

माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे म्हणाले की ''अक्कलकोट तालुक्यात नेमके काय चालले आहे? आम्ही सत्तेत आहोत की विरोधात, हेच समजेनासे झाले आहे. अधिकारी वर्गावर दबाव आणून हुकूमशाही पद्धतीने कारभार सुरू आहे. नियम धाब्यावर बसवून चबुतरा पाडण्यात आला.

तिथे धार्मिक स्थळ उभारले.'' नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत झालेल्या पराभवाचा राग मनात धरूनच हा चबुतरा पाडल्याचा थेट आरोप म्हेत्रे यांनी केला.

खासदार धैर्यशील माने यांनी चबुतरा पाडला, त्याच ठिकाणी तो पुन्हा अभिमानाने उभा राहील. शिवसेना अन्याय करणाऱ्यांविरोधात म्हेत्रे यांच्या पाठीशी ढाल म्हणून उभी असल्याचे सांगितले. यावेळी सलगरचे भाजपाचे जेष्ठ नेते सुभाष शटगार,नागणसूरचे भीमाशंकर बिराजदार, संजय शरणार्थी, ग्रा.पं. सदस्य संजय मणुरे, गणेश चिनवार, सैपन शेख, जुबेर पुटणगार, रफिक पट्टेवाले, भीमाशंकर हाळतोट यासह इतर १५ जणांनी शिवसेनेत प्रवेश केला. जेऊरचे सुभाष हंद्राळ तालुका उपाध्यक्ष भाज युमो, श्रीशैल देसाई युवा नेते, गुरू बामणे, सैपन कोरबु, सिद्धाराम सलगरे, भीमा कोळी, दौलु डबरेसह जेऊर गटातील २० जणांनी शिवसेनेत प्रवेश केला.



# निता अंबानी 'मोस्ट पॉवरफुल वुमन' यांचे 'विकसित भारत'चे स्वप्न



'फॉर्च्युन इंडिया'ने शुक्रवारी मुंबईतील 'फोर सीझन्स हॉटेल'मध्ये आपला प्रमुख कार्यक्रम 'मोस्ट पॉवरफुल वुमन' (MPW) २०२६ आयोजित केला. या कार्यक्रमात व्यवसाय, वित्त, तंत्रज्ञान, आरोग्यसेवा, सार्वजनिक धोरण आणि उद्योजकता या क्षेत्रांतील भारतातील आघाडीच्या महिला नेत्या एकत्र आल्या होत्या.

या कार्यक्रमात 'फॉर्च्युन इंडिया मोस्ट पॉवरफुल वुमन २०२६' ही यादी जाहीर करण्यात आली; या यादीद्वारे अशा १०० महिलांचा गौरव करण्यात आला, ज्यांचे नेतृत्व देशाचे आर्थिक आणि व्यावसायिक क्षेत्र घडवत आहे. या संध्याकाळी नेतृत्व, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), आर्थिक सक्षमीकरण, उद्योजकता, सर्वसमावेशकता आणि राष्ट्रनिर्मिती या विषयांवर अत्यंत प्रभावी चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. महत्त्वाच्या क्षणांपैकी एक म्हणजे, रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्षा आणि या वर्षी 'सर्वांत प्रभावशाली महिलां'च्या यादीत प्रथम क्रमांकावर असलेल्या नीता अंबानी यांनी करुणा, सर्वसमावेशकता आणि संधी यांवर आधारित नेतृत्वाच्या व्यापक व्याख्येचा पुरस्कार केला; तसेच, मुलींच्या विकासासाठी गुंतवणूक करणे हे भारताच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.




विविध सत्रांमधील व्यावसायिक नेत्यांनी यावर भर दिला की, जरी एआय, भू-राजकीय बदल आणि वेगवान तांत्रिक बदल उद्योगांमध्ये परिवर्तन घडवत असले तरी, चिरस्थायी नेतृत्व हे जिज्ञासा, लवचीकता, ग्राहक-केंद्रितता आणि मानवी निर्णयक्षमतेवरच अवलंबून राहील. आर्थिक समावेशनाबाबतच्या चर्चांमधून हे अधोरेखित झाले की, महिला सक्षमीकरणाचा पुढील टप्पा केवळ आर्थिक सेवांच्या उपलब्धतेपुरता मर्यादित नसून, तो सक्रियपणे संपत्ती निर्मिती आणि आर्थिक निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्यामध्ये सामावलेला आहे.

या कार्यक्रमात सर्वसमावेशक कार्यस्थळे उभारणे, ग्राहकांच्या पसंतीस उतरणारे आणि दीर्घकाळ टिकणारे ब्रँड्स निर्माण करणे, तसेच 'विकसित भारत'चे स्वप्न साकारण्यात पोषण आणि आरोग्यसेवेची भूमिका या विषयांवरही सखोल चर्चा करण्यात आली. नेतृत्वासाठी भारतातील सर्वांत प्रभावशाली मंचांपैकी एक म्हणून 'मोस्ट पॉवरफुल वुमन' आवृत्तीने व्यवसाय आणि समाज या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण प्रभाव पाडणाऱ्या महिलांचा गौरव करण्याच्या 'फॉर्च्युन इंडिया'च्या कटिबद्धतेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले.

advt

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## हरिभाई देवकरण प्रशालेत पालक शिक्षक सभा

**सोलापूर, दि. ११ जुलै-**

शाळा समिती अध्यक्ष सुरेशबाबु मंकणी यांच्या मार्गदर्शनाखाली पालक सभा संपन्न झाली. पालक सभेचे प्रास्ताविक जेष्ठ पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांनी केले. यावेळी पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष चैतन्य कांबळे उपस्थित होते. यावेळी पालकांनी मनोगते व्यक्त केली.इयत्ता ५ वी ते १० वीच्या माता व पिता पालक कार्यकारिणी सदस्य निवड करण्यात आली. मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांनी पालकांनी शाळेच्या नेहमी संपर्कात रहावे तसेच विद्यार्थी सुजाण नागरिक बनावा अशी अपेक्षा सांगितली. प्रशालेत विविध शाला बाह्य परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, क्रीडा स्पर्धा बाबतची माहिती बडवे, पिल्ले, घंटे व साळसकर यांनी दिली. सूत्रसंचालन मंजिरी हरहरे तर आभार उपमुख्याध्यापक रविंद्र पानसरे यांनी मानले.



## गौंडरेचे शिक्षक सांगडे, रणमोडे यांचा सेवापूर्ती निमित्त सत्कार

**जेऊर, दि. ११ जुलै-**

डॉ. हेडगेवार माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गौतम सांगडे आणि सहशिक्षक दिलीप श्रीरंगमोडे यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवापूर्तीचा सत्कार सोहळा गौंडरे फाटा येथील साईप्रेम मंगल कार्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षक आमदार तथा शिक्षक नेते प्रा. दत्तात्रय सावंत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गणेशराव करे-पाटील होते. यावेळी करमाळा तालुक्याच्या वतीने आणि यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्थेकडून सांगडे व रणमोडे यांना मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. करे-पाटील यांनी दोन्ही शिक्षकांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक आणि विद्यार्थिनिष्ठ सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अरविंद श्रीरंग रणमोडे, उपाध्यक्ष दत्तात्रय अजिनाथ कापले, सचिव दिनकर विष्णू सांगडे, संचालक महादेव भागवत गायकवाड, पोपट अजिनाथ कापले, अर्जुन शंकर ननवरे आणि रामकृष्ण बाबुराव खंडागळे उपस्थित होते.




## पिसेवाडीत कृषी कन्यांकडून मोफत लंपी लसीकरण मोहीम

**वेळापूर, दि. ११ जुलै-**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ (राहुरी) संलग्नित रत्नाई कृषी महाविद्यालय, अकलूज अंतर्गत ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमात कार्यरत कृषीकन्यांनी पिसेवाडी (ता. माळिशरस, जि. सोलापूर) येथे गाई-म्हशींमध्ये होणाऱ्या 'लंपी स्कीन डिसीज' रोगाविषयी जनजागृती मोहीम आणि मोफत लसीकरण अभियानाचे यशस्वी आयोजन केले.

या कार्यक्रमाप्रसंगी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. महेश वाघमोडे यांनी लंपी रोग आणि एफएमडी (लाळखुरकत) यांसारख्या विविध घातक रोगांबद्दल माहिती दिली. या उपक्रमासाठी रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर. जी. नलवडे, कार्यक्रम समन्वयक व कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एम. एकतपुरे तसेच पशुसंवर्धन विभागातील प्रा. डी. एस. मेटकरी, ग्रामपंचायत पदाधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. महेश वाघमोडे व पिसेवाडीतील ग्रामस्थांचे सहकार्य लाभले. या यशस्वी जनजागृती व लसीकरण उपक्रमाचे आयोजन कृषीकन्या अंजली कदम तन्वी साबळे वैष्णवी कांबळे साक्षी भोसले निशा काळे पायल पवार नृत्या गेंड साक्षी पोळ यांनी केले.

## उजनी उजवा व डावा कालव्यासह नदीपात्रात पाणी सोडण्यात यावे : शशिकांत चव्हाण

**मंगळवेढा, दि. ११ जुलै-**

सध्या खरीप पावसाने ओढ दिल्यामुळे कालवा व नदीकाठची पिके धोक्यात आली असून, उजनी धरण सध्या ५० टक्के पर्यंत भरल्याने उजवा व डावा कालव्यासह भीमा नदीपत्रात देखील पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी अधीक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी भाजप जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे उपस्थित होते. यावेळी वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत देखील निवेदन देण्यात आले या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, जिल्ह्यात आज अखेर अतिशय कमी प्रमाणात पर्जन्यमान झाल्यामुळे चालू स्थितीत खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेल्याने जिल्ह्यातील शेतकरी हवालदील झाला. शेतकऱ्यांना पाण्याअभावी ऊस व फळबागा जोपासणे देखील जिकरीचे झाले. त्यासोबत भीमा नदीपात्र देखील गेल्या दोन महिन्यापासून कोरडे असून नदीकाठचा शेतकरी अडचणीत आलेला आहे. पाणी नसल्याकारणाने पिके जळून जात आहेत. सध्याची उजनीची परिस्थिती पाहता धरणात समाधानकारक साठा असून नदीवर अवलंबून अनेक ठिकाणच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना यामध्ये माढा, माळिशरस, पंढरपूर, सांगोला, मोहोळ, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, सोलापूर शहर या शहरांचा व जिल्ह्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचा समावेश असल्याने सदरील योजना देखील सुस्थितीत चालण्यासाठी भीमा नदीपात्रात पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी केली.

# आरोग्याच्या 'डॅम' भोवती चौकशीचा फास?

### लेखाकारभारावर प्रश्नचिन्ह; प्रलंबित देयके, कामकाजात विलंब, कर्मचाऱ्यांच्या तक्रारींनी वाढला वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

जिल्हा आरोग्य विभागातील आर्थिक व प्रशासकीय कामकाज पुन्हा एकदा चर्चेत आले असून ( डॅम) जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात यांच्या कामकाजाबाबत विभागीय स्तरावर चौकशी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. यापूर्वीही त्यांच्या कार्यपद्धतीबाबत अनियमिततेच्या तक्रारी झाल्याची चर्चा असून, नव्या चौकशीमुळे आरोग्य विभागातील लेखा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रुग्णवाहिकेच्या चालकांचे एक वर्षांपासूनचे पगार प्रलंबित ठेवणे, कंत्राटदारांची बिले दीर्घकाळ प्रलंबित ठेवणे, विविध देयकांच्या मंजुरीत अनावश्यक विलंब करणे, पत्रकारांच्या जाहिरात व प्रसिद्धीविषयक देयकांचा निपटारा न करणे, तसेच आर्थिक व्यवहारांमध्ये वेळेत निर्णय न घेणे, अशा अनेक बाबींवरून संबंधित अधिकाऱ्यांविरोधात नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक विकासकामे आणि पुरवठादारांचे व्यवहारही रखडल्याचे सांगितले जात आहे.

याशिवाय, रुग्णवाहिका चालकांच्या वेतन वितरणात विनाकारण अडथळे निर्माण झाल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. वेळेत वेतन न मिळाल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही सांगितले जाते. काही कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामकाजादरम्यान उद्धट वागणूक मिळत असल्याची आणि वारंवार वाद निर्माण होत असल्याचीही तक्रार वरिष्ठांकडे केल्याची माहिती आहे. आरोग्य विभागातील अनेक फाईली आणि आर्थिक प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित राहत असल्याने प्रशासकीय कामकाजाचा वेग मंदावल्याची भावना विभागातील कर्मचारी आणि संबंधित घटकांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, सुरू असलेल्या चौकशीत संबंधित तक्रारींची वस्तुस्थिती तपासली जाणार असून, चौकशी अहवालानंतरच पुढील प्रशासकीय निर्णय होण्याची शक्यता आहे. चौकशीत आरोप सिद्ध झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होण्याचीही चर्चा विभागात सुरू आहे. राज्याचे आरोग्य विभागाच्या आयुक्तांनी पंढरपुरात झालेल्या बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच जिल्हा लेखा व्यवस्थापक यांना आरोग्य विभागातील कारभारावरून खडेबोल सुनावल्याचे सांगण्यात येत आहे. वारंवार प्राप्त झालेल्या तक्रारीवरून आयुक्त यांनी जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात यांनी प्रलंबित देयके सोमवारपर्यंत अदा केले नाही तर, त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याचा सज्जड इशारा दिला आहे. या घटनेमुळे आरोग्य विभागात एकच खळबळ माजली आहे.



**अद्याप चौकशी सुरू**

जिल्हा लेखा व्यवस्थापक थोरात यांच्या विरोधात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यासंबंधी अद्याप चौकशी सुरू आहे.

**- डॉ. संदूले, ए.डी.एच.एस.पुणे तथा अध्यक्ष चौकशी समिती**

**अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णय**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात कार्यरत असणाऱ्या जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात यांच्या विरोधात प्राप्त झालेल्या तक्रारीवर वरिष्ठ स्तरावर चौकशी सुरू असून चौकशीअंती अहवाल प्राप्त झाल्यानंतर यासंबंधी निर्णय घेतला जाईल.

**- वर्षा डोईफोडे, जिल्हा शल्यचिकित्सक सिव्हिल हॉस्पिटल**

# पुराचे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी दुष्काळी सांगोल्याला सोडावे

### माजी आ. दिपकआबा साळुंखे-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ जुलै-**

कृष्णा, कोयना, भीमा, पंचगंगा आणि नीरा नदीच्या पात्रातून पुराच्या रूपाने वाहून जाणारे अतिरिक्त पाणी तत्काळ टेंभू उपसा सिंचन योजना, म्हैसाळ उपसा सिंचन योजना तसेच नीरा उजवा कालव्यातून पावसाच्या प्रतिक्षेत असणाऱ्या सांगोला तालुक्याला सोडावे अशी मागणी माजी आ. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. सांगोला तालुक्यात पावसाने अद्याप हजेरी न लावल्याने हजारो हेक्टरवर होणाऱ्या खरिपाच्या पेरण्या खोळंबल्या आहेत. शेतकऱ्यांचे विहिरी, तलाव आणि कुपनलिका तसेच अन्य जलस्रोतांनी तळ गाठल्याने पिण्याच्या पाण्याचीही समस्या गंभीर होऊ लागली आहे.



त्यामुळे ऐन पावसाळ्यात तालुक्यातील काही गावांना टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची वेळ आली आहे. राज्य सरकारने या गोष्टीची गंभीर दखल घेऊन दुष्काळग्रस्त सांगोला तालुक्याला दिलासा देण्यासाठी तात्काळ टेंभू योजना, म्हैसाळ योजना आणि नीरा उजवा कालव्यातून सांगोला तालुक्याला पाणी सोडावे अशी मागणी दिपकआबा साळुंखे पाटील यांनी ना. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केली आहे.

**पूरग्रस्त आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार दिलासा**

सध्या कृष्णा, कोयना, निरा, पंचगंगा या नद्यांच्या परिसरात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. यामुळे नदीच्या काठावरील लोकांना पुराचा धोका निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे पावसाळा सुरू होऊन तब्बल दीड महिना उलटला तरीही, पावसाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या सांगोला तालुक्यात भीषण पाणीटंचाई जाणवू लागली आहे. पुराचे अतिरिक्त पाणी टेंभू योजना, म्हैसाळ योजना व नीर उजवा कालव्यातून दुष्काळी सांगोला तालुक्याला सोडल्यास पूरग्रस्त आणि दुष्काळग्रस्त दोन्ही शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. याबाबत मी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा केली असून त्यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

**- दिपकआबा साळुंखे-पाटील,**
माजी आमदार

# शंकरलिंग वळसंग व शिवाजी हायस्कूल विजेता

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ११ जुलै**



जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत मुलांच्या गटात श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला वळसंग तर मुलींच्या गटात येथील छत्रपती शिवाजी हायस्कूलने विजेतेपद पटकाविले.

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे दिवंगत चेअरमन, दानशूर शिक्षणमहर्षी कै. शिवशरण खेडगी यांच्या चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त चेअरमन बसलिंगप्पा खेडगी मित्र परिवाराच्या वतीने सी. बी. खेडगी महाविद्यालयात या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत मुलांचे नऊ तर मुलींचे आठ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उद्घाटन अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे संचालक ॲड. अनिल मंगरुळे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी उपस्थित होते.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अंकुश शिंदे, उपप्राचार्य व्ही. एन. वैद्य, पर्यवेक्षक एस. एन. भरमशेट्टी, समन्वयक डॉ. सी. डी. अणेकर, निलव्वाबाई खेडगी प्रशालेचे मुख्याध्यापक जयदिप साखरे उपस्थित होते.

स्पर्धेचे पंच म्हणून गोविंद चव्हाण आणि अविनाश राठोड यांनी जबाबदारी पार पाडली. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी जिम खाना विभागप्रमुख डॉ. डी. एम. बिराजदार, प्रा. सोहेल शेख, सुधीर राठोड आदींनी परिश्रम घेतले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन) : मुले :** श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला (वळसंग), उडगी प्रशाला (उडगी), शिवचलेश्वर प्रशाला, मैंदर्गी. **मुली :** छत्रपती शिवाजी हायस्कूल (सोलापूर), उडगी प्रशाला (उडगी), जिल्हा परिषद हायस्कूल, (सोरेगाव).

# माढ्यातील सिंचन प्रश्नांवर मंत्रालयात बैठक

### मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश; आ. पाटील यांच्या पुढाकारातून बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ जुलै-**

जलसंधारण व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे सीना-माढा उपसा सिंचन योजना तसेच खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत माढा तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या सिंचनाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी सीना-माढा उपसा सिंचन योजनेत तुळशी, बावी, परितेवाडी, अंजनगाव (खे.), कुर्डू, अंबाड व पिंपळखुटे या सात गावांचा समावेश करणे, सुमारे २० वर्षे जुन्या झालेल्या मोटारींच्या जागी नवीन मोटारी बसविणे, सीना नदीच्या बोगद्यात नियोजनबद्ध पद्धतीने पाणी सोडणे, खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना तातडीने सुरू करणे, प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनीवरील फळझाडांच्या प्रलंबित नुकसानभरपाईचे तातडीने वाटप करणे तसेच नदीकाठावरील विस्कळीत विद्युत व्यवस्था सुरळीत करण्याच्या मागण्या करण्यात आल्या.

मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सीना-माढा उपसा सिंचन प्रकल्प व खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजनेची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले.

माढा तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या सिंचनासंदर्भातील प्रलंबित प्रश्न सोडवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी आमदार नारायण पाटील, भारत शिंदे, अमोल गायकवाड, विजय भगत, शरद मोरे, प्रकाश चोपडे, राजाभाऊ भांगिरे, संजय भोंगे, राजु भानवासे, गणेश गुंडगिरे, बंडु घाडगे, अजिंक्य काटकर, बालाजी टोणपे, रामकृष्ण चोपडे, बाळासाहेब चोपडे उपस्थित होते.



## पापरीच्या आदर्श शाळा मॉडेलचा कुरुल गटात विस्तार : जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ११ जुलै-**

**कुरुल गटातील शाळांचा अभ्यास दौरा**

कुरुल जिल्हा परिषद गटातील प्रत्येक शाळा पापरीच्या धर्तीवर आधुनिक, डिजिटल आणि गुणवत्तापूर्ण करण्याचा संकल्प असल्याचे जि.प. सदस्य सचिन जाधव यांनी सांगितले. त्यासाठी आवश्यक निधी व सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जाईल, असेही स्पष्ट केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने कुरुल सचिन जाधव यांनी राज्यात नावारूपाला आलेल्या पापरी व खंडाळी (इंगोले वस्ती) येथील डिजिटल शाळांचा अभ्यास दौरा केला. दौऱ्यात त्यांनी डिजिटल शिक्षण, गुणवत्तापूर्ण अध्यापन, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम आणि शाळा व्यवस्थापनाची माहिती शिक्षकांकडून जाणून घेतली. पापरी येथील जिल्हा परिषद शाळेने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बळावर राज्यस्तरावर विशेष ओळख निर्माण केली आहे. फेस रिडिंग प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची अचूक नोंद ठेवली जाते. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता आणि सुविधा पाहता येथे प्रवेशासाठी पालकांची मोठी गर्दी होत असून सुमारे ९५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. खंडाळी (इंगोले वस्ती) येथील डिजिटल शाळेतील स्मार्ट वर्गखोल्या, आधुनिक अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीचे उपक्रमही जाधव यांनी पाहून घेतले. डिजिटल साधनांचा वापर, पालकांचा सहभाग, लोकसहभाग आणि शाळा विकासाबाबत माहिती घेतली. यावेळी पंचायत समिती उपसभापती राजकुमार पाटील, सदस्य गणेश मुळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र शेळके, मुख्याध्यापक आबासाहेब टेकाळे, गटशिक्षण अधिकारी अविचल महाडिक, माजी उपसरपंच अजित भोसले, सोमनाथ व्यवहारे, सोनाली भोसले, माया भोसले उपस्थित होते.

## लग्नाचे आमिष दाखवून पीडितेवर लैंगिक अत्याचारप्रकरणी आरोपीस जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जुलै-**

बार्शी येथील मे.सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी आरोपी शिवलिंग हरिभाऊ गुळवे यास लग्नाचे अमिष दाखवून पीडितेवर लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणाच्या गुन्ह्यात जामीन मंजूर करुन दिला.

पीडितेने बार्शी शहर पोलीस ठाण्यामध्ये आरोपी शिवलिंग गुळवे याचे विरुद्ध त्याने सन २०२० ते २०२६ या दरम्यान पीडीतेसोबत लग्नाचे खोटे अमिष दाखवून वेळोवेळी लैंगिक अत्याचार केल्यासंदर्भात तक्रार दाखल केली होती. पीडितेच्या तक्रारीवरुन बार्शी शहर पोलीस ठाणे येथे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने दाखल गुन्ह्यावरुन पोलिसांनी संशयित आरोपीस अटक केली व न्यायालयाने आरोपीची रवानगी न्यायालयीन कोठडीमध्ये केली. त्यानंतर आरोपीने ॲड. अमोल अलाट यांचेमार्फत बार्शी येथील सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. सदर जामीन अर्जावर सुनावणी होऊन आरोपीच्या वकिलांनी केलेल्या युक्तिवादमुळे दि. १० जुलै रोजी न्यायालयाने आरोपीला जामीन मंजूर केला. सदर जामीन प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. अमोल अलाट, ॲड. विशाल गोणेकर, ॲड. पी. पी. वाघमारे, ॲड. पांडुरंग घोलप यांनी काम पाहिले तर फिर्यादी तर्फे ॲड. सुदर्शन सोनवणे, ॲड. योगीराज पुरवंत यांनी काम पहिले.

## कॉलेजला जाते, असे सांगून घराबाहेर पडलेली तरुणी बेपत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जुलै-**

बार्शी शहरातील विठ्ठलनगर परिसरात राहणारी १८ वर्षीय विद्यार्थिनी कॉलेजला जाते असे सांगून घरातून बाहेर पडली. मात्र, त्यानंतर ती घरी परत न आल्याने तिच्या वडिलांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली असून पोलिसांनी तिचा शोध सुरु केला आहे. लक्ष्मी सुरेश इंगळे (वय १८) ही बी. पी. सुलाखे महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. ४ जुलै २०२६ रोजी सकाळी सुमारे ७ वाजता ती कॉलेजला जात असल्याचे सांगून घरातून निघाली होती. महाविद्यालयाची वेळ संपल्यानंतरही ती घरी परतली नाही. कुटुंबीयांनी तिच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता मोबाईल बंद असल्याचे आढळून आले. यानंतर कुटुंबीयांनी महाविद्यालय परिसर, बार्शी शहरातील विविध ठिकाणे तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र, तिचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही. अखेर तिचे वडील सुरेश प्रकाश इंगळे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. बार्शी शहर पोलिसांनी बेपत्ता विद्यार्थिनीचा शोध सुरु केला असून, तिच्याबाबत कोणालाही माहिती मिळाल्यास तात्काळ बार्शी शहर पोलीस ठाण्याशी किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# करकंब येथे उद्या सुवासिनी पूजन आणि चौंडेश्वरी भावई उत्सव

### करकंब कोष्टी समाज जपतोय शेकडो वर्षांची परंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ११ जुलै-**

शंभर वर्षांपासून सुरू असलेला भावई उत्सवानिमित्त चौंडेश्वरी कोष्टी समाज ट्रस्ट करकंब यांच्या मार्गदर्शनाखाली चौंडेश्वरी ज्येष्ठ अमावस्या दिवशी आणि समस्त करकंब कोष्टी समाज बांधवांच्या सहकार्याने प्रतिवर्षाप्रमाणे १३ जुलै सोमवारी दुपारी ११:३० वा भारत वास्ते आणि लक्ष्मण वास्ते परिवाराच्या वतीने सुवासिनी पूजन आणि भोजन आयोजित करण्यात आले आहे.

तसेच १४ जुलै मंगळवारी सकाळी १०:३० वा श्री चौंडेश्वरी भावई मंदिरातून निघणार असून सोमवार पेठ, मोती चौक, मेन रोड, शुक्रवार पेठ येथून दिलीप शिंदे यांचे घरी येऊन मिरवणूकीचा शेवट होऊन चौंडेश्वरी मंदिरात येते. यावेळी ठिकठिकाणी भावईचे पूजन केले जाते. दुष्ट चंड मुंड राक्षसाने सगळीकडे थैमान मांडले होते.



आई चौंडेश्वरी मातेने दुष्ट चंडमुंड राक्षसांचा वध केला. आणि तेंव्हापासून हा उत्सव विविध ठिकाणी साजरा करण्यात येतो. करकंब मध्येही हा उत्सव अनेक वर्षांपासून साजरा करण्यात येतो. यावेळी समस्त कोष्टी समाज बांधवांबरोबर करकंबकरही उत्साहात सहभागी घेतात. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी नारायण वास्ते, प्रभाकार टेके यांच्या मार्गदर्शनाखाली राजेंद्र टकले, राजेंद्र करपे, प्रभाकर रसाळ, राजेंद्र नडे, चंद्रकांत रसाळ, संजय दुधाणे, जयंत टकले, नवनाथ टकले, अभिजित टेके, सतीश दुधाणे, हरिश्चंद्र वास्ते, धीरज वास्ते, भूषण वास्ते, ज्ञानेश्वर दुधाणे आदी परिश्रम घेत आहेत.

# स्वातंत्र्य मिळवणार, अन्यथा मृत्यू पत्करणार

## 'जेएएसी'च्या नेत्यांची पाकिस्तानला धमकी

## बुधवारी काढणार 'लाँग मार्च'

## लष्कराला व्याप्त काश्मिरातून हुसकावून लावणार

**मुझफ्फराबाद, ११ जुलै**

पाकिस्तानी सरकार आणि लष्कराविरोधात अखेरचा लढा देण्याची वेळ आली आहे, १५ जुलै रोजी रावलकोट येथून मुझफ्फराबादच्या दिशेने लाँग मार्च काढला जाईल, मागण्या पूर्ण न झाल्यास भारतीय सीमेकडे कूच करणार आहे. व्याप्त काश्मीरला स्वातंत्र्य मिळवून देणार अन्यथा मृत्यू पत्करण्यास तयार आहे. लष्कराच्या दबावापुढे कदापि झुकणार नाही. त्यांनी आंदोलनात अडथळा आणल्यास आमच्या भूभागातून हुसकावून लावू अशी धमकी 'जॉईंट आवामी एक्शन कमेटी'चे (जेएएसी) नेते सरदार अमान खान यांनी दिली आहे.

जेएएसीच्या नेतृत्वात व्याप्त काश्मिरात महिनाभरापासून सुरू असलेले आंदोलन उधळण्याचे पाकिस्तानी लष्कराचे सर्व प्रयत्न धुळीस मिळाले आहे. त्यांनी आतापर्यंत शंभरपेक्षा अधिक निदर्शकांची हत्या केली. मात्र, व्याप्त काश्मिरातील लोक डगमगले नाही. आंदोलन दडपण्यासाठी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा रोखला, आमच्या नेत्यांवर देशद्रोहाचे खटले दाखल करीत तुरुंगात डांबले. आता व्याप्त काश्मीर मुक्त करू अन्यथा मृत्यूला सामोर जाण्याची तयारी लाखो नागरिकांनी केली आहे. १५ जुलै रोजी काढण्यात येणाऱ्या लाँग मार्चमध्ये पाच लाख लोक सहभागी होणार आहेत.

पाकिस्तानी लष्कराने गोळ्या झाडल्या तरी माघार घेणार नाही. मागण्या पूर्ण न झाल्यास आम्ही भारतीय सीमेकडे कूच करू आणि सुरक्षा दलाला आमच्या भूभागातून हुसकावून लावून भारतीय सीमा व्याप्त काश्मीरसाठी खुली करणार असल्याचा इशारा जेएएसीचे नेते सरदार अमान खान यांनी निवेदनातून दिला.





व्याप्त काश्मीरच्या स्वातंत्र्यासाठी निदर्शने करणारे नागरिक

### सरकारी कर्मचारी, व्यापाऱ्यांचा पाठिंबा

**जेएएसीच्या आंदोलनाला विविध विभागातील कनिष्ठ सरकारी, शिक्षक, व्यापारी, वकिल संघटना, कामगार संघटनांनी पाठिंबा दर्शवला आहे. दुसरीकडे विद्यार्थ्यांनी देखील १५ जुलैच्या लाँग मार्चमध्ये सहभागी होण्याची घोषणा केल्याने पाकिस्तानी सरकारच्या अडचणी वाढल्या आहे.**

**नागरिकांवर उपासमारीचे संकट**

व्याप्त काश्मिरातील आंदोलन बळाच्या जोरावर दडपण्यात अपयशी झालेल्या पाकिस्तानी सरकारने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा बंद केला आहे. व्याप्त काश्मीरच्या सीमेवर धान्यासह विविध वस्तू घेऊन जाणारे शेकडो ट्रक दोन आठवड्यांपासून थांबले आहे. पर्यायाने येथील नागरिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. घरगुती गॅस सिलेंडर, धान्य, भाजीपाला, दूध, औषधीसह विविध वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला आहे.

**आंदोलकांच्या हल्ल्यात १२ पोलिस ठार**

व्याप्त काश्मीरकडे जीवनावश्यक वस्तू घेऊन जाणाऱ्या सहा ट्रकला आग लावण्यात आली. तसेच, आंदोलकांनी सुरक्षेसाठी तैनात पोलिसांच्या ताफ्यावर हल्ला केला आणि पोलिसांची वाहने जाळली, त्यात १२ पोलिस ठार झाले, तर अनेक जखमी आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानी लष्कर आंदोलकांवर मोठ्या प्रमाणावर हिंसक कारवाई करण्याची शक्यता आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### आंदोलकांना घाबरले सरकार

पाकिस्तानी सरकारने १५ जुलैचे आंदोलन दडपण्यासाठी व्याप्त काश्मिरात चार हजारपेक्षा अधिक अतिरिक्त सैनिक तैनात केले आहे. याशिवाय सात रेंजर्स विंग्सच्या तुकड्या सीमेवर पाठवल्या आहे. व्याप्त काश्मिरातील गृह विभागाने केलेल्या विनंतीवरून अतिरिक्त सैनिक तैनात केल्याची माहिती पाकिस्तानी संरक्षण विभागाने दिली आहे. आंदोलकांना घाबरून रावलकोट ते मझफ्फराबादपर्यंत मोठ्या प्रमाणात सुरक्षा दल तैनात करण्यात आले.

# सुरक्षा परिषदेच्या जागेसाठी भारताने कसली कंबर

**न्यू यॉर्क, ११ जुलै**

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर पुढील आठवड्यात संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या मुख्यालयात २०२८-२९ च्या कार्यकाळासाठी अस्थायी जागेसाठी भारताच्या मोहिमेचा शुभारंभ करतील. ते संयुक्त राष्ट्राचे महासचिव अँटोनियो गुटारेस यांचीही भेट घेतील.

५ ते १० जुलैदरम्यान कतार, बहरीन, कुवेत आणि ओमानचा अधिकृत दौरा केलेले जयशंकर शनिवारी अमेरिकेत दाखल होण्याची शक्यता आहे. ते सोमवारी संयुक्त राष्ट्र मुख्यालयात एका विशेष कार्यक्रमात संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या २०२८-२९ च्या कार्यकाळासाठी भारताच्या अधिकृत मोहिमेचा शुभारंभ करतील. त्यानंतर ते १४-१५ जुलैला ब्रुसेल्समध्ये होणाऱ्या तिसऱ्या भारत-युरोपियन युनियन व्यापार आणि तंत्रज्ञान परिषदेच्या बैठकीत सहभागी होत युरोपियन युनियन व बेल्जियन समकक्षांशी चर्चा करतील. संयुक्त राष्ट्रांनी जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार गुटारेस सोमवारी दुपारी संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात जयशंकर यांना भेटतील.

**एकमेव जागेसाठी आशिया-प्रशांत गटात स्पर्धा**

भारताने शेवटची संयुक्त राष्ट्रांची बैठक २०२१-२२ च्या कार्यकाळासाठी अटेंड केली होती. २०२८-२९ च्या कार्यकाळासाठी निवडणुका पुढील वर्षी जूनमध्ये होणार आहेत. त्यात भारत आणि ताजिकिस्तान आशिया-प्रशांत गटातील एकमेव जागेसाठी स्पर्धा करतील. ◂ (वृत्तसंस्था)

### आर्थिक ताळेबंदात कायमस्वरूपी स्थान मिळावे

भारत अनेक वर्षांपासून सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्याच्या प्रयत्नांचे नेतृत्व करत आहे. ज्यात तिचे स्थायी आणि अस्थायी सदस्यत्व वाढवण्याचा समावेश आहे. भारताचे म्हणणे आहे की, १९४५ मध्ये स्थापन झालेली १५-देशीय परिषद २१ व्या शतकासाठी अयोग्य आहे.ती समकालीन भू-राजकीय वास्तवाचे प्रतिबिंब दर्शवत नाही. भारतान सातत्याने आग्रह धरला आहे की, आर्थिक ताळेबंदात आपत्याला कायमस्वरूपी स्थान मिळायला हवे. तसेच भारताने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या स्थायी आणि अस्थायी अशा दोन्ही सदस्यत्व श्रेणींचा विस्तार करण्याची मागणी केली आहे.

# सहा हुर्रियत नेत्यांविरुद्ध आरोपपत्र दाखल

**नवी दिल्ली, ११ जुलै**

श्रीनगरमध्ये १९९६ मध्ये उफाळलेल्या हिंसाचार प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने फुटीरतावादी संघटना हुर्रियत कॉन्फरन्सच्या सहा वरिष्ठ नेत्यांविरुद्ध विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. या नेत्यांनी एका दहशतवाद्याच्या अंत्यविधीदरम्यान पोलिसांवर हल्ला करण्यासाठी जमावाला चिथावणी दिली आणि व्यापक हिंसाचार भडकवला, असा आरोप संस्थेने केला आहे. आरोपींमध्ये शब्बीर अहमद शाह, सय्यद अली शाह गिलानी, अब्दुल घनी लोन, मोहम्मद याकूब वकील, जावेद अहमद मीर आणि शकील अहमद बक्षीचा समावेश आहे.

एनआयएने या सर्वांवर गुन्हेगारी कट, हत्येचा प्रयत्न, दंगल आणि सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ला केल्याचा आरोप ठेवला आहे. बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या कलम १३ अंतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापि, सय्यद अली शाह गिलानी, अब्दुल गनी लोन आणि मोहम्मद याकूब वकीलचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे त्यांच्यावरील कायदेशीर कारवाई थांबवण्यात आली आहे. तपासादरम्यान गुन्हेगारी कट आणि बेकायदेशीर जमाव जमवल्याचे पुरेसे पुरावे आढळले आहेत, असेही एनआयएने आरोपपत्रात सांगितले आहे. १७ जुलै १९९६ रोजी श्रीनगरमधील नाझ क्रॉसिंग येथे ठार झालेल्या दहशतवादी हिलाल अहमद बेगच्या अन्त्ययात्रेदरम्यान या सहा नेत्यांनी एका बेकायदेशीर जमावाचे नेतृत्व केले आणि पोलिसांविरुद्ध मोठ्या प्रमाणावर हिंसाचार भडकवला. ◂ (वृत्तसंस्था)

# आवाजाचा नमुना द्या, अन्यथा संरक्षण हटवणार

## कलकत्ता उच्च न्यायालयाचा अभिषेक बॅनर्जींना इशारा

**कोलकाता, ११ जुलै**

कलकत्ता उच्च न्यायालयाने तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांना अंतिम इशारा दिला आहे. न्यायालयाने त्यांना बिधाननगर न्यायालयात हजर राहून गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) अधिकाऱ्यांना आवाजाचा नमुना देण्याचे निर्देश दिला आहे. असे न केल्यास त्यांना पोलिस कारवाईपासून दिलेले संरक्षण काढून घेतले जाईल, असा स्पष्ट इशाराच न्या.सौगत भट्टाचार्य यांच्या एकलपीठाने दिला आहे. त्यांना बिधाननगर न्यायालयात १५ जुलैला दुपारी २ वाजेपर्यंत हजर राहण्याचा निर्देश दिला आहे.



अभिषेक बॅनर्जींवर नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी एका प्रचार सभेत हिंसाचाराला चिथावणी देणारी वक्तव्ये केल्याचा आणि केंद्रीय गृहमंत्र्यांना धमकी दिल्याचा आरोप आहे. अभिषेक यांनी यापूर्वी दोनदा जिल्हा न्यायालयात आवाजाचे नमुने देणे टाळले आहे. बिधाननगर न्यायालयात आवाजाचे नमुने देण्यापासून सूट मागणाऱ्या अभिषेकच्या याचिकेवर शुक्रवारी सुनावणी झाली. ८ जुलैला तो बिधाननगर न्यायालयात अनुपस्थित असल्याची माहिती मिळाल्यानंतर न्या. भट्टाचार्य यांनी या प्रकरणी कठोर भूमिका घेत अंतिम इशारा दिला.

अभिषेकने १५ जुलैला दुपारी २ वाजेपर्यंत बिधाननगर न्यायालयात आवाजाचे नमुने देण्याच्या निर्देशाचे उल्लंघन केल्यास त्याला आर्थिक दंड आकारला जाईल, असा इशाराही न्या. भट्टाचार्य यांनी दिला. त्यांच्या कठोर भूमिकेनंतर अभिषेकच्या वकिलाने न्यायालयाला कळवले की, त्यांचा पक्षकार निर्देशाचे पालन करून ठरलेल्या वेळी आणि तारखेला जिल्हा न्यायालयात हजर राहील. मात्र, जिल्हा न्यायालयात हजर असताना त्यांच्या पक्षकाराला कोणत्याही प्रकारच्या शारीरिक छळाला सामोरे जावे लागणार नाही याची खात्री करावी, अशी विनंती केली. यावर न्या. भट्टाचार्य यांनी त्या दिवशी पोलिस अभिषेकच्या सुरक्षेची काळजी घेतील, असे सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### सनी देओलच्या लूकची धर्मेंद्रसोबत तुलना



**मुंबई** : 'इक्का'च्या स्क्रीनिंगदरम्यान सनी देओल क्लीन-शेव लुकमध्ये दिसला. त्याने निळ्या चेकचा कॅज्युअल शर्ट आणि कॅप घातली होती. समाज माध्यमावर अनेक वापरकर्त्यांनी त्याच्या या लुकची तुलना धर्मेंद्र यांच्या जुन्या अंदाजाशी केली. 'इक्का' १० जुलै रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. चित्रपटात सनी देओलसोबत दिया मिर्झा, अक्षय खन्ना, संजीदा शेख, आकांक्षा रंजन कपूर आणि शिशिर शर्मा देखील भूमिकेत आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन सिद्धार्थ पी. मल्होत्रा यांनी केले आहे. या चित्रपटाद्वारे सनी देओलने ओटीटीवर पदार्पण केले आहे. चित्रपटाच्या एका कार्यक्रमात सनी देओलने बूट प्रकरणावर विनोद केला. अरे, कोणी बुटाचा फोटो घेऊ नका, असे पापाराझीसमोर पोज देताना त्याने हसत सांगितले. इतके बोलताच तिथे उपस्थित असलेले पापाराझी हसले. बुट तर पूर्ण फ्रेममध्ये येतच आहे, असे यावर एका पापाराझीने उत्तर दिले. यानंतर सनी देओल हसत पुढे निघून गेला.

### 'द इंडिया स्टोरी : स्लो पॉयझन इन प्रोग्रेस' होणार प्रदर्शित




**मुंबई** : श्रेयस तळपदे आणि काजल अग्रवाल अभिनित 'द इंडिया स्टोरी : स्लो पॉयझन इन प्रोग्रेस' २४ जुलै रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. दिग्दर्शक चेतन डीके आणि लेखक-निर्माता सागर शिंदे यांचा हा चित्रपट भेसळयुक्त अन्न, कीटकनाशके आणि कर्करोगाचा वाढता धोका यासारख्या गंभीर समस्यांना सस्पेन्स, ड्रामा आणि क्राईमच्या माध्यमातून सादर करेल. चित्रपटात प्रेक्षकांना मूळ गर्दी आणि वास्तविक ठिकाणे दिसतील. कारण, त्यांचा उद्देश कथेला जास्तीत जास्त वास्तवतेसह पडद्यावर आणणे हा होता, असा दावा दिग्दर्शकाचा आहे.

### शाहरुखने दिल्लीत खरेदी केले घर



**मुंबई** : अभिनेता शाहरुख खान दक्षिण दिल्लीतील पॉश परिसर पंचशील पार्क येथील इमारतीचा एकमेव मालक बनला आहे. या इमारतीतील सदनिकेत त्याने लग्नानंतर आयुष्याची सुरुवात केली होती. अभिनेत्याकडे या निवासी मालमत्तेचे तळघर आणि पहिला मजला आधीपासूनच होता. आता त्याने इमारतीचा दुसरा आणि तिसरा मजलाही विकत घेतला. शाहरुखने या अतिरिक्त मजल्यांसाठी सुमारे ३७ कोटी रुपये दिले आहेत. हे घर शाहरुख आणि गौरी खानसाठी खूप खास आहे.

# भारतीय पर्यटकांचा व्हिएतनाममध्ये मृत्यू

## १५ जण ठार, २१ जणांना वाचवले

**हनोई, ११ जुलै**

व्हिएतनाममधील फु क्वोक बेटाजवळ शनिवारी समुद्रात भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक बोट उलटली. या अपघातात १५ भारतीयांचा मृत्यू झाला, तर २१ जणांना वाचवण्यात आले.

स्थानिक प्रशासनाने तात्काळ बचावकार्य केले. भारतीय दूतावास परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, स्थानिक प्रशासनाच्या सतत संपर्कात आहे. पीडित कुटुंबांना मदत करण्यासाठी हो चि मिन्ह सिटी आणि हनोई येथे आपत्कालीन प्रतिसाद केंद्रेही उभारण्यात आली आहेत. बोटीमध्ये एकूण ३६ जण होते. यामध्ये ३२ भारतीय पर्यटक, तीन कर्मचारी आणि एक परिचारक यांचा समावेश होता. या अपघातात १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला, तर उर्वरित २१ जणांना वाचवण्यात आले, असे स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले.

अपघाताची बातमी मिळाल्यानंतर, व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाने 'एक्स'वर एक पोस्ट शेअर करून याला दुजोरा दिला. दूतावासाने आपल्या ट्विटमध्ये एका अत्यंत दुःखद घटनेत, व्हिएतनाममधील फु क्वोक बेटाजवळ काही तासांपूर्वी अनेक भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक बोट उलटली.

अपघाताचा नेमका तपशील तपासला जात आहे. स्थानिक अधिकाऱ्यांकडून सध्या शोध आणि बचाव कार्य सुरू आहे, असे लिहिले. स्थानिक अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, बोट होन मे रुट बेटावरून आन थोई बंदराकडे परत येत होती. किनाऱ्यापासून सुमारे ४०० मीटर अंतरावर ती समुद्रात उलटली.

प्राथमिक माहितीनुसार, त्यावेळी समुद्राच्या उंच लाटा उसळत होत्या, ज्यामुळे हा अपघात झाला. तथापि, या घटनेचे नेमके कारण अद्याप तपासले जात आहे. फु क्वोक हे व्हिएतनामचे सर्वांत मोठे बेट आहे आणि अलिकडच्या वर्षांत ते भारतीय पर्यटकांमध्ये अधिकाधिक लोकप्रिय झाले आहे, ज्यामुळे मोठ्या संख्येने भारतीय सुट्यांसाठी या बेटाला भेट देत आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

# त्रिपुरात नैसर्गिक आपत्ती; ११ हजार लोक बेघर

## तीन जिल्ह्यांमध्ये पुरामुळे हाहाकार, चार हजार घरांचे नुकसान

**आगरतळा, ११ जुलै**

गत काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे त्रिपुरात हाहाकार उडाला आहे. राज्याच्या अनेक भागांमध्ये पुरामुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यातील सुमारे ११ हजार लोक बेघर झाले असून ४,०२७ घरांचे पूर्णपणे किंवा अंशतः नुकसान झाले आहे. प्रशासन मदत आणि बचाव कार्यात गुंतले आहे. सुदैवाने, आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.



राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, तीन जिल्ह्यांना पुराचा गंभीर फटका बसला आहे. उनकोटी, खोवाई आणि धलाई जिल्ह्यांमध्ये पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. उनकोटी जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान झाले आहे. पूरग्रस्तांच्या बचावासाठी ३५ मदत शिबिरे उभारण्यात आली आहेत. ६,०६८ लोक या शिबिरांमध्ये आश्रय घेत आहेत. दुसरीकडे, धलाई आणि खोवाई जिल्ह्यांमधील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. प्रशासनाने या दोन जिल्ह्यांमधून अंदाजे ४,९०९ बाधित लोकांना सुरक्षित ठिकाणी आणि मदत शिबिरांमध्ये हलवले आहे.

सततच्या मुसळधार पावसामुळे मनू नदी धोक्याच्या पातळीच्या वर वाहू लागली.

दुथडी भरून वाहणाऱ्या नदीमुळे जवळपासचे अनेक सखल भाग पाण्याखाली गेले. दरम्यान, शुक्रवारी पाऊस थांबल्यामुळे मनू नदीची पाणी पातळी थोडी कमी झाली आहे. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी आणि स्थानिक रहिवाशांना काहीसा दिलासा मिळाला आहे. तथापि, हवामान खात्याचा इशारा पाहता, धोका अजून टळलेला नाही. शिवाय, खोवाई जिल्ह्यातील अनेक डोंगराळ आणि संवेदनशील भागांमध्ये भूस्खलन सुरूच असून, रस्ते बंद होत आहेत. त्यामुळे मदतकार्यात अडथळा येत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# 'वंदे मातरम्' नंतर होईल जन-गण-मन

## सरकारने जारी केला आदेश

**नवी दिल्ली, ११ जुलै**

केंद्र सरकारने जन-गण-मन आणि वंदे मातरम् या राष्ट्रगीतासंदर्भात सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रालयांना नवीन निर्देश जारी केला आहे. नियमांनुसार कोणत्या कार्यक्रमांमध्ये दोन्ही गाणे किंवा वाजवणे आवश्यक आहे हे आधीच ठरवले आहे, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

जर दोन्ही एकाच वेळी सादर केले गेले, तर आधी वंदे मातरम् आणि नंतर जन-गण-मन वाजवले जाईल, असे मंत्रालयाने सांगितले. ज्या राज्यांमध्ये राज्यगीत देखील आहे, तिथेही ठरलेल्या क्रमाने पालन करावे लागेल. ९ जुलै रोजी सर्व राज्ये आणि मंत्रालयांना पत्र पाठवण्यात आले होते, याची माहिती शुक्रवारी समोर आली. राष्ट्रगीत आणि राष्ट्रगीताचे मूळ शब्द, योग्य उच्चारण आणि ठरलेल्या सादरीकरणाचे पूर्णपणे पालन केले जावे. ◂ (वृत्तसंस्था)

# मुख्यमंत्री देवाभाऊंच्या सहकार्यामुळेच शहर-जिल्हा विकासाला चालना : पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

शहर आणि जिल्ह्यातील प्रलंबित प्रश्नांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दाखविल्यानेच अवघ्या एका वर्षात शहर-जिल्हा विकासाला चालना मिळाली आणि सर्व प्रलंबित कामांचा निपटारा होत असल्याचा निर्वाळा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज (दि. ११) जिल्हा नियोजन समिती बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना दिला.

सोलापुरातील विमानसेवा, आयटी पार्क, उड्डाणपुल, उजनी जलपर्यटन असो किंवा गरीब जनतेच्या चाळींचा बी २ चा विषय मार्गी लागल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. बी २ या विषयांमुळे तर सोलापुरातील चाळीतील तब्बल ९ हजार नागरिकांना फायदा होणार आहे. घरकुल (पंतप्रधान आवास) योजनांसाठीही सरकार कायम आघाडीवर असते. शेतकरी कर्जमाफीचा विषयही सरकारने मार्गी लावला. यातील जाचक अटीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढून टाकल्या आहेत.

नियोजन समितीच्या बैठकीत २०२५-२०२६ मधील ८४२ कोटीच्या कामास मंजुरी दिली असून, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आता २ तासांऐवजी ५ तास वीज मिळणार आहे. आय टी पार्कला जलसंपदा विभागाची जागा मोफत देणार आहे आणि याचे कामही काही महिन्यात सुरू होईल. यामुळे सोलापुरातील उच्चशिक्षित युवकांना आपल्याच गावात नोकरी मिळणार आहे. जिल्ह्यातील विद्युत डिपींचा विषयही आजच्या बैठकीत संपविला आहे. आषाढीसाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून जिल्हा प्रशासनाला सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. आता सोलापूर व बोरामणी विमानतळाचा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे. सोलापूर शहराचा दीड ते दोन महिन्यांत पाणीपुरवठा सुरळीत केला जाणार असून, विविध कामाचे टेंडर लवकरच जाहीर करण्यात येईल, उड्डाण पुलासाठी ७० ते ८० टक्के जागेचे हस्तांतरण करण्यात आले आहे. शासकीय जागाही आता जिल्हा प्रशासनाने ताब्यात घेवून लवकर काम चालू करावे, अशा सुचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. शहर-जिल्ह्यातील काही कामे संथगतीचे सुरू आहेत; त्या कामांनाही आता आर्थिक गती देवून जनहिताला प्राधान्य देण्यात येणार आहे. दरम्यान, यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांचा अभिनंदनाचा ठरावही डिपीसीमध्ये घेण्यात आल्याची माहिती पालकमंत्री गोरे यांनी दिली. दरम्यान, सध्या शहर-जिल्ह्यात दुष्काळी स्थितीचे वातावरण असल्याने शेतकरी व सोलापूर वासीयांनी शेतीसाठी अथवा पिण्याचे पाणी जपून वापरावे, असेही आवाहन शेवटी केले.

# काँग्रेसच्या माजी आमदाराची शिक्षा कायम

**नवी दिल्ली, ११ जुलै**

मध्यप्रदेशातील काँग्रेसचे माजी आमदार राजेंद्र भारती यांना दिल्ली उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. न्या. मनोज जैन यांनी बँक फसवणूक प्रकरणात न्यायालयाने त्यांचे अपील फेटाळत कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली तीन वर्षांची शिक्षा कायम ठेवली आहे. या शिक्षेमुळे त्यांना आपले सदस्यत्वही गमवावे लागले होते.



२८ एप्रिलला राजेंद्र भारती यांनी कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपील दाखल केल्यानंतर ९ ऑगस्ट रोजी उच्च न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता. ७ एप्रिलला न्यायालयाने मध्यप्रदेश सरकार आणि निवडणूक आयोगाला नोटीस बजावली होती. याचिकेत राजेंद्र भारती यांनी दोषसिद्धीच्या आदेशाला स्थगिती देण्याची आणि निवडणूक आयोगाला दतिया विधानसभा निवडणुकीसाठी अधिसूचना जारी न करण्याचा निर्देश देण्याची मागणीही केली होती. निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या, तर याचिकाकर्त्याच्या राजकीय कारकिर्दीला गंभीर धक्का बसेल, असे याचिकेत म्हटले होते. ◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## रोखठोक

**दिनेश गुणे**

# भेसळीचा बोकाळलेला भस्मासुर

हृदय जिंकण्याचा मार्ग पोटातून जातो, असे म्हणतात. पण गेल्या काही दशकांत हा विचार मागे पडत चालला आहे. कॉर्पोरेट जगाने किंवा धंदेवाईकांच्या जाहिरातबाजीने जेव्हापासून ग्राहक नावाच्या वस्तूच्या मनावर कब्जा मिळविला, तेव्हा हा विचार मागे पडला आणि हृदये जिंकण्याचा मार्ग निव्वळ जाहिरातबाजीतून जातो हे सिद्ध होऊ लागले. जाहिरात हे ग्राहकास आकर्षित करण्याचे आणि संपूर्ण जीवनशैली बदलण्याची क्षमता असलेले प्रभावी माध्यम असल्याचे सिद्ध होऊ लागले, तेव्हापासून ग्राहकाने मन, हृदय आणि शरीर, त्वचा, कान, नाक, डोळे आणि सारे अवयव अंधपणाने जाहिरातविश्वाच्या स्वाधीन करून टाकले आणि जाहिरात सांगेल तेच खरे आणि जाहिरात सांगेल तेच करावयाचे असा प्रघात पडला. आता अशा तऱ्हेने प्राधान्य झालेल्या आणि धंदेवाईक जगाकडून जिंकल्या गेलेल्या हृदयांच्या व्यथा बोलक्या होऊ लागल्या आहेत. या जगाने आपल्या जाहिरातकलेतून हृदये जिंकली, पण त्यांची शक्ती मात्र हिरावून घेतली. एकदा हृदयावर ताबा मिळविला, की मनाला हवे तसे वळविण्याची ताकदही मिळविता येते हे माहीत असलेल्या धंदेवाईकांच्या जगाने त्याचा फायदा घेत ग्राहक नावाच्या वस्तूला अक्षरशः वापरण्यास सुरुवात केली आणि ग्राहकांनीही त्यास मुक्त मुभा दिली, असे आता उघडकीस येऊ लागले आहे. आपल्या दैनंदिन जीवनात ज्या काही वस्तू वापरल्या जातात, त्याचा हृदयावर, शरीरावर किंवा शरीराच्या कोणत्याही अवयवावर तसेच मनावरही, कोणता परिणाम होतो याची जाणीवच हिरावून घेतली गेली आहे, असे या नव्या कारवायांतून स्पष्ट होऊ लागले आहे. जाहिरात हे ग्राहकांस आकर्षित करण्याचे साधन आहे असे मानले जाते. आता तो समजही दूर होऊ लागला असून, जाहिरात हे ग्राहकास आकर्षित करण्याचे नव्हे, तर फसविण्याचे साधन आहे, असे वाटण्याजोगी परिस्थिती दिसू लागली आहे. महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा कार्यभार तुकाराम मुंढे नावाच्या एका सनदी अधिकाऱ्याने हाती घेतला आणि प्रशासन नावाची ही व्यवस्था सक्रिय झाली. याआधीही ही यंत्रणा अस्तित्वात होती. लहानमोठ्या कारवायादेखील या यंत्रणेकडून केल्या जात होत्या. पण त्यासाठी काही निमित्त असे. म्हणजे, सणासुदीच्या दिवसांत ज्या खाद्यपदार्थांचा वापर ग्राहकांकडून सणाचा आनंद द्विगुणित करण्याकरिता केला जातो, अशा पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या धंद्यांवर धाडी टाकून काही मुद्देमाल जप्त केला जात असे. खवा, मावा, दूध, बनावट आणि खाण्यास योग्य नसलेल्या रंगांचा वापर करून आकर्षक बनविलेल्या मिठाया, आदी पदार्थ जप्त करून कारवाईचा मोठा गाजावाजाही केला जात असे. सणासुदीचा हंगाम संपला, की पुन्हा या पदार्थांचा बाजार आपल्या जुन्या पायवाटेवरून पुढे चालत असे आणि पुन्हा जोरदार जाहिरातींच्या प्रभावामुळे ग्राहकासही अशा कारवायांचा विसर पडत असे. गेल्या अनेक दशकांत असे भेसळयुक्त, घातक रसायनांचा वापर केलेले आणि खाण्यास व आरोग्यास अपायकारक असलेले असंख्य पदार्थ बाजारपेठांनी केवळ जाहिरातबाजीच्या जोरावर ग्राहकांच्या माथी मारले असून त्यांच्या प्रचंड विक्रीतून अनेक उद्योगांनी आपली भरभराटही साधली आहे, हे आता उघड होऊ लागले आहे. म्हणूनच, तुकाराम मुंढे नावाच्या या सनदी अधिकाऱ्याने सुरू केलेल्या 'महाराष्ट्र वाचवा' मोहिमेतून ग्राहकांच्या म्हणजे माणसाच्या आरोग्यास उपकारक असे काही कायमस्वरूपी निष्पन्न व्हावे अशी सामान्य माणसांची अपेक्षा आहे.

जेमतेम काही महिन्यांपूर्वी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा कार्यभार हाती घेतला आणि अशा धंद्यांवरील धाडींचे सत्र सुरू झाले. आपण वापरतो ती सौंदर्य प्रसाधने, वेगवेगळ्या आजारांपासून मुक्तता मिळविण्यासाठी किंवा जीवघेण्या आजारांच्या धोक्यापासून बचाव करण्यासाठी वापरली जाणारी औषधे, विरंगुळा म्हणून किंवा चवबदल म्हणून खाल्ले जाणारे फास्ट फूड, सणासुदीच्या काळाचा आनंद द्विगुणित करणाऱ्या स्वादिष्ट मिठाया आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, जन्माला आल्यानंतर पहिल्यांदाच ज्याची चव बाळाला चाखविली जाते, ते आरोग्यास पोषक म्हणून पूर्णान्न मानले जाणारे दूधदेखील भेसळयुक्त अथवा कृत्रिम आहे आणि अलिकडे बळावलेले अनेक आजार अशाच काही भेसळयुक्त पदार्थांमुळे होत आहेत, याची जाणीव आता जागी होऊ लागली आहे. नागपूरमधील एका प्रसिद्ध औषध कंपनीच्या नावाने कायमोरल फोर्ट नावाच्या बनावट गोळ्या बाजारात विकल्या गेल्या आणि त्या पुरवठा साखळीचा शोध सुरू झाल्यावर याचे धागेदोरे थेट मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशातील विक्रेते आणि पुरवठादारांपर्यंत पोहोचले. सौंदर्य खुलविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काही बनावट फेअरनेस क्रीम्समध्ये त्वचा आणि किडनीला हानी पोहोचविणारे घटक असल्याची बाबही प्रशासनाने आता उजेडात आणली आहे. पाकिस्तानात उत्पादन होणाऱ्या काही घातक सौंदर्य प्रसाधनांनी भारतातील बाजारपेठांत शिरकाव केल्याचेही स्पष्ट झाले.

आजकाल आपल्या गरजेच्या असंख्य वस्तू घरबसल्या मिळण्याची सोय अनेक शहरांत आणि आसपासच्या गावांतही उपलब्ध झाल्याने, मोबाईलवरील ॲपद्वारे ऑर्डर करण्याची सवय वाढत चालली आहे. गेल्या महिन्यांत अखेरच्या आठवड्यातील एके दिवशी मुंढे यांच्या आदेशावरून अन्न आणि औषध प्रशासनाच्या पथकाने ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात सरवली येथे एक कारवाई केली आणि ऑर्डर देऊन मागविलेले खाद्यपदार्थ किती धोकादायक ठरू शकतात, याचे विदारक वास्तवच स्पष्ट झाले. अमेझॉन रिटेल इंडिया नावाच्या प्रसिद्ध कंपनीच्या गोदामात या वास्तवाची पाळेमुळे रुजली होती, हे उघड झाले. ग्राहकांच्या आरोग्यास घातक ठरू शकतील असे, कालबाह्य झालेले खाद्यपदार्थ नष्ट न करता त्यांची पुन्हा विक्री करण्यात येत असल्याची माहिती मिळाली आणि पथकाने या गोदामावर कारवाई सुरू केली. या धंद्यात कंपनीने आणखीही एका धंदेवाईकास हाताशी धरले होते, हेही स्पष्ट झाले. कालबाह्य आणि आरोग्यास अपायकारक अशा अन्नपदार्थांची विल्हेवाट लावल्याची प्रमाणपत्रेदेखील खोटी असल्याचे स्पष्ट झाले. अशी खोटी प्रमाणपत्रे सादर करून प्रत्यक्षात त्या पदार्थांची विल्हेवाट न लावता त्यांची पुन्हा विक्री करणाऱ्या घरपोच सेवेचा लाभ आजवर लाखो ग्राहकांनी घेतला असेल आणि पोटातून जाणाऱ्या या पदार्थांनी कदाचित त्यांची हृदयेदेखील जिंकली असतील. आता त्यामागील सत्य स्पष्ट झाले असून, मुदतबाह्य पदार्थ ग्राहकांच्या माथी मारूनच त्याची विल्हेवाट लावली जात असल्याचेही उघड झाले आहे. नागपूरच्या एका नामांकित इस्पितळात कायदेशीर परवानगी नसलेली लाखो रुपयांची औषधे विक्रीसाठी राखून ठेवली होती आणि रुग्णांना बाहेरून औषधे आणण्याचे स्वातंत्र्य नाकारून, या यंत्रणेतून औषधे खरेदी करण्याची सक्ती केली जात होती. ग्राहकाच्या व्यवहारांवर ताबा मिळविण्याचे या धंद्याचे तंत्रदेखील या कारवाईतून उघड झाले. अगदी अलिकडे, आपल्या वैशिष्ट्यपूर्ण चवीमुळे



ग्राहकांची हृदये जिंकणाऱ्या मुंबईतील एक नामांकित आईस्क्रीम निर्मात्या कंपनीवरील कारवाईतून उघडकीस आलेले चित्र धक्कादायक आहे. या कंपनीच्या आईस्क्रीम पार्लरमध्ये जिवंत उंदरांचा सुळसुळाट, माश्यांचा स्वैर संचार, कोल्डचेनमध्ये बिघाड आणि मुदतबाह्य उत्पादने आढळून आली. नागपूरमध्ये एका मिठाई नव अन्नपदार्थ उत्पादकाच्या तपासणीत मेलेला उंदीर आढळला. या मृत उंदराच्या बाजूलाच अन्नपदार्थांचे उत्पादन सुरू असल्याचे दिसून आले. ग्राहकांच्या आरोग्याशी असा खेळ करणाऱ्या धंद्यांवरील कारवायांमुळे आता महाराष्ट्र बचाव मोहिमेविषयी लोकांच्या अपेक्षांना आश्वस्ततेची जोड मिळू लागली आहे. अन्नपदार्थांत घातक पदार्थांची भेसळ होते, बनावट औषधे, सौंदर्य प्रसाधने आरोग्यास अपायकारक असतात, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ कृत्रिमरीत्यादेखील तयार करता येतात, हे ग्राहकांच्या कानावर पडत होते. पण अशा धंद्यांवरील कारवायांचा वेग मात्र अनाकलनीयरीत्या कमी होता. आता जेमतेम चार-दोन महिन्यांतील कारवायांनी अशा काळ्या धंद्याचे कंबरडे मोडण्यास सुरुवात केल्याने, अन्न व औषध प्रशासनाच्या कारभाराचा जुना इतिहास विसरणेच योग्य ठरेल.

गेल्या आठ-दहा दिवसांत प्रशासनाच्या पथकांनी आपला मोर्चा दुधाकडे वळविला आहे. दूध न वापरणारे घर महाराष्ट्रात अपवादानेच आढळेल. देशात धवल क्रांतीचे पर्व सुरू झाले आणि दुधाचा महापूर आला. या महापुराचा तडाखा एवढा मोठा होता, की मागणीलाही प्रचंड पूर आला. दुधाचे उत्पादनही कमी ठरावे एवढ्या मोठ्या प्रमाणात मागणी सुरू झाली, तरीही दुधाचा तुटवडा मात्र कधीच जाणवला नाही. उलट, मागणी पूर्ण करून दुधाची भुकटी तयार करण्याचा उद्योगही या क्षेत्राला सापडला आणि दुधाच्या धंद्यातील अनेकांचे उखळ पांढरे झाले. दुधाचे प्रत्यक्ष उत्पादन, मागणी आणि दूध व दुग्धजन्य पदार्थांची बाजारपेठ यांचे गणित कसे जुळते याचा हिशेब मात्र फारसा झालाच नसावा. अन्यथा, ग्राहकांच्या मागणीला पुरून उरणारे दूध येते तरी कोठून हा प्रश्न सतत समाजाला छळत राहिला असता. आता प्रशासनाच्या कारवायांममुळे या प्रश्नांची अनेक उत्तरे समोर येऊ लागली असून, उत्पादन, मागणी आणि पुरवठा यांतील तफावत भरून काढणारा कृत्रिम दुधाचा धंदा तेजीत असल्याचे उघड गुपित आता पुराव्यानिशी स्पष्ट झाले आहे. राज्याच्या सात जिल्ह्यांत एकाच वेळी अत्यंत नियोजनबद्ध रीतीने छापे टाकून ग्राहकांचा आरोग्याशी खेळणाऱ्या या भेसळीच्या भस्मासुराच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात झाली आहे. पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, जालना, ठाणे व अन्य दोन जिल्ह्यांतील कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेला जवळपास तीन कोटींचा मुद्देमाल आणि हस्तगत करण्यात आलेले संशयास्पद नमुने तपासल्यानंतर, भेसळीचा काळा धंदा केवळ पाणी मिसळण्यापुरता मर्यादित नसून रसायने, डिटर्जंट. चरबी, युरिया, दूध भुकटी, शाम्पू, पामतेल, इमल्सिफायर आदी अनेक घातक वस्तूंपासून दूध तयार करून बनावटरीत्या बाजारात पुरविले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. या घातक वस्तू नैसर्गिक दुधात मिसळून किंवा या वस्तूंपासून दूध तयार करून ते पुरवठा साखळीत बेमालूमपणे आणणारे काळे धंदे महाराष्ट्रात वर्षानुवर्षे सुखाने सुरू आहेत आणि संबंधित यंत्रणेस त्याची पुरेपूर जाणीवही आहे. भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या साईबाबांच्या शिर्डीत, अनेक श्रद्धाळू बाबांचा प्रसाद म्हणून तेथील पेढे विकत घेतात. गेल्या महिन्यात या पेढ्यांच्या बाजारपेठेतील भेसळीचा भस्मासुर प्रशासनाने पकडला. सुमारे सातशे किलो भेसळयुक्त पेढे बुलडोझरच्या साह्याने नष्ट करण्यात आले. ग्राहकांच्या जिवाशी असा भयानक खेळ खेळणाऱ्या या काळ्या धंद्याला कोण संरक्षण देतो, कोणाचे पाठबळ आहे, याची उत्तरे सापडणे मात्र, अवघडच आहे. अन्न व औषध प्रशासन आता गतिमान होत असून प्रशासनाकडे दाखल होत असलेल्या प्रत्येक तक्रारीवर योग्य ती कारवाई होत आहे, अशी माहिती दोन दिवसांपूर्वी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी विधानसभेत दिली. आता गतिमान होत असलेले प्रशासन याआधी सुस्त होते, याचीच ही अप्रत्यक्ष कबुली नव्हे का?

अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपल्या संस्कृतीची शिकवण आहे. अन्नाचे सेवन करणे हे केवळ पोट भरणे नव्हे, तर यज्ञकर्म आहे, असेही म्हटले जाते. बाळाच्या बाटलीतून पाजले जाणारे व पूर्णान्न मानले जाणारे दूध, खाल्ला जाणारा अन्नाचा प्रत्येक घास आणि जीव वाचविणारी किंवा आरोग्यास पोषक ठरणारी औषधे विश्वासार्ह असलीच पाहिजेत. कारण, सुरक्षित आणि आश्वस्त जगणे हा जनतेचा पहिला हक्क असतो. त्या हक्काची जपणूक करणे ही अशा यंत्रणांची जबाबदारीच असते. त्यामुळेच, अन्न व औषध प्रशासनाने उघडलेल्या महाराष्ट्र बचाव मोहिमेचे कौतुक होणे साहजिक असले, तरी ती या यंत्रणेची जबाबदारीच आहे, हेही स्पष्ट आहे. उलट, ही जबाबदारी या यंत्रणेने याआधी एवढ्या धडाकेबाजपणे का पार पाडली नाही, हा प्रश्न आता विचारला गेला पाहिजे. तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या कारवाया केवळ प्रशासनाच्या जबाबदारीचा भाग नव्हे, तर जनतेच्या आरोग्यासमोर संकटे निपटण्याची मोहीम आहे. अशा मोहिमा म्हणजे जनतेच्या आरोग्याचा आधार असतात, मुलांच्या भविष्याची हमी असतात आणि समाजाच्या निकोप प्रगतीच्या पायऱ्या असतात. शुद्ध अन्न, गुणवत्तापूर्ण औषधे हा केवळ आरोग्याशी निगडित मुद्दा नाही, तर व्यवसायाच्या सचोटीचा, म्हणजेच समाजाच्या संस्कृतीचाही आरसा असतो. भेसळखोरीमुळे समाजाला आरोग्यसंकटाच्या खाईत ढकलणाऱ्या प्रवृत्ती सहजपणे जेथे फोफावतात आणि त्यांचे धंदे सुखैनेव सुरू राहतात, अशा समाजाच्या संरक्षणासाठी संस्कृती असमर्थ ठरते. केवळ परंपरा, संस्कृती आणि संस्काराचे पाढे वाचून हा बदल घडणार नाही. मानसिकतेशी संबंधित असलेल्या या विकृती ठेचून टाकण्यासाठी कृतिशील होण्याची गरज आहे. अन्न व औषध प्रशासन गतिमान झाल्याने त्या अपेक्षा आता वाढल्या आहेत. कोणत्याही दबावाचे किंवा सुस्तीचे निमित्त त्यामध्ये बाधा आणणार नाही, याची दक्षता घ्यायला हवी. ■

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### टी. बी. गोल्हरांचा प्रश्न म्हणजे...

पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याची कला नाही; ती समाजाला प्रश्न विचारण्याची, सत्तेला जबाबदार धरण्याची आणि सत्याला शब्द देण्याची एक अखंड साधना आहे. या साधनेचे आयुष्यभर व्रत जपणारे ज्येष्ठ पत्रकार तुळशीदास भगवंतराव (टी. बी.) गोल्हर यांचे २ जुलैला निधन झाले. यवतमाळ जिल्ह्यातील धनज-माणिकवाडा या छोट्याशा गावातून सुरू झालेला त्यांचा प्रवास नागपूरमार्गे देशाची राजधानी दिल्लीपर्यंत पोहोचला. नागपूर विद्यापीठाच्या जनसंवाद विभागातील सुवर्णपदक, विधि विषयातील पदव्युत्तर शिक्षण, नागपूर टाईम्समधील प्रारंभ, नवी दिल्लीमध्ये सर्वोच्च न्यायालयात यूएनआयचे विधि वार्ताहर म्हणून काम आणि त्यानंतर नागपूर येथे यूएनआयचे दीर्घकाळ ब्युरो प्रमुख म्हणून केलेली कारकीर्द या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी पत्रकारितेची उंची वाढवली. देशातील दिग्गज नेत्यांच्या पत्रकार परिषदांपूर्वी अनेकदा विचारणा व्हायची- ''गोल्हर सर आले आहेत का?'' आणि परिषद संपल्यानंतर दुसरा प्रश्न असायचा- ''आज त्यांनी काय विचारले?'' त्यांचा एक नेमका प्रश्न दुसऱ्या दिवशी राष्ट्रीय वृत्तपत्रांच्या मथळ्यात झळकण्याची ताकद बाळगत असे. म्हणूनच पत्रकारितेच्या वर्तुळात एक वाक्य प्रसिद्ध झाले होते- ''गोल्हरांचा प्रश्न म्हणजे... राष्ट्रीय स्तरावरची हेडलाईनच!'' गोल्हर सरांना आदरांजली.

**प्रवीण टाके**/उपसंचालक,
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर. ९७०२८५८७७७

■■■

### समतोल विकास आवश्यक

विकास समतोल असला पाहिजे, याबाबत कुणाचे दुमत असू शकत नाही. विकास म्हणजे पर्यावरणाचा समतोल राखत नागरिकांना मूलभूत सोईसुविधा पुरविणे. नागपूर शहराचा विकास झाला खरा; पण अजूनही अनेक भागांत काही मूलभूत समस्या कायम आहेत. काचीपुरा ते बजाजनगर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना महानगर पालिकेतर्फे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. येथे झोपाळ्यांपासून तरुणाईला बसण्यासाठी चांगली सोय करून देण्यात आली आहे. पण हे केवळ सौंदर्यीकरण ठरले आहे. येथे रात्री उशिरापर्यंत युवकांच्या मैफली सजतात. सौंदर्यीकरण, सिमेंट रस्ते, बागबगिचांचे सौंदर्यीकरण म्हणजे विकास म्हणता येईल का? आज अनेक वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा नाहीत. अनेक ठिकाणी उन्हाळ्यात टँकरने पाणीपुरवठा होतो. पथदिवे, कचऱ्याची समस्या आहे.

पाणी हे जीवनच. नुसतेच पाणी नाही तर ते शुद्ध मिळणे, हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. नागपुरात २४ बाय ७ पाणीपुरवठा केला जातो, हे मोठ्या दिमाखाने सांगितले जाते. वस्तुस्थिती वेगळी आहे. नव्याने अस्तित्वात येत असलेल्या वस्त्यांसमोर मोठ्या समस्या आहेत. यातील काही वस्त्या नागपूर मेट्रो रिजनच्या हद्दीत, महानगरपालिका क्षेत्राच्या बाहेर, म्हणजे ग्रामपंचायत क्षेत्रात येतात. या वस्त्यांना मूलभूत सोईसुविधा पुरविण्याची नेमकी जबाबदारी कुणाची याबाबत अजूनही अनिश्चितता आहे. महानगरपालिका क्षेत्राबाहेर येत असल्यामुळे महानगरपालिका जबाबदारीतून सुटली. आता उरला प्रश्न एनएमआरडीए आणि ग्रामपंचायतींचा. या वस्त्यांमधील नागरिक ग्रामपंचायतींमध्ये कर भरतात म्हणजे मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर निश्चित व्हायला हवी. पण ग्रामपंचायती म्हणतात, आम्ही फक्त साफसफई आणि पथदिव्यांची सोय करून देऊ. पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी आमची नाही. जिल्हा परिषद म्हणते, मेट्रो रिजनसाठी विकास शुल्क एनएमआरडीए घेते, तर पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी एनएमआरडीएची आहे. एनएमआरडीएकडून उत्तर मिळते- निधी नाही. अशा वेळी नागरिकांनी शुद्ध पाण्यासाठी कुणाकडे जावे? हिंगणा तालुक्यातील कोतेवाडा ग्रामपंचायती अंतर्गत वस्त्यांमधील नागरिक अशा जबाबदारी ढकलण्यामुळे त्रस्त झाले आहेत. डेव्हलपर म्हणतो, मी ग्रामपंचायतीला लेआऊट हस्तांतरित केले आहे. एनएमआरडीएचे आणखी एक उत्तर- संबंधित भागात अजून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आलेली नाही. काम सुरू आहे, कामाला दीड-दोन वर्षे लागतील. मग तोपर्यंत त्या भागातील नागरिकांनी पाणी ही मूलभूत गरज कशी भागवायची? लेआऊटला परवानगी मागितली, देऊन द्या. नकाशा मंजुरीसाठी आला मंजूर करा. पण पुढचा विचार कोण करणार? आज अनेक वस्त्यांना केवळ मंजुरीच मिळाली आहे. सोईसुविधा नाहीत. नागपूर शहर चारही बाजूंनी विस्तारत आहे. शहराचा विकास झपाट्याने होत आहे. परिवर्तन निसर्गाचा नियम आहे; नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवूनच हे परिवर्तन झाले पाहिजे.

**आनंद विनायक मोहरील**/७२१८२०२५०२

■■■

### ''व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्।''

ही लोकोक्ती सगळे ऐकतात. पण काहीच त्याचा अर्थ जाणतात. या उक्तीचा अर्थ असा की, या जगात असा कोणताही विषय नाही, ज्याचे निरूपण महर्षी व्यासांनी केलेले नाही. येथे ''उच्छिष्ट'' या शब्दाचा अर्थ ''उरलेले'' असा नसून, ''ज्याचा विचार केला आहे, ज्याला आपल्या ज्ञानाने स्पर्श केला आहे'' असा आहे. ही उक्ती व्यासांच्या सर्वस्पर्शी प्रतिभेची आणि भारतीय ज्ञानपरंपरेवरील त्यांच्या अमिट ठशाची साक्ष देते. महर्षी वेदव्यासांविषयी व्यक्त झालेला हा सर्वोच्च गौरव आहे.

**एवढे व्यासांनी काय रचले? :** भारतीय वाङ्मयपरंपरेत महर्षी व्यास हे केवळ एक ऋषी नाहीत, तर ते विपुल साहित्याचे शिल्पकार आहेत. भारतीय ज्ञानपरंपरा, संस्कृती आणि साहित्याचा इतिहास महर्षी व्यास यांच्या नावाशिवाय अपूर्ण आहे.

शंकराचार्यांचे प्रसिद्ध वचन आहे -
नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः॥

या श्लोकात व्यासांच्या ज्ञानाची तुलना अशा दीपाशी केली आहे, ज्याने महाभारत या तेलाने संपूर्ण मानवजातीच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पसरविला.

**वेदांचे सम्पादन :** व्यासांनी वेदांचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार विभाग केले. प्रत्येक वेदांच्या अनेक शाखा आहेत. पातञ्जली ऋषींनी लिहिलेल्या 'महाभाष्य' ग्रंथानुसार वेदांच्या ११३१ शाखा होत्या. प्रत्येक शाखेचे चार भाग आहेत - संहिता, ब्राह्मण, आरण्यक व उपनिषद्. हे कार्य केवळ संपादन नव्हते, तर भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन करणारे युगप्रवर्तक कार्य होते. म्हणूनच आषाढ पौर्णिमा हा दिवस व्यासपौर्णिमा किंवा गुरुपौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. भारतीय गुरू-शिष्य परंपरेचे ते आद्यगुरू मानले जातात.

महाभारताचे रचनाकार : महर्षी व्यासांचे सर्वांत महान कार्य म्हणजे महाभारत.

**श्रीश देवपुजारी**

■■■

### श्वास एक वारी

''आम्ही देखिला विठोबा । आनंदे विटेवरी उभा''. पंढरपूरची आषाढी वारी म्हणजे समतेचा मेळा आणि मानवतेचा सोहळा होय. ही वारी जशी जनात चालते तशी मनातही चालायला हवी. वारी म्हणजे सतत जाणे येणे. माणसाच्या शरीरात श्वासाचे अव्याहत येणे जाणे हीच खरी वारी! स्वस्थ माणूस साधारणतः २४ तासात २१६०० वेळा श्वास-प्रश्वास करतो. तेव्हा श्वासाच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित केल्यास 'सोहं' शब्द ऐकू येतो. श्वास आत घेताना 'सो' (म्हणजे 'तो' परमात्मा) असा ध्वनी होतो आणि श्वास सोडताना 'हं' (म्हणजे 'मी') असा ध्वनी होतो. हा अखंड चालणारा 'सोऽहं' जप म्हणजेच अंतरीची वारी. थोडक्यात, वेगळी माळ न ओढता किंवा नामोच्चार न करता, फक्त श्वासांच्या लयबद्धतेवर लक्ष केंद्रित करून देवाशी जोडले जाणे, म्हणजे समर्थांची अजपा वारी होय.

बाकी सगळा बाह्य पसारा. लौकिक जीवनात अनेक शास्त्रे, अनेक पंथ, अनेक धर्म, अनंतकथा, अनंत व्यथा, अनंत पुस्तके, अनंत यात्रा, इत्यादींचा परामर्श व्यक्ती घेतो. पण समर्थ म्हणतात ''बहुत शास्त्रें धुंडाळिता आयुष्य पुरेना सर्वथा, अंतरी संशयाची व्यथा वाढोची लागे'' तरीसुद्धा आपण या पसाऱ्यात गुंतून पडतो व आनंद शोधण्याचा प्रयत्न करतो तो आपला प्रयत्न दुबळा असतो. कारण हे जग अहेतुकपणे निर्माण झाले आहे. समुद्रात उठणाऱ्या लाटांचा स्वतःचा असा कोणताही हेतू नसतो. त्या वाऱ्यामुळे आपोआप निर्माण होतात. त्याचप्रमाणे हे अफाट विश्व व त्यातील जीवन निसर्गाच्या नियमांचे परिणाम आहे. उद्याचा दिवस हा निसर्गाच्या मर्जीवर अवलंबून असतो. आपण फासा फेकतो तेव्हा अमुक एक अंक येईल असे आधीपासून निश्चित नसते. आपल्याला मात्र दोन, चार, सहा, आठ दान हवे असते. आपल्या मनासारखा अंक आला तर तो फक्त योगायोग. त्याचप्रमाणे निसर्गक्रमात उद्या काय होईल हे निश्चितपणे सांगता येत नाही. चौसरच्या खेळात घरात जाणारी गोटी अकस्मात उंबरठ्यावर मरते आणि इच्छा नसूनही दूध उतू जातेच! हिंदी सिनेमातील एक गाणं आहे,

''मैं ज़िन्दगी का साथ निभाता चला गया,
हर फ़िक्र को धुएँ में उड़ाता चला गया,
बरबादियों का शोक मनाना फ़ज़ूल था!''


बरबादियों का जश्न मनाता चला गया अर्थात जे उतू गेलं त्याचाही आनंदाने स्वीकार करावा ही वारीची खरी शिकवण. आणि जीवनाबद्दल खरी हीच वास्तविकता आहे. माणसाला कदाचित उद्याचा अंदाज बांधता येऊ शकत असेल, त्यामुळे आशा असते ही आशा जीवनाचा आधार असते त्यामुळे म्हणतात ''आस पर आसमान टंगा''. आशा ही जेव्हा दुराशा होते, तेव्हा जावेच लागते. हे जाण्या येण्याचे रहाटगाडगे म्हणजे वारीच! ''पुनरपी जननं पुनरपी मरणं'' वारीतून जो मुक्ती देतो तो कैवारी म्हणजे पांडुरंग!

**अभय गोरे**/९८९३७१९२७८

■■■

### सांग सांग भोलानाथ...

हवामान खात्याने मुसळधार पावसाचा दिल्यामुळे उद्या शाळेला सुट्टी राहील, ही सूचना ऐकताच वर्गात मुले मोठ्याने ओरडून आनंद व्यक्त करतात. हा अनुभव मी शिक्षक म्हणून काम करताना अनेकदा घेतला आहे. खरं तर अचानक



आणि अनपेक्षित मिळालेली सुट्टी ही बालकांना सर्वात प्रिय गोष्ट म्हणावी लागेल. पूर्वी समाजमाध्यमे जवळपास नव्हतीच; संपर्क माध्यमेही कमी होती. त्या काळातदेखील सुट्टीची बातमी वाऱ्यासारखी पसरत असे. कधी कधी रात्री खूप उशिरा दुसऱ्या दिवशीची सुट्टी जाहीर होत असे. त्यावेळी मात्र बातमी सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसे. अशा वेळी ही बातमी न पोहोचलेले विद्यार्थी शाळेत येत असत. विद्यार्थ्यांना सुट्टी दिली असली, तरी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुट्टी नव्हती आणि आत्ताही नसते. चुकून शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांना सुट्टी आहे हे जेव्हा शिक्षक सांगत तेव्हा त्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय असे. उड्या मारतच तो भर पावसात घराकडे परतत. खरं म्हणजे अनपेक्षित मिळालेली सुट्टी म्हणजे नियमित सुट्टीपेक्षा अधिक अनमोल असते. आपल्या जीवनातही अनपेक्षित घडलेली घटना, मिळालेली भेट, झालेला लाभ हा आपणासाठी मोठा आनंददायी असतो. मात्र या पावसाच्या अनपेक्षित सुट्टीचा मोठा मनस्ताप खेड्यापाड्यावर आडवळणी राहणाऱ्या विद्यार्थ्यांना होत असतो. शाळेत येऊन शाळा नाही असे समजल्यावर तो विद्यार्थी पुन्हा चार-पाच किमी परतताना दुःखी होऊनच परतत असे. आजकाल शाळेत पायी जाणारी मुलेमुली दिसत नाहीत. पूर्वीच्या काळी सर्वच विद्यार्थी पायी जात. त्यांना मिळालेली सुट्टी म्हणूनच त्यांना अनपेक्षित भेट वाटत असे. 'सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय, शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल काय?' हे बालगीत म्हणूनच सर्व बालकांचे प्रिय गाणे असावे.

**सुदाम कृष्णाजी विश्वे**/पुणे. ९८६०५८६१४७

### मन हरवते तेव्हा व्यसन सापडते


आज प्रत्येक पालक आपल्या मुलांनी चांगले शिकावे, मोठे व्हावे, आयुष्यात यशस्वी व्हावे यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहे. मात्र या धावपळीत एक प्रश्न नकळत मागे पडत आहे- आपल्या मुलांचे मन खरोखर आनंदी आहे का? आजचा तरुण बुद्धिमान आहे, स्वप्नाळू आहे आणि मोठी झेप घेण्याची क्षमता त्याच्यात आहे; त्याच वेळी तो स्पर्धा, अपेक्षा, अपयशाची भीती, करीअरची अनिश्चितता, बेरोजगारी, नातेसंबंधांतील तणाव आणि सोशल मीडियावरील आभासी जगाच्या दडपणाखाली जगत आहे. मानसिक आरोग्य म्हणजे केवळ मानसिक आजार नसणे नव्हे. संकटांना धैर्याने सामोरे जाणे, स्वतःच्या भावनांना समजून घेणे, अपयश पचवून पुन्हा उभे राहणे, नातेसंबंध जपणे आणि जीवनाबद्दल आशावादी दृष्टी ठेवणे म्हणजे मानसिकदृष्ट्या निरोगी असणे. शरीराला जशी जखम होते, तशीच जखम मनालाही होते; फरक एवढाच की मनावरील जखमा अनेकदा दिसत नाहीत. अशा वेळी काही तरुण चुकीचा आधार शोधतात आणि व्यसनाची सुरुवात होते. आज व्यसनाचा चेहरा बदलला आहे. दारू, तंबाखू आणि अमली पदार्थ सोबतच मोबाईल, सोशल मीडिया, ऑनलाईन गेम्स आणि इंटरनेटचे अतिरेकी आकर्षण तरुणांच्या मानसिक आरोग्याला पोखरत आहे. तथापि, व्यसन हे अनेकदा मूळ समस्या नसते; ते मनातील वेदनेचे, एकाकीपणाचे आणि असहायतेचे लक्षण असते. जेव्हा मनाला आधार मिळत नाही, तेव्हा व्यसनाचा हात सहज पुढे येतो. परंतु हा आधार खोटा असतो, हे जाणून घ्या. व्यसन अख्ख्या कुटुंबाची मानसिक शांतता हिरावून घेते. या समस्येवर उपाय फक्त व्यसनमुक्ती केंद्र नाही तर त्याची सुरुवात घरातून व्हायला हवी. मुलांना केवळ पैसा, मोबाईल किंवा सुविधा नकोत; त्यांना वेळ, विश्वास आणि संवाद हवा असतो. अनेकदा पालकांनी न बोलता ऐकले, तरी अर्धी समस्या सुटते. शाळा-महाविद्यालयांनीही गुणांच्या शर्यतीबरोबर विद्यार्थ्यांच्या मनाची काळजी घ्यायला हवी. समुपदेशन, योग, खेळ, कला, वाचन आणि जीवनकौशल्य यांना शिक्षणाइतकेच महत्त्व दिले पाहिजे. गरज आहे ती व्यसनाविषयी भीती निर्माण करण्याची नाही, तर मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याची. प्रत्येक घरात मनाविषयी मोकळेपणाने बोलले गेले, प्रत्येक पालकाने मुलांसाठी थोडा वेळ दिला, प्रत्येक शिक्षकाने विद्यार्थ्याला समजून घेतले आणि प्रत्येक तरुणाने मदत मागण्यास संकोच केला नाही, तर अनेक आयुष्ये व्यसनाच्या अंधारातून बाहेर येऊ शकतील. आपण मुलांना यशस्वी होण्याचे धडे देतो; आता त्यांना आनंदी राहण्याचेही धडे देऊया. कारण यशस्वी माणूस समाज घडवतो, देशाची खरी संपत्ती उंच इमारती, आधुनिक तंत्रज्ञान किंवा आर्थिक विकास नसतो; तर मानसिकदृष्ट्या सक्षम, संवेदनशील आणि सुसंस्कृत तरुणाई असते. त्या तरुणाईचे मन जपणे ही आज प्रत्येक कुटुंब, समाज आणि शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण... मन निरोगी असेल, तरच भविष्य उज्ज्वल असेल.

**मंजुळा हाडके-दळवी**/औंध-पुणे

■■■

### जागरूक वारी निर्मूया...

'पंढरीचा महिमा । देतां आणिक उपमा ॥' संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातून पंढरपूर वारीचा महिमा लक्षात येतो. सध्या राज्यातून विठ्ठलाच्या भेटीस अनेक संत पालखींचे प्रस्थान होत आहे. अनेक दिंड्या विठ्ठल नामाचा गजर करत यात सहभागी होतात. यात युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. निर्मल वारी दिंडीमध्ये पाणी, वीज तसेच शौचालय सुविधातून स्वच्छता राखून निर्मल वारी संपन्न केली जाते. जल दिंडी ही दिंडी साधारण कार्तिकी एकादशीला राज्यभरातून निघते. ही दिंडी नदींच्या मार्गे निघते. यात पाणी बचत, जल प्रदूषण रोखणे व पर्यावरण महत्त्व लोकांमध्ये रुजवणे हेतू असतो. संविधान समता दिंडीमधून संविधान सर्वांपर्यंत पोहोचावे उद्देशाने संविधान समता दिंडी महाराष्ट्रभर समाजकल्याण विभाग बार्टीमार्फत काढली जाते. समता दिंडीतून राज्यातील पुरोगामी विचार संस्था, पत्रकार, साहित्यिक, कलावंत, शिक्षक सहभागी होत समाजाचे प्रबोधन करतात. ग्राहक जनजागृती दिंडी काही ठिकाणी काढली जाते. वृक्ष दिंडीमधून लोकांना पर्यावरण



संरक्षण, संगोपनाबाबत जागरूक केले जाते. अक्षर दिंडीतून हौशी कलाकार संतांचे अभंग हाताने लिहून फलक घेऊन सहभागी होतात. प्रबोधन दिंडीतून ग्रामसेवक, तलाठी सहभागी होतात. बीज दिंडीमध्ये शेतकऱ्यांसाठी विविध बियाणे त्यांचे संवर्धन विदित केले. विविध ग्रंथांचे समाजाला ज्ञान मिळावे या उद्देशाने ग्रंथ दिंडी काढली जाते. विद्यार्थी दिंडी शाळा-महाविद्यालयातून काढली जाते. अशा अनेक दिंड्या वारीत सहभागी होऊन राष्ट्र उद्धाराचे कार्य आपल्या हातून होईल यासाठी प्रयत्न केला जातो. युवकांचा यात सहभाग अधिक मोठ्या संख्येने वाढल्यास वारी परंपरा अधिक जागरुक होईल.

**विठ्ठल वळसे पाटील**/पुणे. ८४८४०६६०४२

■■■

### त्याग आणि भोग

सर्वसामान्य माणसाला एक चाकोरीबद्ध जीवन जगण्याची सवय झालेली असते. बाल्य, तारुण्य, वृद्ध या सगळ्या अवस्थातून तो आपल्याला जमेल तशा आणि जमेल तितक्या प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न करतोच. प्रापंचिक जबाबदाऱ्यांना प्राधान्य देतो. त्यानंतर देव-धर्मालाही वेळ देतो. प्रवाहाबरोबर जाणे त्याला सुरक्षित वाटते. प्रवाहाबाहेरची संकटे, संघर्ष, कष्ट, त्याचे होणारे परिणाम आणि ते सहन करण्याची ताकद त्यात नसतेच; म्हणूनच तो प्रवाहाबरोबर वाहत जातो. असे असले, तरी प्रवाह सोडून आपला स्वतःचा स्वतंत्र प्रवाह निर्माण करणारे अनेक महाभाग आहेत. अशा प्रकारच्या लोकांमध्ये साधू-संत, विचारवंत, कलाकार, गायक, चित्रकार, गणिका यांचा समावेश होतो. यातही दोन प्रकारचे लोक असतात. काही त्यागी तर काही भोगी. ते मात्र स्वानंद महत्त्वाचा मानतात. मी जे करणार आहे ते प्रामाणिकपणे करणार आहे असे त्यांचे ठाम मत असते. मला आठवण झाली ६० च्या दशकातील 'चित्रलेखा' या चित्रपटाची... मगध साम्राज्यातील एक तपस्वी, योगी कुमारगिरी आणि एक राजनर्तकी आणि गणिका असलेल्या चित्रलेखा यांच्यातील संघर्ष पराकोटीला जातो. योग्याच्या त्यागाला भोगाने जिंकू पाहणारी चित्रलेखा आपल्या वागणुकीतून आणि गाण्यातून पाप-पुण्याच्या कल्पनेला छेद देते. खरे तर प्रत्येकाने आपापला नित्य आचरणातला धर्म प्रामाणिकपणे पाळला पाहिजे; पण तसे होत नाही तर त्या आचरणावरच धर्माचा शिक्का मारला जातो आणि त्यातूनच पाप-पुण्य या कल्पनेचा जन्म होतो. त्यानंतर जीवन जगणं सहज सोपं राहात नाही. मग सुरू होतो मानसिक, शारीरिक, भावनिक संघर्ष. आपल्या नृत्यकलेतून राजाला आणि इतरांना घटकाभर समाधान देणे, सुख देणे हा राजनर्तिकेच्या आयुष्याचा आणि आचरणाचा एक भाग परंतु धर्माने त्याच्यावर भोग आणि पापाचा शिक्कामोर्तब केले. दुसरीकडे एक तपस्वी, संन्यासी आपली तपःसाधना करतो तेही तो स्वखुशीने किंवा कदाचित मन मारूनही करत असेल. परमात्मप्राप्ती हे त्यांचे ध्येय, परंतु त्याच्या साधनेवर त्याग आणि पुण्याचे शिक्कामोर्तब केले जाते. एकूण काय, समाजमन कुणालाच मनाप्रमाणे जगू देत नाही. दोन्ही गोष्टी कधी स्वखुशीने घडतात तर कधी परंपरेने तर कधी स्वतःच्या मनाविरुद्धही स्वीकाराव्या लागतात. माणूस आजही संभ्रमावस्थेत आणि संघर्षातच जगतो आहे. त्याग-भोग, पाप-पुण्य या कल्पना त्याचा पिच्छा सोडायला तयार नाहीत. म्हणूनच रामदास स्वामी म्हणतात, 'आधी प्रपंच करावा नेटका, मग घ्यावे परमार्थ विवेका'.

**लता पाध्ये**/हिमायतनगर. ९४२२५३३७०५

■■■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### संभाजीराव शिंदे प्रशालेचे राज्य 'युग मून दो' स्पर्धेत यश

**सोलापूर, दि. ११ जुलै-**

क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक यांच्या वतीने पंचवटी (नाशिक) येथे झालेल्या राज्य शालेय युग मून दो स्पर्धेत येथील संभाजीराव शिंदे प्रशाला विडी घरकुलच्या चार खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. १७ वर्षांखालील वयोगटात सोनाक्षी मोहन माडे हिने (४२ किलो वजन गट) आणि श्रद्धा तानाजी सरवदे हिने (३८ किलो वजन गट) उत्कृष्ट खेळ करत प्रथम क्रमांक मिळवला. तसेच १४ वर्षांखालील वयोगटात वैभव नरसिंग माडे (३८ किलो वजन गट) आणि वेदांत संतोष सोमा (३५ किलो वजन गट) यांनी तृतीय क्रमांक पटकावला. सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक नरुटे, कलशेट्टी आणि क्रीडा प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष आमदार देवेंद्र कोठे, नगरसेवक प्रथमेश कोठे, संचालिका डॉ. राधिका चिलका आणि प्रभारी मुख्याध्यापक सतीश मल्लाव यांनी सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.



### श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये जागतिक लोकसंख्या दिन साजरा

**सोलापूर, दि. ११ जुलै -**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल,हत्तुरे नगर येथे जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे होते .सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजनानंतर भाग्यश्री स्वामी, प्रणिती खसकी, समृद्धी वारकड, साधना पटणे, रेणुका गुरव, भीमबाई जमादार, रितिका राऊतराव, आराध्या कलबुर्गी, गौरी कल्लूरकर, आकांक्षा जाधव, सखु वाघमारे, तमन्ना जमादार, लक्ष्मी माने, अंकीता शेंडगे या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. यावेळी व्याख्याते श्रीनिवास कोलप्याक यांनी जागतिक लोकसंख्या दिनाविषयी माहीती देताना लोकसंख्येची आकडेवारी व संख्यावाढीच्या समस्या,जन्म दर,मृत्युदर,लोकसंख्येची घनता याविषयी विविध उदाहरणे देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्ष रमेश दिंडोरे यांनी जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त लोकसंख्यावाढीचा इतर घटकावर परिणाम कसा होतो याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म ार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे, बसवराज कोरे, भारत राऊत अनिलकुमार गावडे,अमरनाथ कदारे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिता हौदे यांनी केले. संजना बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले. रमेश आगवणे यांनी आभार मानले.



### आरोग्य केंद्रात लहान मुलांच्या लस त्वरित उपलब्ध करा

**सोलापूर, दि. ११ जुलै-**

शहरातील आरोग्य केंद्रामध्ये लहान मुलांना देण्यात येणाऱ्या रोटाव्हायरस लस आणि आयपीव्ही लस जे गंभीर अतिसार आणि पोलिओ प्रतिबंधक असून मागील दोन महिन्यांपासून उपलब्ध नाहीत. याची तक्रार काही नागरिकांनी केली असता, संभाजी आरमार च्या वतीने सोलापूर महानगरपालिकेच्या उपआयुक्त विणा पवार यांना निवेदन देत या लसींचा पुरवठा लवकरात लवकर करावा आणि उपलब्धतेनुसार साठवणूक करण्याचे आदेश संभंधित अधिकाऱ्यांना देण्यात यावे. यावेळी संभाजी आरमारचे सरचिटणीस गजानन जम दाडे, सागर ढगे, राज जगताप, सतीश सारोळे, प्रदीप मोरे, सुधाकर करणकोट, शुभम खंडागळे उपस्थित होते.



### जैन सोशल ग्रुप सेंट्रल तर्फे गोशाळेच्या पत्राशेडचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ११ जुलै-**

विजापूर रोड येथील इंचगिरी मठातील गोधन विकास गोशाळेत जैन सोशल ग्रुप सेंट्रलच्या सदस्यांनी दिलेल्या देणगीतून २३ गोम ातांच्या निवाऱ्यासाठी उभारण्यात आलेल्या पत्राशेडचे उद्घाटन देणगीदारांच्या हस्ते संपन्न झाले.उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी गोमातेचे विधिवत पूजन करून हिरवा चारा अर्पण केला. यावेळी गोसेवा, गोसंवर्धन आणि भारतीय संस्कृतीतील गोमातेचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या कार्यक्रमास जैन सोशल ग्रुप सेंट्रलचे संस्थापक केतन शहा, देणगीदार मोहन लोढा, वैशाली कुलकर्णी, पुष्पलता महाराज (इंचगिरी मठ), वरुण कुलकर्णी, डॉ. पारपल्लीवार, राजेश वडी शेरला आणि शुभम यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आशिया व्हॉलीबॉल कप; भारताला कांस्य


## महाराष्ट्राच्या ओम लाडचा समावेश; सोलापुरात गौरव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जुलै -**

अहमदाबाद येथे झालेल्या आशिया व्हॉलीबॉल कप स्पर्धेत भारतीय संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तिसरा क्रमांक पटकावला आणि कांस्यपदक जिंकले. या भारतीय संघात महाराष्ट्र राज्यातील एकमेव खेळाडू ओम लाड याने सहभाग घेतला होता. त्याने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर संघाला पदक मि ळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

व्हॉलीबॉलच्या इतिहासात पहिल्यांदाच महाराष्ट्रातील एका खेळाडूने भारतीय संघातून खेळून पदक मिळवून दिले आहे. ओम लाड हा पाडेगाव (ता. कर्जत, जिल्हा अहिल्यानगर) येथील आहे. सध्या चेन्नई येथे इंडियन ओव्हरसीज बँकेत कार्यरत असून, त्याने अत्यंत कमी वयात भारतीय संघात स्थान मिळवले आहे.

त्याच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल



व्हॉलीबॉल संघटना, सोलापूर आणि प्रो स्पोर्ट्स फाऊंडेशन, सोलापूर यांच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. जपान येथे होणाऱ्या आगामी सिनियर एशियन व्हॉलीबॉल स्पर्धा आणि एशियन गेम्ससाठी त्याला या प्रसंगी शुभेच्छा देण्यात आल्या.

या सत्कार समारंभाला आंतरराष्ट्रीय रेफ्री अनिल गिराम, महावितरणचे डेप्युटी एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर संजय वाघमारे, तसेच राष्ट्रीय खेळाडू सोहेल पठाण, सुमित बचुटे, मलिक नदाफ आणि सागर अचलकर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी ओम लाडचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# उपवर्गीकरणाविरोधात २७ जुलैला महामोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जुलै -**

अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण लागू करण्याच्या राज्य सरकारच्या भूमिकेविरोधात सोमवार दि. २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सोलापुरात महामोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समि तीच्या वतीने कामगार नेते जनार्दन शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा मोर्चा सकाळी ११ वाजता न्यू बुधवार पेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातून सुरू होऊन पुनम गेट येथे सभेने समाप्त होणार आहे. महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या ५९ जातींना गेल्या अनेक दशकांपासून १३ टक्के आरक्षणाचा लाभ मिळत आहे. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निकालानंतर राज्य सरकारने माजी न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. मात्र, या समि तीने अनुसूचित जातींतील सर्व घटकांचे प्रतिनिधित्व न घेता अहवाल तयार केल्याचा आरोप समितीने केला. त्यामुळे राज्यातील विविध अनुसूचित जातींमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असल्याचेही पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस कुम ार चन्ना, सचिन गुळग, राजा सोनकांबळे, प्रशांत गोणेवार, प्रवीण कांबळे, अतिश बनसोडे, कमलाकर बनसोडे, सिद्धार्थ कांबळे उपस्थित होते.



# सोलापूर एज्युकेशन सोसायटीच्या चेअरमनपदी सीए जवळगेकर

## उपाध्यक्षपदी राजीव देसाई यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

सोलापूर एज्युकेशन सोसायटीच्याकार्यकारिणीच्यासभेत संस्थेच्या पुढील कार्यकाळासाठी चेअरमनपदी सीए विजय रविंद्रनाथ जवळगेकर आणि व्हाईस चेअरमनपदी राजीव रणजित देसाई यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

संस्थेचे सेक्रेटरी ॲड. विजय मराठे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत ही निवड करण्यात आली. यावेळी संचालक ॲड. उमेश मराठे, प्रशांत देगांवकर, मयुर करवा आणि मनीष आराध्ये उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष रणजित देसाई आणि उपाध्यक्ष डॉ. सतीश परशुरामी यांनीही दोन्ही पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची शैक्षणिक व सर्वांगीण प्रगती अधिक गतिमान होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# शहा कोठारी प्रशालेत पालक शिक्षक सहविचार सभा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जुलै -**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल मध्ये प्रशालेचे मुख्याध्यापक श्री रमेश यादवाड यांच्या अध्यक्षतेखाली पालक शिक्षक सहविचार सभा संपन्न झाली. या सभेत शाळा व्यवस्थापन समिती, माता पालिका समिती व विविध समित्यांचे स्थापन करण्यात आले.


शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व मान्यवरांच्या शुभहस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे व सर्व समिती सदस्यांचे सत्कार करण्यात आले.यावेळी प्रशालेतील



श्री नितीन नायब यांनी विद्यार्थ्यांचे शिस्त संस्कार याविषयी तर श्री अतुल जानापुरे यांनी स्कॉलरशिप परीक्षा इतर स्पर्धा परीक्षा तसेच श्री रितेश मेहता यांनी प्रशालेतील ज्यादा तास, विद्यार्थी उपस्थिती व अभ्यासाविषयी मार्गदर्शन केले.

पालक सौ. स्वाती जानराव यांनी प्रशालेत च्या यशाचे कौतुक केले प्रशालेचे मुख्याध्यापक श्री रमेश यादवाड यांनी प्रशालेतील विविध उपक्रम कार्यक्रमाविषयी व प्रशालेस मिळालेल्या यशाचे माहिती उपस्थित पालकांना सांगितले.

या पालक शिक्षक सहविचार सभेस मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.यावेळी प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक श्री सुधीर दुर्गे तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री बगले एस. एम.तर आभार श्रीमती शिंदे एस. एस.यांनी मानले.



# क्रिकेट करिअरसोबतच मुलांचा 'बी प्लॅन' ही तयार ठेवा

## निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीच्या पालक शिबिरात निवड समितीचे चेअरमन राजेंद्र गोटे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जुलै -**

'मुलांच्या क्रिकेट करिअरला पाठबळ देत असतानाच, पालकांनी आपल्या पाल्याचा शैक्षणिक किंवा पर्यायी 'बी प्लॅन' देखील तयार ठेवावा, जेणेकरून भविष्यात त्यांना त्याचा मोठा फायदा होईल,' असे आवाहन १४ वर्षांखालील वयोगट निवड समितीचे चेअरमन राजेंद्र गोटे यांनी केले.

माणिक चौक येथील सात्विक हॉलमध्ये पालकांनी आपल्या पाल्याचे क्रिकेटमधील करिअर कसे घडवावे, याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीच्या वतीने विशेष 'पालक शिबिरा'चे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेबर्सो यांनी जिल्हा पातळीवर खेळाडूंची निवड कशी होते, याची सविस्तर प्रक्रिया पालकांना सम जावून सांगितली. 'क्रिकेटमध्ये मुलांचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी कोचच्या मार्गदर्शनासोबतच पालकांनीही आपली जबाबदारी योग्य पद्धतीने निभावणे गरजेचे आहे,' असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी भारतीय स्टेट बँकेचे अधिकारी धनंजय होनमाने, ॲक्सिस बँकेचे अधिकारी नवनाथ पाटील, प्रसिद्ध व्यावसायिक दत्तात्रेय भूमकर, रेल्वे युनियनचे नेते मनोज वाल्मिकी, अनुज कुमार चौधरी, शिरीष लोखंडे, प्रदीप टकले, बजरंग पवार, रवीकुमार वर्मा, सामाजिक कार्यकर्ते राहुल सर्वगोड, अविनाश चव्हाण, सिद्धेश्वर सरवदे आणि डॉ. कैलाश मुंदडा, राजू रंगम उपस्थित होते. प्रा. वाल्मीक कीर्तीकर यांनी प्रास्ताविक केल. ॲकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक निलेश गायकवाड यांनी या शिबिरामागची भूमिका आणि त्याचे म हत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू गायकवाड यांनी केले. विनोद पाटील यांनी आभार मानले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विनोद पाटील, राजेंद्र सिंग बोमरा, राहुल म्हेत्रे, मल्लिनाथ कापसे, दीपक सुरवसे, आनंद पाटील, नितीन टेकाळे आणि सुशील कन्ना यांनी परिश्रम घेतले.

# रुग्णांची आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी कठोर उपाययोजनांची गरज

## एफडीए आयुक्तांकडे एम. ए. निरोटे यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जुलै-**

औषध विक्रीतील गैरप्रकार, रुग्णांची आर्थिक फसवणूक आणि जनरिक औषधांच्या वापराला चालना देण्यासाठी राज्य अन्न व औषध प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जिल्हा परिषद सोलापूरचे विस्तार अधिकारी (आरोग्य) एम. ए. निरोटे यांनी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात खासगी रुग्णालयांमध्ये विशिष्ट ब्रँडचीच औषधे लिहून देऊन ती संबंधित हॉस्पिटलच्या मेडिकल स्टोअरम धूनच खरेदी करण्यास रुग्णांना भाग पाडले जात असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. त्यामुळे रुग्णांना जास्त किंमत मोजावी लागत असून या प्रकारावर नियंत्रण ठेवण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

ब्रँडेड औषधांच्या किमतींवर नियंत्रण ठेवून जनरिक औषधांचा वापर वाढविणे, हॉस्पिटल परिसरातील मेडिकल स्टोअर्सम धील गैरप्रकारांवर कारवाई करणे, तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेअंतर्गत रुग्णांकडून औषधांसाठी घेतली जाणारी रक्कम परत न करण्याच्या प्रकारांची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय सर्जिकल साहित्यावरील किंमत स्पष्टपणे नमूद करणे बंधनकारक करावे, सर्व मेडिकल स्टोअर्समध्ये जनरिक औषधे उपलब्ध ठेवावीत, डॉक्टरांनी रुग्णांना जनरिक औषधांचा पर्याय सुचवावा, तसेच जनरिक औषधे व शासकीय रुग्णालयांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या औषधांच्या गुणवत्तेची नियमित तपासणी करावी, अशा सूचनाही निवेदनात करण्यात आल्या आहेत.

रुग्णांना दर्जेदार, सुरक्षित आणि परवडणारी औषधे उपलब्ध व्हावीत तसेच औषध विक्रीतील गैरप्रकारांना आळा बसून आरोग्य व्यवस्थेतील पारदर्शकता वाढावी, यासाठी प्रशासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा एम. ए. निरोटे यांनी व्यक्त केली आहे.

# सोलापुरात आज अल्पसंख्यांक समाज जागरुकता मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जुलै-**

शहर शिवसेना अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने ''शिक्षण, स्वावलंबन आणि सशक्तीकरणाकडे एक पाऊल'' या संकल्पनेवर आधारित अल्पसंख्यांक समाज जागरूकता मेळावा रविवार १२ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता इम्पेरियल पॅलेस येथे होणार आल्याची माहिती शहर प्रमुख अब्दुल गफूर शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मेळाव्यात महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना दिली जाणार आहे.

यामध्ये उच्च व व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, बारावीनंतरच्या शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य, वसतिगृह सुविधा, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या स्वयंरोजगार व व्यवसाय कर्ज योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, म हाडीबीटी शिष्यवृत्ती, महिला उद्योजकता प्रोत्साहन तसेच परदेशातील उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य आदी योजनांचा समावेश आहे.

या पत्रकार परिषदेस रजाक मुजावर, सलाउद्दीन शेख, एजाज शेख आदी उपस्थित होते.

# कंत्राटी सहकाऱ्याच्या कुटुंबासाठी मनपा शिक्षण विभागाचा माणुसकीचा हात

## पाच लाखांचा मदतनिधी केला सुपूर्द

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

समग्र शिक्षा अभियानांतर्गत कंत्राटी पद्धतीवर कार्यरत असताना निधन झालेल्या कै. सौदागर गोविंदराव वाघमारे यांच्या कुटुंबाच्या मदतीसाठी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळातील अधिकारी, कर्मचारी आणि महानगरपालिकेच्या शाळांतील शिक्षकांनी पुढाकार घेत सुमारे पाच लाखांचा मदतनिधी सुपूर्द करून माणुसकीचा हात दिला.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत विषय साधन व्यक्ती म्हणून कंत्राटी पद्धतीवर कार्यरत असलेले कै. सौदागर गोविंदराव



वाघमारे यांचे दि. १६ मे २०२६ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

कै. वाघमारे यांनी कंत्राटी सेवेत कार्यरत असतानाही अत्यंत प्रामाणिकपणे काम केले. त्यांनी आपल्या दोन्ही मुलींना वैद्यकीय शिक्षण देऊन डॉक्टर बनविले. मात्र, कंत्राटी सेवेमुळे त्यांच्या निधनानंतर शासनाकडून कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ उपलब्ध नसल्याने त्यांच्या कुटुंबासम ोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. ही बाब लक्षात घेऊन मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर येथील प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांनी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच महानगरपालिकेच्या सर्व शाळांतील शिक्षकांना मदतीचे आवाहन केले. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत सुमारे पाच लाख रुपयांचा मदतनिधी संकलित करण्यात आला. या निधी संकलन मोहिमेत समग्र शिक्षा अभियानातील सर्व विशेष विषय साधन व्यक्ती, विशेष शिक्षक तसेच अश्विनी लांबतुरे, केंद्रीय मुख्याध्यापक यांचे सहकार्य लाभले. संकलित मदतनिधी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, नियंत्रण अधिकारी शिक्षण विभाग तथा मुख्य लेखाधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांच्या हस्ते कै. सौदागर वाघमारे यांच्या कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आला.

याप्रसंगी प्रशासन अधिकारी मल्हारी माने, पर्यवेक्षक मनीष बांगर, रजनी राऊळ, सुरेश कासार, निलोफर सय्यद, सर्व पर्यवेक्षक, तसेच समग्र शिक्षा अभियानाचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी रियाज अत्तार, समन्वयक समावेशित शिक्षण अविनाश शिंदे, अमोल गायकवाड, ज्ञानेश्वर गरड, सुवर्णा गुरव, लक्ष्मण पुजारी, गुरुप्रसाद तलवार आदी उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**पिट लाईन लायटिंगचे काम**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी खालील कामांसाठी नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक : SUR/L/T/2026/11 कामाचे नाव : सोलापूर विभागातील (सोलापूर) आणि (कलबुर्गी) कोचिंग कॉम्प्लेक्स येथील पिट लाईन लायटिंग व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भातील विद्युत सामान्य सेवा भागाचे काम. अंदाजित खर्च : ४५,१२,७९३.६५/-, बयाणा रक्कम : ९०,३००/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी : ०६ महिने, ऑफरची वैधता : ६० दिवस वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: ०५/०८/२०२६ रोजी १५.०० वाजता. बिड सुरक्षा खर्च : www.ireps.gov.in या वेबसाइटवर ई-पेमेंट द्वारे भरला जावा.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य)**
३३ **सोलापूर, मध्य रेल्वे**

**सुरक्षित प्रवास करा, पायऱ्यांवर प्रवास करणे टाळा.**



## महत्त्वाचे

### फुटबॉल संघ जाणार न्यूझीलंड दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** भारतीय पुरुष फुटबॉल संघ नोव्हेंबर २०२६ मध्ये न्यूझीलंडचा पहिला दौरा करणार आहे. हा संघ यजमान न्यूझीलंडविरुद्ध दोन आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामने खेळेल. अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने शनिवारी ही अधिकृत घोषणा केली. हे दोन्ही सामने फिफा आंतरराष्ट्रीय सामना विंडो दरम्यान खेळले जातील. पहिला सामना १२ नोव्हेंबर रोजी ऑकलंडमधील गो मीडिया स्टेडियमवर, तर दुसरा सामना १५ नोव्हेंबर रोजी क्राइस्टचर्चमधील वन न्यूझीलंड स्टेडियमवर खेळला जाईल. २००५ नंतर ओशनिया फुटबॉल कॉन्फेडरेशनच्या सदस्य देशाचा हा भारताचा पहिला दौरा असेल. यापूर्वी, भारतीय संघाने २००५ मध्ये फिजीविरुद्ध दोन आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामने खेळले होते.

### सर्वेश कुशारे तिसऱ्या स्थानी

**मोनॅको :** भारतीय उंच उडीपटू आणि राष्ट्रीय विक्रमधारक सर्वेश कुशारेने मोनॅको येथे आपल्या डायमंड लीग पदार्पणात तिसरे स्थान पटकावले. यामुळे तो या प्रतिष्ठित स्पर्धेत पहिल्या तीनमध्ये स्थान मिळवणारा चौथा भारतीय ठरला आहे. या ३१ वर्षीय खेळाडूने २.१२ मीटर, २.१६ मीटर, २.२० मीटर, २.०२३ मीटर आणि २.२६ मीटर अशी उडी मारली. परंतु, अनेक स्टार खेळाडूंचा समावेश असलेल्या या स्पर्धेत २.२८ मीटरची उंची पार करण्याचे तीन प्रयत्न अयशस्वी ठरल्याने त्याला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. असे असूनही, गेल्या महिन्यात राष्ट्रीय आंतर-राज्य चॅम्पियनशिपमध्ये २.३१ मीटरचा राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करणाऱ्या कुशारेने, भालाफेक सुपरस्टार नीरज चोप्रा, लांब उडीपटू मुरली श्रीशंकर आणि माजी थाळीफेकपटू विकास गौडा यांच्यानंतर डायमंड लीगमध्ये पहिल्या तीनमध्ये स्थान मिळवणारा चौथा भारतीय खेळाडू होण्याचा मान मिळवला आहे.

### एविअन चॅम्पियनशिपमध्ये अदितीचा विक्रम

**एविअन-ले-बेन्स (फ्रान्स) :** भारतीय गोल्फर अदिती अशोकने दुसऱ्या फेरीत एक-अंडर ७० गुणांसह अमुंडी एविअन चॅम्पियनशिपमध्ये कट पार केला आहे. लेडीज युरोपियन टूरची पाच वेळा विजेती असलेल्या अदितीने ३६ होल्सनंतर दोन-अंडर पार गुणांसह ३८ व्या स्थानावर बरोबरी साधली आहे. अदिती तिच्या ३८ व्या मेजर स्पर्धेत खेळत आहे. ■

# स्पेनचा बेल्जियमवर २-१ ने विजय, उपांत्य फेरीत प्रवेश

## फॅबियन रुईझ, मेरिनो यांची शानदार खेळी, पुढील लढत फ्रान्सशी

**लॉस एंजेलिस, ११ जुलै**

स्पेनने फिफा विश्वचषक २०२६ च्या दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात बेल्जियमला २-१ ने पराभूत करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. लॉस एंजेलिस स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या रोमांचक सामन्यात स्पेनसाठी फॅबियन रुईझ आणि मिकेल मेरिनो यांनी गोल केले, तर बेल्जियमसाठी चार्ल्स डी केटेलेअरने एकमेव गोल केला. आता स्पेनचा सामना उपांत्य फेरीत गतविजेत्या फ्रान्सशी १५ जुलैला होईल. हा सामना डॅलस स्टेडियमवर खेळला जाईल.

स्पेनचे प्रशिक्षक लुईस डी ला फुएंते यांनी पेद्रीच्या जागी फॅबियन रुईझला सुरुवातीच्या अकरा खेळाडूंमध्ये स्थान देऊन सर्वांना आश्चर्यचकित केले. त्यांचा हा निर्णय योग्य ठरला. सामन्याच्या ३० व्या मिनिटाला, बेल्जियमचा गोलरक्षक थिबॉ कोर्तुआने डॅनी ओल्मोचा पहिला शॉट अडवला, परंतु परत आलेल्या चेंडूवर फॅबियन रुईझने शानदार गोल करून स्पेनला १-० अशी आघाडी मिळवून दिली. युवा स्टार लॅमिन यामलने एक उत्तम संधी निर्माण केली, पण त्याचा शॉट पोस्टच्या अगदी बाजूने गेला.

पहिला हाफ संपण्यापूर्वी बेल्जियमने शानदार प्रत्युत्तर दिले. केविन डी ब्रुयनने टिमोथी कॅस्टाग्नेला एक अप्रतिम थ्रू पास दिला. ४१ व्या मिनिटाला चार्ल्स डी केटेलेअरने कॅस्टाग्नेच्या अचूक क्रॉसवर हेडर मारून गोल केला आणि गोलसंख्या १-१ अशी बरोबरीत केली. पहिला हाफ याच गोलसंख्येवर संपला.



स्पेन आणि बेल्जियम यांच्यातील विश्वचषक उपांत्यपूर्व फुटबॉल सामन्यादरम्यान, स्पेनचा आयमेरिक लॅपोर्ट (१४) रोड्री (१६) कडे चेंडू हेडर मारत असताना बेल्जियमचा रोमेलू लुकाकू (९) आश्चर्याने पाहताना

**८८ व्या मिनिटाला विजय निश्चित**

दुसऱ्या हाफमध्ये दोन्ही संघांनी अनेक संधी निर्माण केल्या, पण निर्णायक क्षण ८८ व्या मिनिटाला आला. बेल्जियमचा अनुभवी गोलकीपर थिबॉ कोर्तुआ ७१ व्या मिनिटाला दुखापतग्रस्त होऊन मैदानाबाहेर गेला. त्याचा बदली खेळाडू, सेन लॅमेन्स, पाऊ क्वेबर्सीच्या लांबून मारलेल्या शॉटवर पूर्णपणे नियंत्रण मिळवू शकला नाही. नुकताच मैदानात उतरलेल्या मिकेल मेरिनोने रिबाऊंडवर एक जोरदार शॉट मारून स्पेनला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. अंतिम शिट्टी वाजेपर्यंत बेल्जियमला बरोबरी साधता आली नाही आणि स्पेनने उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

(वृत्तसंस्था)

### आता फ्रान्सशी सामना

या विजयामुळे स्पेनने २०२६ विश्वचषकाच्या अंतिम चार संघांमध्ये आपले स्थान पक्के केले आहे. उपांत्य फेरीत त्यांचा सामना फ्रान्सशी होईल. युरोपमधील या दोन बलाढ्य संघांमधील हा सामना स्पर्धेतील सर्वात मोठ्या लढतींपैकी एक मानला जातो. ■

# आता नजरा नॉर्वे-इंग्लंड, अर्जेंटिना-स्वित्झर्लंड सामन्यावर

## फुटबॉल चाहत्यांना रोमांचक खेळाची प्रतीक्षा


**बोस्टन, ११ जुलै**

फिफा विश्वचषक २०२६ निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. शुक्रवारी झालेल्या पहिल्या उपांत्यपूर्व सामन्यात, स्पेनने बेल्जियमला २-१ ने हरवून अंतिम चार संघांमध्ये प्रवेश केला, तिथे त्यांचा सामना फ्रान्सशी होईल. उपांत्यपूर्व फेरीचे शेवटचे दोन सामने शनिवारी खेळले जातील. पहिल्या सामन्यात, इंग्लंडचा सामना स्पर्धेतील सर्वांत आश्चर्यकारक संघ असलेल्या नॉर्वेशी होईल, तर दुसऱ्या सामन्यात उपांत्य फेरीतील जागेसाठी अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंड एकमेकांविरुद्ध खेळतील.

स्पेन आणि फ्रान्स दोन्ही संघ उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत आणि हा सामना २०२६ विश्वचषकातील सर्वांत मोठ्या सामन्यांपैकी एक मानला जात आहे.

स्पेनचा युवा स्टार लॅमिन यामालला 'सामन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू' म्हणून गौरविण्यात आले. त्याने बेल्जियमच्या बचावावर सातत्याने दबाव आणला आणि स्पेनच्या आक्रमणाचे नेतृत्व केले.

(वृत्तसंस्था)






### विजयानंतर स्पेनकडून प्रतिक्रिया

स्पेनचे मुख्य प्रशिक्षक लुईस दे ला फुएंते म्हणाले, हे आमच्या संघाच्या मनोबलाचे प्रतीक आहे. इतक्या समर्पित आणि सातत्याने सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या संघाला प्रशिक्षण देणे हा एक सन्मान आहे. आम्ही फ्रान्सला हरवू शकतो असा विचार करणे अगदी स्वाभाविक आहे. हे साध्य करण्यासाठी आम्ही कठोर परिश्रम करू. आमच्या संघाने फ्रान्सला यापूर्वीच दोनदा हरवले आहे. आता, एका महान संघाचा सामना दुसऱ्या एका महान संघाशी होईल. सामन्याचा नायक मिकेल मेरिनो म्हणाला, मी खूप आनंदी आहे. आम्हाला कदाचित ही संधी पुन्हा कधीच मिळणार नाही. ■

### नॉर्वे, इंग्लंड तुल्यबळ

इंग्लंडला एक प्रबळ दावेदार मानले जात असले तरी, नॉर्वे या विश्वचषकातील सर्वांत मोठा 'डार्क हॉर्स' म्हणून उदयास आला आहे. नॉर्वेने १६ संघांच्या फेरीत पाच वेळच्या चॅम्पियन ब्राझीलला बाहेर काढून खळबळ उडवून दिली. त्या सामन्यात अर्लिंग हालंडने दोन गोल केले, तर गोलरक्षक नायलांडने पेनल्टी वाचवून विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. दुसरीकडे, इंग्लंडने यजमान मेक्सिकोला पराभूत करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. ■

# गोलकीपर लॅमेन्सची एक चूक बेल्जियमला भोवली

**लॉस एंजेलिस, ११ जुलै**

बेल्जियमचा गोलकीपर सॅन लॅमेन्सची एक मोठी चूक संघाला महागात पडली. फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्यपूर्व फेरीत स्पेनने बेल्जियमला २-१ ने हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. थिबॉ कोर्तुआ जखमी झाल्यानंतर ७० व्या मिनिटाला मैदानात उतरलेल्या लॅमेन्सला पाऊ कुबार्सीचा लांबून मारलेला शॉट नियंत्रित करता आला नाही. चेंडू त्याच्या हातातून निसटला आणि परत आलेल्या चेंडूवर मिकेल मेरिनोने विजयी गोल केला. प्रीमियर लीगमध्ये मँचेस्टर युनायटेडकडून खेळणाऱ्या लॅमेन्सला या मोठ्या चुकीनंतर सोशल मीडिया वापरकर्त्यांच्या एका गटाकडून तीव्र टीकेला सामोरे जावे लागले.

अनुभवी गोलकीपर थिबॉ कोर्तुआ मांडीच्या दुखापतीमुळे सामना पुढे खेळू न शकल्याने, मँचेस्टर युनायटेडचा गोलकीपर सॅन लॅमेन्सला ७१ व्या मिनिटाला मैदानात उतरावे लागले. कोर्टुआने सामन्यात चार महत्त्वपूर्ण बचाव केले, पण बदली खेळाडू येण्याच्या चार मिनिटे आधी तो कोसळला.



सॅन लॅमेन्स

(वृत्तसंस्था)

# अर्लिंग हॉलंडकडून चमकदार कामगिरीची अपेक्षा



**मियामी, ११ जुलै**

इंग्लंड आणि नॉर्वे फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्यपूर्व फेरीत एकमेकांसमोर उभे ठाकतील. हा सामना शनिवारी भारतीय वेळेनुसार पहाटे २:३० वाजता खेळला जाईल. मियामी स्टेडियमवर निर्णायक सामना जिंकल्यानंतर, दोन्ही संघ उपांत्य फेरीत अर्जेंटिना विरुद्ध स्वित्झर्लंड सामन्याच्या विजेत्याचा सामना करण्यासाठी सज्ज होतील. फिफा विश्वचषकाच्या इतिहासात पहिल्यांदाच उपांत्यपूर्व फेरीत पोहोचून नॉर्वेने एक अविस्मरणीय इतिहास रचला आहे. स्टाले सोल्बाकेनच्या संघाने गट 'आय' मध्ये फ्रान्सच्या मागे दुसरे स्थान मिळवले आणि त्यानंतर आपल्या पहिल्या विश्वचषक बाद फेरीच्या सामन्यांमध्ये दोन मोठे विजय मिळवले.

अर्लिंग हालंड दोन्ही सामन्यांमध्ये नॉर्वेचा हिरो ठरला; त्याने ३२ संघांच्या फेरीत सामन्याच्या अखेरच्या क्षणी निर्णायक गोल केला आणि त्यानंतर १६ संघांच्या फेरीत पाच वेळच्या चॅम्पियन ब्राझीलविरुद्ध दोन गोल करून स्पर्धेत पुढील फेरीत प्रवेश केला. दरम्यान, १९६६ फिफा विश्वचषक विजेत्या इंग्लंडने क्रोएशिया, घाना आणि पनामा यांना मागे टाकत गट 'एल' मध्ये अव्वल स्थान पटकावले, परंतु उपांत्यपूर्व फेरी गाठण्यासाठी त्यांना खूप मेहनत करावी लागली. ३२ संघांच्या फेरीत डीआर काँगोविरुद्ध एक गोलने पिछाडीवर असताना हॅरी केनच्या अखेरच्या क्षणी केलेल्या दोन गोलांच्या जोरावर इंग्लंडने २-१ ने विजय मिळवला. त्यानंतर त्यांनी सह-यजमान मेक्सिकोविरुद्ध ३-२ ने विजय मिळवला.

(वृत्तसंस्था)

### नॉर्वे-इंग्लंड आमने सामनेचा विक्रम

नॉर्वे आणि इंग्लंड विश्वचषकात यापूर्वी कधीही एकमेकांसमोर आलेले नाहीत, परंतु १९८२ आणि १९९४ च्या स्पर्धांसाठीच्या पात्रता सामन्यांसह ते १२ वेळा एकमेकांसमोर आले आहेत. या दोन देशांमधील सर्वांत अलिकडील सामना २०१४ मध्ये एका आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामन्यात झाला होता, जो इंग्लंडने वेन रुनीच्या पेनल्टी गोलमुळे वेम्बली येथे १-० ने जिंकला होता. ■

### अनिमेश कुजूर १०० मीटर शर्यतीत द्वितीय

**वेट्झलार :** राष्ट्रकुल खेळांसाठी पात्र ठरलेल्या धावपटू अनिमेश कुजूरने वर्ल्ड अॅथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर चॅलेंजर स्पर्धा, फास्ट आर्म्स फास्ट लेग्ज मीटरमध्ये दुसरे स्थान पटकावून, परदेशात १०० मीटर शर्यतीत कोणत्याही भारतीयाने नोंदवलेली आतापर्यंतची सर्वात जलद वेळ नोंदवली आहे. ■

# न्यूझीलंडमधील क्रीडा प्रदर्शनाला मोदींची भेट

**ऑकलंड, ११ जुलै**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी न्यूझीलंडची अत्याधुनिक क्रीडा उपकरणे आणि तंत्रज्ञान प्रदर्शित करणाऱ्या एका प्रदर्शनाला भेट दिली. हे प्रदर्शन न्यूझीलंडच्या काही आघाडीच्या खेळाडूंच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले आहे. मोदी त्यांच्या तीन देशांच्या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यासाठी न्यूझीलंडमध्ये आहेत. ४० वर्षांनंतर न्यूझीलंडला भेट देणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान आहेत.

न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यावेळी उपस्थित होते. परराष्ट्र मंत्रालयाने एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस लक्सन यांच्यासोबत क्रीडा उपकरण प्रदर्शनाला भेट दिली. न्यूझीलंडच्या काही आघाडीच्या खेळाडूंनी आणि क्रीडा व्यक्तिमत्त्वांनी आयोजित केलेल्या या प्रदर्शनात दोन्ही नेत्यांनी अत्याधुनिक क्रीडा उपकरणे आणि तंत्रज्ञान पाहिले.

(वृत्तसंस्था)



# जोस बटलर, हॅरी ब्रूकची ऐतिहासिक भागीदारी

### इंग्लंडचे भारतासमोर २५८ धावांचे लक्ष्य

**साऊथहॅम्पटन, ११ जुलै**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचवा आणि अंतिम टी२० सामना साऊथहॅम्पटन येथील रोझ बाऊल क्रिकेट स्टेडियमवर झाला. पुन्हा एकदा, इंग्लंडच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांना अक्षरशः झोडपून काढले. प्रथम फलंदाजी करताना, इंग्लंडने भारताविरुद्ध आपली सर्वोच्च टी-२० धावसंख्या उभारली.

इंग्लंडने केवळ तीन गडी गमावून २५७ धावांचा डोंगर उभा केला. सलामीवीर जोस बटलर आणि कर्णधार हॅरी ब्रूक यांनी दुसऱ्या गड्यासाठी २३३ धावांची ऐतिहासिक भागीदारी केली. बटलरने शतक झळकावले, तर हॅरी ब्रूकने नाबाद ९५ धावा केल्या.

भारताविरुद्धच्या या सामन्यात, नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडने फिल सॉल्ट आणि जोस बटलर यांच्यासोबत डावाची सुरुवात केली. दुसऱ्या षटकात, प्रसिद्ध कृष्णाने फिल सॉल्टला नऊ चेंडूंत ६ धावांवर बाद करून इंग्लंडला पहिला धक्का दिला. त्यानंतर भारतीय गोलंदाजांची झालेली धुलाई कधीही विसरली जाणार नाही.

जोस बटलरने कर्णधार हॅरी ब्रूकसोबत इंग्लंडचा डाव सावरला. दोन्ही फलंदाज निर्भयपणे फलंदाजी करत भारतीय गोलंदाजांशी जणू खेळत होते. त्यांनी जवळपास प्रत्येक चेंडूवर षटकात आणि चौकार मारले आणि दुसऱ्या गड्यासाठी २३३ धावांची ऐतिहासिक भागीदारी रचली. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासातील दुसऱ्या गड्यासाठीची ही सर्वोच्च भागीदारी आहे.

**सामना ४५ मिनिटे उशिरा**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचवा आणि अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्याची नाणेफेक ४५ मिनिटे उशिरा झाली. नाणेफेक मूळतः भारतीय वेळेनुसार सायंकाळी ६:३० वाजता होणार होती आणि सामना सायंकाळी ७ वाजता सुरू होणार होता.

तथापि, वाहतूक कोंडीमुळे भारतीय संघ मैदानावर उशिरा पोहोचल्याने नाणेफेक सायंकाळी ७:१५ वाजता करावी लागली. भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

(वृत्तसंस्था)



शतक झळकवल्यानंतर बॅट उंचावताना जोस बटलर

# सिनर आणि झ्वेरेव्ह अंतिम लढत आज

### विम्बल्डन २०२६ पुरुष एकेरी

**लंडन, ११ जुलै**

विम्बल्डन २०२६ च्या पुरुष एकेरीचे अंतिम स्पर्धक निश्चित झाले आहेत. गतविजेता आणि जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या यानिक सिनरने सात वेळा विम्बल्डन विजेता नोव्हाक जोकोविचला सरळ सेट्समध्ये हरवून सलग दुसऱ्या वर्षी अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात, द्वितीय मानांकित जर्मन खेळाडू अलेक्झांडर झ्वेरेव्हने ब्रिटिश वाईल्डकार्ड खेळाडू आर्थर फर्डीची प्रभावी कामगिरी संपुष्टात आणत आपल्या पहिल्या विम्बल्डन अंतिम फेरीत प्रवेश केला. गतविजेता सिनर आणि फ्रेंच ओपन विजेता झ्वेरेव्ह आता रविवारी विजेतेपदाच्या सामन्यात आमनेसामने येतील.

दुसऱ्या पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात, अव्वल मानांकित इटालियन खेळाडू यानिक सिनरने अनुभवी नोव्हाक जोकोविचला ६-४, ६-४, ६-४ असे हरवून एक मोठा विजय नोंदवला. सिनर संपूर्ण सामन्यात आक्रमक खेळला आणि त्याने जोकोविचला पुनरागमनाची कोणतीही संधी दिली नाही.

हा विजय सिनरसाठी विशेष होता, कारण याच वर्षाच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्य फेरीत जोकोविचने त्याला पाच-सेटच्या सामन्यात पराभूत केले होते. सिनरने त्या पराभवाचा बदला घेतला आणि विम्बल्डनच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. या पराभवामुळे ३९ वर्षीय जोकोविचचे विक्रमी २५ वे ग्रँड स्लॅम विजेतेपद जिंकण्याचे स्वप्न भंगले. दुसरीकडे, फ्रेंच ओपनमधील निराशाजनक कामगिरीनंतर, सिनरने सिद्ध केले की तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे आणि सलग दुसरे विम्बल्डन विजेतेपद जिंकण्यासाठी एक प्रबळ दावेदार आहे.

**झ्वेरेव्ह प्रथमच अंतिम फेरीत**

पहिल्या उपांत्य फेरीत, द्वितीय मानांकित जर्मन खेळाडू अलेक्झांडर झ्वेरेव्हने स्थानिक प्रेक्षकांचा आवडता ब्रिटिश खेळाडू आर्थर फेरीला ७-६ (७-०), ६-२, ६-४ असे पराभूत करून आपल्या पहिल्या विम्बल्डन अंतिम फेरीत प्रवेश केला.

(वृत्तसंस्था)




विम्बल्डन टेनिस चॅम्पियनशिपमधील पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात इटलीच्या यॅनिक सिनरकडून पराभूत झाल्यानंतर सर्बियाचा नोव्हाक जोकोविच मैदानाबाहेर जाताना

## महत्वाचे...

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग; मंगळवेढ्यात एकाविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा, दि. ११ जुलै -**

लग्न केले तर मी तुझ्यासोबतच करेन नाही तर तुझ्या घरातील सर्वांना मी मारुन टाकीन अशी धमकी देवून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग करण्यात आला. याप्रकरणी हर्षराज विजय माने याच्यावर मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. दि.८ जुलै रोजी सकाळी पिडीता घरी एकटी असताना आरोपी हर्षराज मानेने घरात येवून जनावराच्या शेडमध्ये पिडीतेच्या अंगाशी झोंबाझोंबी केली. तिने आरडाओरड केल्यावर शेताकडे गेलेले वडिल अचानक आले. त्यांना पाहून आरोपी मोटर सायकलवर निघून गेला. यावेळी पिडीतेच्या वडिलाने मुलीला याबाबत विचारले असता तिने हर्षराजने दिलेल्या धमकीचा व केलेल्या आगळीकीची माहिती रडत सांगितली. तद्नंतर पिडीतेच्या वडीलांनी आरोपीकडे जावून विचारणा केली असता त्यांन वडिलांना मारहाण करुन खाली पाडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलिस करीत आहेत.



### आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने जयश्री सातपुते-गवळी सन्मानित

**टेंभुर्णी, दि. ११ जुलै-**

जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्थेतर्फ येथील जय तुळजाभवानी माध्यमिक आश्रम शाळा व जय तुळजाभवानी कला व विज्ञान कनिष्ठ आश्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या जयश्री सातपुते-गवळी यांचा माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार देवून गौरव केला. भोसे (ता. पंढरपूर) येथील रायगड लॉन्स येथील कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य योगेश दळवी, पतसंस्थेचे चेअरमन कदम, व्हाईस चेअरमन देशमुख, जय तुळजाभवानी शिक्षण संस्थेचे संस्थापक कैलास सातपुते, दत्तात्रय ननवरे, प्राचार्य जवानसिंग राजपूत, समाधान घाडगे, गजानन लावर, महावीर आखाडे, मारुती गायकवाड, तज्ञ संचालक शंकर वडणे, राजेंद्र आसबे, शिवाजी चव्हाण, मुख्याध्यापिका संतोषी आगावणे, विनोद आखाडे उपस्थित होते. राजेंद्र आसबे व स्मिता पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### सेवा हाच खरा धर्म आहे हे स्वामींनी शिकवले : राजेंद्र भोसले

**अक्कलकोट दि. ११ जुलै-**



जिल्हाधिकारी म्हणून काम करताना स्वामींच्या आशीर्वादाने सर्व जबाबदाऱ्या पार पाडता आल्या. सेवा हाच खरा धर्म आहे हे स्वामींनीच शिकवल्याचे मनोगत माजी जिल्हाधिकारी राजेंद्र भोसले यांनी व्यक्त केले. भोसले यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी भोसले बोलत होते. यावेळी मंदिर समितीचे प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, श्रीशैल गवंडी, प्रा.नागनाथ जेऊरे, विपूल जाधव, सागर गोंडाळ, गिरीश पवार उपस्थित होते.

### पिलीव केंद्रातील १४ शाळांतील शिक्षकांचा संपामध्ये सहभाग

**पिलीव दि. ११ जुलै -**

सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी एकदिवसीय संप पुकारला होत. यामध्ये पिलीव केंद्रातील १७ पैकी १४ शाळेतील शिक्षकांनी सहभाग घेतला . कुसमोड येथील जिल्ह्य परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर, झिंजेवस्ती आंबेडकरवस्ती येथील तसेच सुळेवाडी येथील जिल्ह्य परिषद प्राथमिक शाळा या ३ शाळा मात्र नियमित सुरू होत्या. पिलीव केंद्रातील अनेक शिक्षक सोलापूर येथील मोर्चात सहभागी झाले होते. प्राथमिक शिक्षक सचिन गाटे यांनी संपाबाबत बोलताना शिक्षकांना शाळा बाहय कामे दिल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने संप करत असल्याचे सांगितले.

## निधन वृत्त...

### डॉ. सुहास लांडगे



**सोलापूर, दि. ११ जुलै-**

सोलापूर येथील सेवा निवृत्त पशुवैद्यकीय डॉक्टर तसेच माजी उद्यान प्रमुख सुहास मच्छिंद्र लांडगे (वय ६३) यांचे दि. ९ जुलै रोजी पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुन असा परिवार आहे.

### गोविंद कासार



**वैराग, दि. ११ जुलै -**

येथील वि.का.स.सोसायटीचे चेअरमन गोविंद कासार (वय ८७) यांचे आज आकस्मिक निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा आणि सुविद्य परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहाचे विविध राजकीय, सामाजिक, व्यापारी आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांनी अंत्यदर्शन घेतले.

# कॉरिडॉर पुनर्वसनात नागरिकांचा विश्वास जपणे महत्त्वाचे

## डॉ. नीलम गोऱ्हे; बाधितांच्या समस्या जाणून घेण्यासाठी ऑनलाइन संवाद



## नागरिकांच्या प्रश्नांबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर.दि.११ जुलै -**

पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या नागरिकांच्या पुनर्वसनासंदर्भातील शंका जाणून घेण्यासाठी शिवसेना नेत्या व माजी उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी शनिवारी ऑनलाइन बैठक घेतली. यावेळी त्यांनी कॉरिडॉर पुनर्वसनात नागरिकांचा विश्वास जपणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

बैठकीला, पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समिती अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी इचगावकर, वैभव बडवे, सुनील उंबरे यांच्यासह अनेक प्रतिनिधी सहभागी झाले होते. बैठकीत बाधितांनी पुनर्वसन प्रक्रियेतील अनिश्चितता, मोबदल्याबाबतची अस्पष्टता आणि उदरनिर्वाहाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. कृती समितीच्या सदस्यांनी २२ रस्त्यांचे रुंदीकरण करण्यास विरोध नसून ते नियोजनपूर्वक करावे. मात्र, घर व दुकान जागेच्या बदल्यात नेमका कोणता मोबदला मिळणार, त्याचे स्वरूप काय असेल आणि पुनर्वसनाची अंमलबजावणी कशा पद्धतीने होणार, याबाबत प्रशासनाने अद्याप स्पष्ट भूमिका मांडलेली नसल्याचे सांगितले. जमीनमालकांना अधिकृतपणे संपूर्ण माहिती देण्याची मागणी केली. या विषयावर ४८६ नागरिकांचा मतप्रवाह जाणून घेतला. त्यापैकी केवळ १५ जणांनी विद्यमान कोरिडॉरच्या प्रस्तावाला पाठिंबा दर्शविला तर १० जण तटस्थ राहिले. उर्वरित बाधितांनी कॉरिडॉरला विरोध दर्शविला होता. विकास कामांसाठी परिसरातील उपलब्ध शासकीय जागांची माहिती प्रशासनाला दिल्याचे सांगितले..

डॉ. गोऱ्हे यांनी पुनर्वसन प्रक्रियेत मूळ बाधितांचे हित अबाधित राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. बाधितांनी बिल्डरांना जागा विक्रीचे अधिकार दिल्यास आर्थिक लाभ त्यांच्याकडे जातो. त्यामुळे मूळ बाधितांनी कोणालाही सहजपणे जागा विक्री अधिकार देऊ नयेत. पुनर्वसनातून सर्वाधिक आर्थिक व सामाजिक लाभ मूळ नागरिकांनाच मिळाला पाहिजे, असे सांगितले.

केवळ घराच्या बदल्यात घर किंवा दुकान देणे पुरेसे ठरणार नाही. पुनर्वसनासोबत त्यांच्या रोजगार आणि उपजीविकेचाही प्रश्न सोडविणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले.

> ऑनलाइन बैठकीत कॉरिडॉर बाधितांच्या प्रतिनिधिक समस्या नोंदवल्या आहेत. यावर पुढील स्तरावर पाठपुरावा करेन. सरकार स्थानिकांना विश्वासात घेऊनच पुनर्वसनाचा निर्णय घेईल.
>
> **डॉ.नीलम गोऱ्हे,**
> शिवसेना नेत्या.

### सातलिंगप्पा म्हेत्रे यांच्या सन्मानार्थ मार्केटमधील सौदे पाच दिवस बंद

**सिध्दाराम म्हेत्रेंच्या शब्दाखातीर सोमवारपासून पुन्हा सौदे : जोशी**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि .११ जुलै**

-दुधनी मार्केट कमिटीचे संस्थापक अध्यक्ष स्व. सातलिंगप्पा म्हेत्रे यांच्या नियोजित पुतळ्यासंदर्भातील वाद प्रकरण दुर्दैवी आहे.त्यांच्यामुळे आम्हा व्यापारी व शेतकऱ्यांचे हित साधले. म्हणुनच त्यांच्या सन्मानार्थ आम्ही ५ दिवस सर्व प्रकारचे सौदे बंद केले होते. पण माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी समजुत घातल्याने सोमवारपासून पुन्हा सौदे सुरु करणार असल्याचे व्यापारी असोसिएशनचे उपाध्यक्ष राजशेखर जोशी यांनी सांगितले.

माजी मंत्री म्हेत्रे यांनी आम्हाला बोलावुन सौदे बंद ठवणे शेतकऱ्यांच्यादृष्टीने हितकारक नसुन आपण सर्वांनी माघार घ्यावी,असे आवाहन केले. त्यामुळे तर सोमवारपासुन सौदे पुर्ववत होणार असल्याचे जोशी यांनी सांगितले.

यावेळी व्यापारी गुरुशांत परमशेट्टी,अशोक पादी, गुरुशांत माड्याळ, जगदीश माशाळ, चंद्रकांत भत्ता,गुरुप्रसाद परमशेट्टी,संजयकुमार नुल्ला,सातलिंग गौडगांव, प्रशांत पादी, नरेश इरकट, राघवेंद्र रजपुत यांच्यासह इतर व्यापारी उपस्थित होते.

### मंगळवेढ्यातील जि.प.शिक्षक संपावर

**मंगळवेढा दि. ११ जुलै-**

मंगळवेढा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक आंदोलनात सहभागी झाले. शिक्षकावर अध्यापना व्यतिरिक्त अन्य कामे शासन लादत असल्याने शालेय मुलांचे मोठे नुकसान होत असल्याच्या तक्रारी आहेत.

मंगळवेढा तालुक्यातील सर्व जि.प.शाळामधील शिक्षक एक दिवशीय शाळा बंद ठेवून आंदोलनात सहभागी झाले. मोर्चात जिल्हा शिक्षक नेते सुरेश पवार, विठ्ठल ताटे, सिध्देश्वर सावंत, संजय दवले, भाऊसाहेब माने, आप्पाराव न्यामगोंडे, बंडू पाटील, राजेंद्र कांबळे, नवनाथ सपताळे, रविंद्र लोकरे आदी सहभागी झाले होते.

### मंगळवेढा शहरात कर्कश आवाज करणाऱ्या ११ मोटर सायकलस्वारांवर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ११ जुलै-**

मंगळवेढा शहरात मोटर सायकलस्वाराने मॉडीफाईड सायलेन्सर बसवून कर्कश आवाज केल्याप्रकरणी पोलीसांनी ११ मोटर सायकल स्वारावर ५ हजार ५०० रुपयाचा दंड करुन कारवाई केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

मंगळवेढा शहरात तरुण मुले आपल्या मोटर सायकलच्या सायलेन्सर मध्ये मॉडीफाईड करुन मोठा कर्कश आवाज करीत जात होते. या आवाजामुळे ध्वनी प्रदुषण तसेच लहान मुलांना, आजारी व्यक्तींना त्रास होत असल्याच्या तक्रारी वाढत होत्या. गेल्या अनेक दिवसापासून हा प्रकार शहरामध्ये सुरु आहे. याची दखल घेत डीवायएसपी डॉ. बसवराज शिवपुजे यांनी वाहतूक शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्यांची बैठक बोलावून कारवाईच्या सूचना दिल्या.

पोलिस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात दिवसभर कारवाईची मोहीम राबविली. यामध्ये ११ मोटर सायकली पकडून त्यांच्यावर ५ हजार ५०० रुपयाचा दंड आकारण्यात आला. बिगर नंबर मोटर सायकल, वाहन चालकाकडे लायसन नसणे आदींवर कारवाई करण्यात आली. ही मोहिम फत्ते करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद लातुरकर, कुमार ढेरे, पोलिस उपनिरीक्षक नागेश बनकर, विजय पिसे, वाहतूक पोलीस हवालदार संभाजी यादव, पोलीस अंमलदार दिपक सांळुखे आदींनी परिश्रम घेतले.




### 'स्वच्छ शाळा सुंदर शाळा' पुरस्काराने कवठेकर प्रशालेचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ जुलै-**

नाथ चौक येथील कवठेकर प्रशालेला नुकताच सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित, बाळे-सोलापूर यांच्यावतीने मानाचा 'स्वच्छ शाळा सुंदर शाळा' पुरस्कार माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.वाय.पाटील यांना नुकताच शाल, श्रीफळ व गौरवचिन्ह देऊन प्रदान करण्यात आला. याबद्दल या गौरव सोहळ्याचे आयोजन कवठेकर प्रशालेत करण्यात आले होते.

मुख्याध्यापक व्ही.वाय. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वारकरी शिक्षण संस्थेचे संचालक हभप गोरोबा काका होते. त्यांनी प्रशालेच्या कार्याचा व विदयार्थी केंद्रित धोरणामुळे हे यश मिळाल्याचे स्पष्ट केले.

प्रमुख अभ्यागत म्हणून पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव सु.र. पटवर्धन यांनी प्रशालेने अंगीकारलेली शिस्त, संस्कार व उत्तम नियोजनाचे हे फलित असल्याचे नमूद करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन मेडशिंगकर यांनी केले.

### सीतामाय तलावातून पाणीपुरवठा सुरू करा

**पाणीपुरवठ्याचे राजकारण न करता सुरळीत पाणीपुरवठा करा**



**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ११ जुलै -**

मंद्रूपपासून एक किलोमीटर अंतरावर असणाऱ्या सीतामाय तलावातून मंद्रूपला पाणीपुरवठा सुरू केल्यास पाणीटंचाई दूर होईल. परिणामी सोलापुरातून टँकरद्वारे पाणी आणून त्याचे शुद्धीकरण करून मंद्रूपमध्ये पाणीपुरवठा करण्याचा खटाटोप करण्याऐवजी सीतामाय तलावातून पाणी सुरू करण्याची मागणी होत आहे.

सत्ताधाऱ्यांनी मंद्रूपच्या पाण्याचे राजकारण न करता पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. 'काखेत कळसा अन गावाला वळसा' या म्हणीप्रमाणे सीतामाय तलावात मोठ्या प्रमाणात पाणी साठवण असताना सत्ताधाऱ्यांकडून दोन महिन्यापासून मंद्रूपकरांची दिशाभूल होत असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे टँकरमधून सोलापूरातून पाणी आणण्याऐवजी सीतामाय तलावातील पाण्याचे शुध्दीकरण केल्यास पाणीपुरवठा सुरळीत होऊ शकते. मंद्रूपपासून एक किलोमीटर अंतरावर सीतामाय तलाव आहे. या तलावाचे खोलीकरण केल्यामुळे पावसाच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात साठवण केली आहे. शिवाय पाझर तलाव असल्यामुळे उजनी धरणातून सोडण्यात येणाऱ्या कालव्यातूनही पाणी सोडण्यात येते. परिणामी सध्या तलावात मोठ्या प्रमाणात जलसाठा आहे. मंद्रूप ग्रामपंचायत सोलापूर येथून टँकरद्वारे पाणी आणून पाण्याच्या टाकीत साठवण करीत आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात खर्चही करत आहे. त्यामुळे इंदिरानगरपासून अवघ्या आठशे ते हजार फूट अंतरावर असणाऱ्या सीतामय तलावात जलवाहिनी टाकून त्याचे शुद्धीकरण करावे, तसेच गावाला पाणीटंचाईच्या काळात वापर करण्याची मागणी करण्यात येत आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात खर्चाचीही गरज नाही. गावात मोठ्या प्रमाणात पाणी असतानाही सोलापुरातून पाणी आणून पाणीपुरवठा करण्यास विलंब होत आहे.

> **सत्ताधाऱ्यांकडून पाण्याचे राजकारण**
>
> ऊन्हाळ्यात पाणीटंचाई गृहीत धरून मार्च महिन्याच्या बैठकीत सीतामाय तलावातील पाणीवापरासंबंधी सरपंचांना सुचवले आहे. चार महिन्यात त्याकडे दुर्लक्ष झाल्याने दोन महिन्यांपासून मंद्रूपला पाणीटंचाई भेडसावत आहे. सीतामाय तलावातील पाण्याचे शुध्दीकरण करून पाणीपुरवठा शक्य आहे. मात्र सत्ताधारी पाण्याचे राजकारण करून मंद्रूपकरांना वेठीस धरत आहे.
>
> **शिवपुत्र जोडमोटे,** सदस्य, ग्रामपंचायत मंद्रूप

> **आमदारांनी सहकार्य करण्याची गरज**
>
> सीतामाय तलावातून पाणीपुरवठासाठी प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. आराखडा करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला सांगितले आहे. प्रक्रिया जलद होण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी प्रशासनाला सूचना देण्याची गरज आहे.
>
> **भगवान व्हनमाने,** उपसरपंच, मंद्रूप.

> **एक महिन्यापासून प्रशासनाकडे पाठपुरावा**
>
> मंद्रूपचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. टंचाई काळात सीतामाय तलावातून पाण्याचे शुध्दीकरण करून पाणीपुरवठा सुरु करण्यासाठी पाटबंधारे विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे. जिल्हा परिषद सदस्य सोनाली कडते व मी प्रशासनाला सूचना दिली आहे.
>
> **मळसिध्द मुगळे,**
> सदस्य, पंचायत समिती, मंद्रूप.

## शासनाकडून प्रेझेंटेशनमध्ये महत्वाच्या बाबींवर दुर्लक्ष

**पंढरपूर कॉरिडॉर; उपजिल्हाधिकाऱ्यांच्या सादरीकरणानंतर संभ्रम कमी होण्याऐवजी वाढला**



**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर,दि.११ जुलै -**

पंढरपूर कॉरिडॉर बाबतची माहिती उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी गुरुवारी दिली. मात्र यामध्ये अनेक बाबींवर स्पष्टपणे प्रकाशझोत टाकला नाही. परिणामी प्रकल्पाबाबत संभ्रमाचे वातावरण कमी होण्याऐवजी वाढले आहे.

नगरपरिषदेत उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी या प्रकल्पाबाबतची माहिती दिली. त्यांनी जरी कोणतीही माहिती लपवली नसल्याचे म्हटले तरी बाधितांच्या अनेक प्रश्नांविषयी उहापोह करण्यात आला नाही. त्यामुळे संभाव्य बाधितांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. बाधित लोकांचे पुर्नवसन नेमके शहरातील कोणत्या भागातील जागेवर केले जाणार? ज्यांना दुकाने दिली जाणार आहेत ती शहरातील कोणत्या भागात असणार? बाधितांना ती लॉटरी पध्दतीने की अन्य कोणत्या पध्दतीने दिली जाणार आहेत. या बाबतही उहापोह केला नाही.

शहरातील काही रस्त्यांचा विकास करण्याचे नियोजन या आराखड्यात सुचवले आहे. त्यासाठी कोट्यावधी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. मात्र त्या रस्त्यांची सध्याची परिस्थिती आणि विकासानंतरची परिस्थिती, सध्या किती फुटाचे आहेत आणि नंतर किती फुटाचे होणार आहेत, या बद्दलही संभ्रमच आहे. शहरातील नगरप्रदक्षिणा रस्त्याबाबतही शहरवासियांमध्ये गोंधळाची स्थिती दिसत आहे. कारण नगर प्रदक्षिणा रस्त्यासाठी तब्बल १६३.७४ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सरकारी शब्दाच्या कचाट्यात हा नगरप्रदक्षिणा रस्ता या आराखड्यात अडकला आहे. कारण काही वेळेस या रस्त्याच्या विकासासाठी असा शब्दप्रयोग केला आहे तर काही वेळेस या रस्त्याच्या सुशोभीकरणासाठी असेही म्हटले आहे. त्यामुळे नगरप्रदक्षिणा रस्त्याचा विकास नेमका कसा साधला जाणार आहे. या रस्त्याचे विस्तारीकरण पुन्हा करण्यात येणार आहे का? जर करण्यात येणार असेल तर सध्याच्या रस्त्यापेक्षा तो किती मोठा केला जाणार आहे. त्या मध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांच्या पुर्नवसनाचे काय? अशा एक ना अनेक शंकांचे काहूर शहरवासियांच्या मनामध्ये उठलेले आहे.

> **नुसता दर जाहीर केल्याने स्पष्टता नाही**
>
> आराखड्यात बाधित होणाऱ्या नागरिकांना शासनाकडून भरपाईबाबत सुतोवाच केले. सर्वसाधारणपणे रहिवाशी मालमत्तांना २० हजार तर व्यवसायीक मालमत्तांना ४० हजार रुपये प्रति स्वेकर फुट दर सांगितल्यामुळे एकुणच प्रकल्पाबाबतची स्पष्टता होते असे नाही. कारण यामध्ये बाधित कुटुंबाच्या आयुष्याचा प्रश्न आहे, त्यांचे पुर्नवसन कशा प्रकारे केले जाणार, कुठे केले जाणार, त्यांच्या व्यवसायाचे पुढील भवितव्य काय असणार, बाधित मालमत्ताधारकांच्या व्यवसायाच्या पूर्वीच्या ठिकाणाच्या तुलनेत पुर्नवसनात ज्या जागेवर त्यांचे पुर्नवसन होणार ती जागी मंदिराजवळ असणार की कशी याबद्दलही माहिती मिळायला हवी.

> **डीपी प्लॅन राबविताना बाधितांचे पुर्नवसनाचा प्रश्न**
>
> कॉरिडॉर प्रकल्पाबरोबरच डीपी प्लॅनद्वारे शहरातील अनेक रस्त्यांचाही विकास केला जाणार आहे. त्यामध्येही शेकडो नागरिक बाधित होणार आहेत. कॉरिडॉरच्या आराखड्याप्रमाणे शासनाकडून जशी बाधितांना भरपाई मिळणार आहे तशी यामध्ये बाधित होणाऱ्यांना देणार का? याबद्दल देखील भाष्य केले नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सांगोला येथे १५ लाखांचा भेसळयुक्त दुधसाठा जप्त



## अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

जवळा, ता. सांगोला येथे अन्न व औषध प्रशासन विभागाने मोठी कारवाई करत १५ लाख १ हजार २८० रुपये किमतीचा ३७ हजार ५३२ लिटर भेसळयुक्त दुधसाठा जागेवरच नष्ट केला. तसेच संबंधित आस्थापनेस त्रुटीची पूर्तता करेपर्यंत व्यवसाय बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत, अशी माहिती सहाय्यक आयुक्त (अन्न) साहेबराव देसाई यांनी दिली.

शनिवार, दि. ११ जुलै रोजी सोलापूर कार्यालयास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अन्न सुरक्षा अधिकारी गणेश म. कदम व सहकारी अन्न सुरक्षा अधिकारी मंगेश म. लवटे यांनी बुरुंगेवाडी, जवळा येथील मे. अंजिक्यराणा मिल्क इंडस्ट्रीज या ठिकाणी अचानक धाड टाकली. तपासणी दरम्यान ४ दुधाचे नमुने घेण्यात आले असून उर्वरित ३७ हजार ५३२ लिटर दूध जप्त करण्यात आले.

तपासणीत १. संकलन व चिलिंग युनिटचा वैध परवाना नसणे, २. स्पॉट टेस्टमध्ये दुधात पाणी मिसळल्याचे आढळणे, ३. एसएनएफचे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा कमी असणे, ४. खरेदी-विक्रीची पद्धतशीर नोंद नसणे व ५. 'अनुसूची खत' मधील नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले. दूध नाशवंत असल्यामुळे सदरचा साठा जागेवरच योग्य पद्धतीने नष्ट करण्यात आला. तसेच आस्थापनेस तपासणीत आढळलेल्या त्रुटींची पूर्तता होईपर्यंत व वैध अन्न परवाना घेईपर्यंत तात्काळ व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सदरची कारवाई आयुक्त तुकाराम मुंढे, अन्न व औषध प्रशासन, मुंबई व सह आयुक्त (पुणे विभाग) दि. वा. भोगावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त (अन्न) साहेबराव देसाई व अन्न सुरक्षा अधिकारी गणेश कदम, सहकारी अन्न सुरक्षा अधिकारी मंगेश लवटे यांच्या पथकाने केली.

# मूळ वाटणीपत्रात फेरफार करून फसवणूक; दुय्यम निबंधकासह ५ जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ११ जुलै-**

वडिलोपार्जित मालमत्तेच्या मूळ वाटणीपत्रात फेरफार करून आणि प्रशासनाची दिशाभूल करून बेकायदेशीर खरेदीखत केल्याप्रकरणी सोलापूरच्या दुय्यम निबंधक अधिकाऱ्यासह पाच जणांवर सदर बाजार पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महादेवी अंडगे, गणेश अंडगे, गौरीश अंडगे, मच्छिंद्र चिंचणकर आणि संबंधित दुय्यम निबंधक अधिकारी अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत चेतन श्रीशैल अंडगे (रा. पूर्व मंगळवार पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील वरील आरोपी अंडगे कुटुंबीयांनी पूर्व मंगळवार पेठ येथील वडिलोपार्जित घरजागेचे २०१४ मध्ये नोंदणीकृत वाटणीपत्र केले होते. मात्र, १० फेब्रुवारी २०२६ रोजी सह दुय्यम निबंधक कार्यालय-२ येथे या वाटणीपत्राचे निवडक पान जोडून दिशाभूल करण्यात आली.




सर्व आरोपींनी संगणमताने बेकायदेशीर खरेदीखत दस्त करून फिर्यादीची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस निरीक्षक भंडारे हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## महत्वाचे...




### अखेर भाग्यश्री पार्क, होटगी रोड येथील नाला अतिक्रममुक्त

**सोलापूर, दि. ११ जुलै-**

होटगी रोड परिसरातील भाग्यश्री पार्क येथून जाणाऱ्या नैसर्गिक नाल्यावरील अतिक्रमणे हटविण्याची मागणी अखेर यशस्वी ठरली असून सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने नाला अतिक्रमणमुक्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे. या परिसरातील नैसर्गिक नाल्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण होत होता. परिणामी परिसरात पाणी साचणे, वाहतुकीची कोंडी आणि नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. या प्रश्नाकडे माजी परिवहन सभापती विजयकुमार हत्तुरे यांनी सातत्याने पाठपुरावा करून महानगरपालिकेचे लक्ष वेधले होते.महानगरपालिका प्रशासनाने याची दखल घेत कारवाई करत नाल्यावरील अतिक्रमणे हटवून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह मोकळा केला. यावेळी माजी परिवहन सभापती विजयकुमार हत्तुरे यांनी सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे विशेष आभार मानले.

### स्टेशन मॅनेजरने केले शोले स्टाईल आंदोलन

**तब्बल १०० ते १२५ फूट कव्हर टॉवरवर चढून केला निषेध**

**सोलापूर, दि. ११ जुलै-**

होटगी रेल्वे स्थानकाचे स्टेशन मॅनेजर सत्तेनदर सिंग यांनी कमी मनुष्यबळ आणि वाढत्या कामाचा ताणामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या त्रासाच्या निषेधार्थ तब्बल १०० ते १२५ फूट कव्हर टॉवरवर चढून आंदोलन केले. घटनेची माहिती मिळताच रेल्वे व्यवस्थापक डॉक्टर सुजित मिश्रा, वरिष्ठ अधिकारी आरसीएफ लोहमार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तासभर चर्चे नंतर आंदोलकाचा समस्या सोडवण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर सत्तेंद्र सिंग सुरक्षितपणे खाली उतरले. होटगी स्थानकावर मोठ्या प्रमाणात मालवाहतूक आणि मेल एक्सप्रेस ची वर्दळ असतानाही कमी मनुष्यबळ कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण असल्याची तक्रार आहे. यामुळे रेल्वे कर्मचाऱ्यांच्या तिचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. रिक्त पदे तातडीने भरण्याची आणि संबंधित तक्रारीची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

### दारुच्या नशेत हौदात पडून मजुराचा मृत्यू

**बार्शी, दि.११ जुलै-**

गुळपोळी येथे एका बांधकामाच्या ठिकाणी दारुच्या नशेत पाण्याच्या हौदात पालथे पडून एका मजुराचा बुडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.राजेश चौहान (वय ४२ वर्षे, मूळ रा. मुरली, उत्तर प्रदेश) असे मृत मजुराचे नाव असून, तो येथे फरशी बसवण्याचे काम करत होता. चौहान हा गुळपोळी येथील उत्रेश्वर बाबासाहेब चिकणे यांच्या शेतातील घराच्या बांधकामावर मजूर म्हणून काम करत होता. ९ जुलै दुपारी १ ते सायंकाळी ५-३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. घटनेच्या दिवशी दुपारच्या सुमारास राजेश हा मद्यधुंद अवस्थेत असल्याने त्याचा सहकारी अक्षय औदुंबर गुटकुळे याने त्याला जेवणाबाबत विचारले होते. मात्र, जेवण्यास नकार देऊन तो




# अक्कलकोट तीर्थ क्षेत्र विकासला चालना : उद्योग मंत्री उदय सामंत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून होत असलेल्या चौफेर विकास कामामुळे अक्कलकोट तीर्थ क्षेत्र विकासला चालना मिळत असल्याचे मनोगत राज्याचे उद्योग मंत्री ना. उदय सामंत यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती व शिव छत्रपती शिवाजी महाराजांची रेखीव प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत खा.ज्योतीताई वाघमारे, माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, शिवसेना सो.म.पा. नगरसेवक अमोल शिंदे, प्रियदर्शन साठे, शिवसेनेचे महेश साठे, संजय पाटील, मनीष काळजे हे उपस्थित होते.

याप्रसंगी न्यासचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, पुरोहित सोमकांत कुलकर्णी, निखील पाटील, प्रवीण घाटगे, बाळासाहेब पोळ, दत्ता मोरे, दत्ता माने, शुभम सावंत, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी आदी उपस्थित होते.

# एमआयडीसीतील निष्क्रिय भूखंड काढून घेणार

## उद्योग मंत्री उदय सामंत यांचा इशारा

### दर्जेदार पायाभूत सुविधांसाठी शासन कटिबद्ध



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

जिल्ह्यातील उद्योगाला चालना मिळावी यासाठी उद्योग विभागाच्या वतीने उद्योग स्नेही धोरण राबवण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व एमआयडीसीमध्ये उद्योजकांनी चांगले उद्योग उभा करून स्थानिकांना रोजगार उपलब्ध करावा यासाठी उद्योग विभागाच्या वतीने एमआयडीसीमध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन उद्योग व म राठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले.

शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात सोलापूर जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटना समवेत आयोजित आढावा बैठकीत उद्योग मंत्री डॉ. सामंत मार्गदर्शन करत होते. यावेळी खासदार प्रा. ज्योतीताई वाघमारे, आमदार राजू खरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक उमेशचंद्र दंडगव्हाळ, प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी शिवाजी राठोड, यंत्रमाग संघ डायरेक्टर नारायण आडकी, टेक्सटाईल फाउंडेशन उपाध्यक्ष जयंत श्रीअकेन, सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन उपाध्यक्ष गणेश सुत्रावे, सचिव वासुदेव बंग, सहसचिव अभिषेक तापडिया, शिवशंकर आंधळकर, व्यवस्थापक एस. बी. गायकवाड आदी उपस्थित होते.

उद्योग मंत्री सामंत यांनी सोलापूरमधील ड्रायफ्रूट उद्योग हा अत्यंत महत्त्वाचा असून त्यासाठी एमआयडीसीमध्ये राखीव भूखंड देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना उद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच चिंचोली एमआयडीसीसाठी वाढीव ५ एमएलडी पाणी देण्याबाबत महापालिका आयुक्तांना सूचना दिल्या. त्यासाठी महापालिकेला दोन वर्षात २८ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. त्यापैकी येत्या दोन-चार दिवसात ७ कोटी रुपये दिले जाणार आहेत.

अक्कलकोट रोड एमआयडीसीसाठी आवश्यक तेवढा पाण्याचा पुरवठा करण्याबाबतही निर्देश दिले. उद्योजकांनी अंतर्गत रस्ते, वीज, सांडपाणी तसेच अग्निशमन या समस्यांबाबत मांडलेल्या अडीअडचणी सोडवण्याबाबत संबंधित विभागांना सूचना दिल्या. तसेच जलसंपदा विभाग, महापालिका, प्रदूषण मंडळ, वनविभाग यांची जिल्हाधिकारी यांनी बैठक घेऊन कुंभारी-एमआयडीसी रस्त्याबाबतचा प्रश्न मार्गी लावावा, अशा सूचना उद्योग मंत्री डॉक्टर सामंत यांनी दिल्या. क्लस्टर मानांकनाच्या बाबतीत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांना सूचना देण्यात आल्या. तसेच एमआयडीसीच्या जागेमध्ये भूखंड घेऊन जर कोणी उद्योग सुरू करत नसेल तर ते भूखंड त्यांच्याकडून काढून घ्यावेत, असे निर्देश दिले.

एमआयडीसी लगतच्या ग्रामपंचायतींना उद्योजकांच्या करातील ५० टक्के रक्कम ही त्या ग्रामपंचायतीच्या कामासाठी देण्यात येईल. मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी ते काम योग्य असल्याचा दाखला दिल्यानंतरच तेच काम ग्रामपंचायतीने करावे, असे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.

सोलापूरात ड्रायपोर्टसाठी जागेची मागणी होती. त्यामुळे औद्योगिक वसाहतीमध्ये १०० एकर जागा देण्याची आमची तयारी आहे. तसेच औद्योगिक वसाहतीला ५ एमएलडी पाणी देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज सोलापूर येथील उद्योजकांसोबत संवाद साधला. यावेळी उद्योजकांनी आपल्या समस्या आणि अडचणी मंत्री सामंत यांच्यासमोर मांडल्या. उद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

# बनावट युजर आयडीद्वारे शिष्यवृत्तीच्या नावाखाली १ लाख ८३ हजारांची फसवणूक

### नेहरूनगर बीपीएड महाविद्यालयातील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

बनावट कागदपत्रे आणि अधिकृत युजर आयडीची हुबेहूब नक्कल करून केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेत २३ बोगस विद्यार्थी दाखवून शासनाची १ लाख ८३ हजार ९०० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात एकावरगुन्हा दाखल झाला आहे.

इंदिरा राजे भोसले असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत संजय कोंडिबा भांदिर्गे (वय ५७ वर्ष, रा. जुने कलेक्टर कंपाउंड) यांनी दिलेल्या फिर्याद दिली आहे. हा गैरप्रकार श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, नेहरूनगर येथे घडला आहे. आरोपी इंदिरा राजे भोसले याने स्वतः ला महाविद्यालयाचा हेड ऑफ इन्स्टिट्यूट आणि इन्स्टिट्यूट नोडल ऑफिसर असल्याचे भासवले. यासाठी त्याने बनावट युजर आयडी तयार केला होता. या बनावट आयडीचा गैरवापर करून आरोपीने १ ऑगस्ट २०२१ ते ३१ जुलै २०२३ या कालावधीत २३ विद्यार्थ्यांचे बनावट अर्ज सादर केले आणि शासनाकडून शिष्यवृत्तीची रक्कम लाटली.

ही रक्कम विविध बँक खात्यामधून प्राप्त करून घेण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस निरीक्षक वराळे हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.




# भौगोलिक दृष्ट्या सर्वांना सोयीचे अप्पर तहसील करावे

### भाजपा नेते शहाजी पवार यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार यांनी आज उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व पदाधिकारी व बाळे भागातील सर्व नगरसेवक यांच्या सोबत राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेवून उत्तर सोलापूर अप्पर तहसील संदर्भात, उत्तर सोलापूर मधील सर्व जनतेला सोयीस्कर करण्यासाठी व तसेच शहरी भागातील जनतेचाही मार्ग मोकळा करण्यासाठी सर्वसमावेशक निर्णय घ्यावा, असे साकडे एका निवेदनाद्वारे घातले.

उत्तर सोलापूर तालुक्यातील सर्व गावांना तसेच शेळगी मंडळातील लोकांना सुद्धा भौगोलिक दृष्ट्या सोयीचे असे अप्पर तहसील करण्यासाठी त्यांनी ही भेट घेतली आणि विस्ताराने चर्चाही केली. केवळ कोणाच्या हट्टासाठी किंवा फक्त विरोधाला विरोध म्हणून दुसऱ्या तालुक्यात जाऊन लुडबुड करण्यासाठी नाही, तर फक्त जनमाणसांच्या विचाराधीन राहूनच आपण निर्णय घ्यावा. मग त्यामध्ये तळे हिप्परगा पासून ते कौठाळी, शेरेवाडी, भागाईवाडी मधील माणसाला सुद्धा सोयीचे होईल. यावेळी शहाजी पवार यांच्यासह जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजित पवार, सभापती तेजस्वीनीताई बोराडे, उपसभापती सुनील भोसले, पं. स. सदस्या सुनिताताई बारसकर, नगरसेवक बिज्जू प्रधाने, मंदाकिनी तोडकरी, आनंद भवर, नगरसेवक समाधान अहवाले, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष काशिनाथ कदम, भाजपा तालुकाध्यक्ष संभाजी दडे, विनायक सुतार आदींची उपस्थिती होती.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# आगामी विकास कामांसाठी ८४२ कोटींचा प्रारूप आराखडा मंजूर

- २०२५-२६च्या ९३५ कोटींच्या खर्चास मान्यता
- सर्वोत्तम कामासाठी जिल्हाधिकारी अन् सर्व विभागप्रमुखांचे कौतुक

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या शासकीय यंत्रणांना सूचना



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

जिल्हा नियोजन समितीने जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ सर्वसाधारण अंतर्गतचा ८४२ कोटीचा प्रारूप आराखडा मंजूर केलेला आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी मंजूर केलेला निधी अंतर्गतची कामांचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत. विभाग प्रमुखांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मंजूर करण्यात आलेला निधी ज्या कामासाठी मंजूर केला आहे त्याच कामावर शंभर टक्के खर्च करावा, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. दरम्यान, यंदा १०० टक्के निधी खर्च करून सर्वोत्तम काम केल्याने जिल्हाधिकारी कार्तिकेयन आणि जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांचे पालकमंत्री गोरे यांनी कौतुक केले.

येथील नियोजन भवन येथील समिती सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, महापौर विनायक कोंड्याल, खासदार प्रा. ज्योती वाघमारे, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खासदार प्रणिती शिंदे, जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, महापालिका डॉ. सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, प्रीतम कुंटला यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की, जिल्हा वार्षिक योजना सन २०२५- २६ अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्यासह नियोजन समितीचे सर्व अधिकारी यांनी समितीकडून १००% मान्यता दिलेला निधी खर्चही १००% केलेला आहे. जिल्हा नियोजन समितीचे हे सर्वोत्तम काम असून, हे काम केल्याबद्दल जिल्हाधिकारी यांच्यासह सर्व विभाग प्रमुखाचे कौतुक आहे. तसेच पालकमंत्री कार्यालयाकडून कामे पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे विशेष कार्य अधिकारी महादेव घुले यांच्याही कामाची त्यांनी प्रशंसा केली. असेच काम जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ मध्ये झाले पाहिजे, यासाठी सर्व यंत्रणा प्रमुखांनी त्यांच्या विभागांना मंजूर केलेला निधी अंतर्गतच्या कामाचे प्रस्ताव तात्काळ समितीला सादर करून त्याच्या मान्यता घ्याव्यात व तो निधी विहित काल मर्यादापूर्वी मंजूर कामावर १००% खर्च करण्याचे काटेकोरपणे नियोजन करावे ,असे त्यांनी निर्देशित केले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव

कर्जमाफी, बी २, आयटी पार्क, उजनी जलपर्यटन, उड्डाणपुल, सोलापूर व बोरामणी विमानसेवा आदींबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक निर्णय घेवून हिरवा कंदील दाखविल्याने जिल्हा नियोजन समिती बैठकीच्या सुरूवातीलाच मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला. इतकेच नाहीतर याचवेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे यांच्याही विशेष पाठपुराव्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी कौतुक केले.

सोलापूर जिल्ह्यात पाऊस अत्यंत कमी झालेला आहे त्यामुळे शेतकरी व नागरिकांनी पाणी अत्यंत जपून वापरले पाहिजे. सद्यस्थितीत पिण्याच्या पाण्याला अधिक महत्त्व दिले आहे. शेतकऱ्यांच्या शेती पंपाला वीज पुरवठा दोन तासात केला जात होता, परंतु शेतकरी बांधवांची मागणी लक्षात घेऊन आता दररोज पाच तास शेती पंपाला वीज पुरवठा देण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. जिल्ह्यात पावसाचे प्रमाण वाढल्यानंतर वीजपुरवठा आणखी सुरळीत करण्यात येईल, असेही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी सांगितले.

### शेतकऱ्यांना मिळणार आता ५ तास वीज

पुणे जिल्ह्यातील काही भागात चांगला पाऊस झाल्याने भीमा-सीना नदीमध्ये पाणी आले आहे. यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत काही आमदारांनी नदीकाठच्या शेतकऱ्यांना २ तासांवरून ५ ते ६ तास वीज चालू ठेवण्याची मागणी केली. त्यामुळे पालकमंत्री गोरे यांनी ५ तास वीज देण्यात येणार असून, त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना तसे आदेश दिले. यामुळे आता नदीकाठच्या शेतकऱ्यांना आता लवकरच ५ तास वीजपुरवठा होणार आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दि. ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीतील इतिवृत्तास अनुसरून केलेल्या कार्यवाहीच्या अनुपालन अहवालास मान्यता दिली. त्यानुसार जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ (सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) दि. ३१ मार्च, २०२६ अखेरच्या खर्चास मान्यता देण्यात आली. सन २०२६-२७ साठी ८४२ कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी पालकमंत्री महोदय व लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे सर्व संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ सर्वसाधारण योजनेसाठी दि. ३१ मार्च २०२६ अखेर ७८३ कोटी रुपयांची तरतूद होती. या तरतुदीइतकाच म्हणजे ७८३ कोटी रुपये खर्च झाल्यामुळे खर्चाची टक्केवारी १००% नोंदवण्यात आली. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १५१ कोटी तरतूद होती, या उपयोजनेसाठी १५१ कोटी रुपये खर्च झाले असून खर्च १००% झाले.

आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेसाठी ४ कोटी ६४ लाख ५१ हजार तरतूद होती व ४ कोटी ५३ लाख ६५ जात रुपये खर्च झाला. त्यामुळे खर्चाची टक्केवारी ९९.८३% इतकी नोंदवण्यात आली. एकूण तरतूद ९३५ कोटी ४४ लाख ५१ हजार रुपये इतकी असून एकूण खर्च १००% झालेला आहे, अशी माहिती जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी बैठकीत दिली. त्याचप्रमाणे जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ च्या कामांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यात आली.

या आराखड्यासाठी शासनाकडून एकूण ६९३.९० कोटींची मर्यादा कळविण्यात आली होती. राज्यस्तरीय बैठकीत नागरी भागासाठी विशेष अतिरिक्त नियतव्यय ८०.२६ कोटी रुपये कळविण्यात आले. तसेच जिल्ह्यातील अक्कलकोट व सांगोला या दोन आकांक्षित तालुक्यांसाठी १०.०० कोटी रुपये समाविष्ट करण्यात आले. त्यामुळे एकूण अंतिम नियतव्यय ८४२ कोटी रुपये इतका असून या समितीने मान्यता देण्यात यावी, असे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तम जानकर, आमदार राजेंद्र राऊत,आमदार समाधान आवताडे, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार नारायण पाटील, आमदार राजू खरे, खासदार प्रणिती शिंदे यांनी बैठकीमध्ये विविध सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मांडून ते सोडवण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी तातडीने काम करण्याची मागणी केली.

### कृष्णा-कोयना पाणी वळविल्यास कायमचा दुष्काळ हटेल

पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा नदीसह इतर काही ठिकाणचे पाणी कर्नाटकात मोठ्या प्रमाणात वाहून जाते; यातील जवळपास ५० टीएमसी पाणी वळवून सोलापूर आणि मराठवाड्यासाठी दिल्यास या भागाचा कायमचा दुष्काळ हटेल. यासाठी जवळपास १७ हजार कोटी खर्च येणार असून, हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजक्ट आहे. उजनीतून वाळू आणि गाळ काढल्यास त्या ठिकाणी अजून १५ टीएमसी पाणी वाढेल. यासाठीही सरकारकडूनही युध्दपातळीवर काम चालू आहे. एकंदरीत, कृष्णा, कोयनातून जर हा पाणी वळविण्याचा (नदीजोड) प्रकल्प राबविला तर सोलापूरसह मराठवाड्याचा संपूर्ण दुष्काळ हटेल, असा आशावाद आमदार राजेंद्र राऊत यांनी व्यक्त केला तर या विषयाला खासदार ओमराजे निंबाळकर यांनीही दुजोरा दिला.

### शहर-जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर झाले 'मंथन'

शनिवारी पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आमदार सुभाष देशमुख यांच्यासह आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तम जानकर, आमदार राजेंद्र राऊत, आमदार समाधान आवताडे, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार नारायण पाटील, आमदार राजू खरे, खासदार प्रणिती शिंदे, खा. ओमराजे निंबाळकर या सर्वांनीच शहर-जिल्ह्यातील विविध प्रश्न मांडले, शेतकरी, शेतमजूर, कामगार व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांसह जिल्ह्यातील रस्ते, शाळा, अंगणवाड्या आदींवर विस्तारित चर्चा झाली. यावेळी पालकमंत्री गोरे यांनी या सर्वांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. अधिकाऱ्यांनाही लोकप्रतिनिधींबरोबर समन्वय ठेवून काम करण्याच्या सुचना पालकमंत्री गोरे यांनी दिल्या. एकंदरीत, शहर-जिल्ह्यातील विविध प्रश्नांचे मंथन शनिवारच्या डिपीसी बैठकीत झाले.

## महत्वाचे...

### 'पीडीजी के. भोगिशयाना स्मृती व्याख्यान' मंगळवारी



**सोलापूर, दि. १२ जुलै-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूरतर्फे आयोजित करण्यात येणारे २३ वे 'पीडीजी के. भोगिशयाना स्मृती व्याख्यान' मंगळवार दि. १४ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता निर्मलकुमार फडकुले सभागृहात होणार आहे. यावर्षीचे प्रमुख वक्ते म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुहास पेडणेकर उपस्थित राहणार असून, ते राष्ट्रनिर्मितीत शिक्षकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन करणार असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष मितेश पंचमिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या वतीने शिक्षण क्षेत्रातील द्रष्टे व्यक्तिमत्त्व आणि माजी कुलगुरू स्वर्गीय पीडीजी के. भोगिशयाना यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गेल्या २३ वर्षांपासून ही व्याख्यानमला आयोजित केली जाते. कार्यक्रमाध्यक्ष केशव वळसे हे आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सचिव कॅप्टन पार्थ दावडा यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत जुबीन अमारिया, विलास कोले, शिवाजी उपरे आदी उपस्थित होते.

---

### सोलापूर पारशी अंजुमनचे झुबिन अमारिया राष्ट्रीय कार्यकारिणीत

**सोलापूर, दि. ११ जुलै-**



'फेडरेशन ऑफ पारसी झोरोस्ट्रियन अंजुमन्स ऑफ इंडिया' या राष्ट्रीय संस्थेच्या मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत येथील झुबिन अमरिया यांची राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. सोलापूर पारशी अंजुमनच्या तब्बल १८० वर्षांच्या इतिहासात हा बहुमान मिळवणारे अमरिया हे पहिलेच सोलापूरकर ठरले आहेत. झुबिन अमरिया यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा, दूरदृष्टीचा आणि समाजसेवेच्या ध्यासाचा फायदा फेडरेशनला नक्कीच होईल, तसेच देशभरातील पारशी समाज अधिक मजबूत होईल, असा विश्वास संपूर्ण भारतातील पारशी बांधवांकडून व्यक्त केला जात आहे.

# दोन सराईत चोरटे जेरबंद; ६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## एमआयडीसी पोलिसांकडून घरफोडीचा गुन्हा २४ तासांत उघड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने घरफोडीचा गुन्हा अवघ्या २४ तासांत उघडकीस आणत दोन सराईत चोरट्यांना अटक केली.

आरोपींकडून २८.४५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ३६५ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने, २५ हजार रुपये रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेली सुमारे १ लाख रुपये किमतीची मोटारसायकल असा एकूण ६ लाख ३ हजार १५८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिबरान उर्फ शोएब युनूस शेख (वय-२१ वर्षे, रा. बसवेश्वरनगर जवळ, भिमाशंकर नगर, नई जिंदगी) व प्रशांत नागेश खंदारे (वय १९ वर्षे, रा. केशव नगर इ गो. पटटी, मौलाली चौक) अशी अटक करण्यात आलेल्या त्या चोरट्यांची नावे आहेत. फिर्यादी गोरीशंकर नागनाथ कोळी (वय ५५, रा. यशोधर नगर, नई जिंदगी) हे सात जुलै रोजी पहाटे आपल्या शेजारच्या दुसऱ्या घरात कुटुंबीयासह झोपले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. लोखंडी कपाटातील सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व २५ हजार रुपये रोख असा एकूण ५ लाख ३ हजार १५८ रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाऊराव बिराजदार, पोनि गुन्हे संगीता पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक अल्फाज शेख व त्यांचे पथकातील अंमलदार, यांनी गुन्हयाचे घटनास्थळास भेट दिली. घटनास्थळाचे परिसरात मिळालेले सी.सी. टी.व्ही फुटेजची पाहणी केली व गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळिवण्याचा काम तात्काळ सुरु केले होते. दि. ८ जुलै रोजी पोसई अल्फाज शेख यांचे पथकातील पोलीस अंमलदार अमर शिवशिंगवाले व पोकॉ. नागेशसिंह चव्हाण यांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोलीस उप निरीक्षक अल्फाज शेख व त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी बसवारुठ मठ, शांतीनगर जवळ सापळा लावून वरील दोघा आरोपींना मोटर सायकलसह ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांच्याकडून चोरीतील सर्व मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली. त्यामुळे घरफोडीचा हा गुन्हा अवघ्या २४ तासांत उघडकीस आला.



### चोरलेले १९ ग्रॅम सोन्याचे कडे हस्तगत, सदर बाजार पोलिसांची कामगिरी

सदर बाजार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने चोरीच्या गुन्ह्याचा यशस्वी तपास करून चोरीस गेलेले १ लाख रुपये किमतीचे १९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कडे जप्त केले. पियुष राजू शिंदे याला अटक करण्यात आली आहे. फिर्यादी रोहिणी विकास कांभारकर (वय ४४ वर्ष ,रा गौरीशंकर अपार्टमेंट रामलाल चौक) हा ३० जानेवारी २०२६ रोजी होम मैदान परिसरात गड्डा येथे असताना, अज्ञात व्यक्तीने त्यांच्या उजव्या हातातील १९ ग्रॅम वजनाचे, सुमारे १ लाख रुपये किमतीचे सोन्याचे कडे चलाखीने चोरून नेले होते. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. याचा तपास सुरू असताना गुन्हे प्रकटीकरण पथकाला गुप्त बातमीदारामार्फत, चोरीतील सोन्याचे कडे विक्रीसाठी एक व्यक्ती ७० फूट रोड येथील सराफ बाजारात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून वरील आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली.

दोन्ही कारवाई पोलीस आयुक्त डॉ. एम. राजकुमार, पोलिस उपआयुक्त परिमंडळ डॉ. प्रितम यावलकर, पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त विजयालक्ष्मी कुर्री, प्रताप पोमन यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाऊसाहेब बिराजदार व पोलीस निरीक्षक संगीता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख फौजदार अल्फाज शेख, पोलीस अंमलदार, एकनाथ उबाळे, संदीप जावळे, संचिन भांगे, मंगेश गायकवाड, आमसिध्द निंबाळ, अय्याज बागलकोटे, सुहास अर्जुन, अमर शिवशिंगवाले, नागेशसिंह चव्हाण, कुमार बोल्ली, अजित माने, सकलेन मुकादम, अविनाश दिघोळे यांनी तर सदर बाजार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) रविंद्रनाथ भंडारे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल सावंत, पोलीस अमलदार संतोष पापडे, मुलाणी, राजेश चव्हाण, प्रमोद पकाले, उमेश चव्हाण, हणमंत पुजारी, विशाल बोराडे, अमीन शेख, सागर गुंड, सोमनाथ सुरवसे आणि आनंद निंबाळकर यांनी बजावली आहे.

# जलसंपदा प्रकल्पांवरील कृषी पंपांना आता ५ तास वीजपुरवठा

## आमदार सुभाष देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जुलै-**

दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांनी विधानसभेच्या अधिवेशनात नदीकाठच्या शेतकऱ्यांना केवळ दोन तास वीजपुरवठा दिला जात असल्याचा प्रश्न जोरदारपणे उपस्थित केल्यानंतर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. संबंधित मंत्र्यांनी तातडीने दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्यानंतर जलसंपदा प्रकल्पांवरील कृषी पंपांचा वीजपुरवठा वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यापूर्वी दोन तास सुरू असलेला वीजपुरवठा आता संबंधित प्रकल्पांनुसार चार ते पाच तास करण्यात आला आहे. दरम्यान, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतही हाच विषय आमदार सुभाष देशमुख यांनी विषय मांडला होता; त्यावेळी पालकमंत्र्यांनीही हा विषय तातडीने मार्गी लावण्याची ग्वाही दिली होती.



अल्पनिमग्नता उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) ला याबाबत आदेश दिले आहेत. १० जुलै २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उजनी जलाशय, भीमा नदीवरील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे तसेच आष्टी मध्यम प्रकल्प परिसरातील कृषी पंपांना वाढीव वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आदेशानुसार पंढरपूर, गुरसाळे, पिराची कुरोली आणि उचेठाण परिसरातील कृषी पंपांना आवश्यक सेवेसाठी चार तास, तर गोंदीपूर, भंडारकवठे, उमराण, लवंग, औज, बरूर, चिंचपूर, आळगी, हिंगणी, खानापूर आणि हिळी येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांवरील कृषी पंपांना पाच तास वीजपुरवठा सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाने महावितरण आणि जलसंपदा विभागाला दिल्या आहेत. वाढीव वीजपुरवठ्यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा दिलासा मिळणार असून, खरीप हंगामात पिकांना वेळेवर पाणी देणे अधिक सुलभ होणार आहे. त्यामुळे या निर्णयाचे शेतकरी वर्गातून स्वागत होत आहे.

आज झालेल्या डिपीसी बैठकीत आमदार सुभाष देशमुख यांनी शहरातील अवैध धंद्यात वाढ होत असल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. इतकेच कायतर शहरातील सिध्देश्वर विहार, नाना नानी पार्क, शहरातील आदिला नदी, कुडलसंगमासाठी येणारा निधी, नागरिकांचे आरोग्याचे प्रश्न आणि अंगणवाड्यांची नव्याने मागणीही आमदार देशमुखांनी डिपीसी बैठकीत केली. यातील बहुतांश प्रश्न लवकर मार्गी लावण्याची ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट संचलित
**श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, सोलापूर**
रुपाभवानी मंदिर रोड, भवानी पेठ, सोलापूर
Programmes Accredited by NBA, New Delhi.
**डिप्लोमा प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश**
Facilitation Center : 6458
Online Option Form Filling ची मोफत सोय
कन्नड भाषिक अल्पसंख्यांकासाठी ५१% जागा राखीव

| Sr. No. | Courses | Intake Capacity | Reservation for Linguistie Minority (Kannada) | | Choice Code |
|---|---|---|---|---|---|
| | | | % | Seat | |
| 1 | Artifical Intelligence (AI) & Machine learning (Women) | 60 | 51% | 31 | 645899850F |
| 2 | Civil Engineering (Women) | 30 | 51% | 15 | 645819150F |
| 3 | Computer Engineering (Women) | 120 | 51% | 61 | 645824550F |
| 4 | Information Technology (Women) | 60 | 51% | 31 | 645824650F |
| 5 | Electrical Engineering (Women) | 60 | 51% | 31 | 645829350F |
| | Electronics & Tele. Engg (Women) | 60 | 51% | 31 | 645837250F |

प्रथम वर्ष - CAP Round I करीता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख ११ जुलै ते १३ जुलै २०२६.
थेट द्वितीय वर्ष - CAP Round I करीता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख १३ जुलै ते १५ जुलै २०२६.
कार्यालय स. १० ते सा.०६ वाजेपर्यंत आणि रविवार व इतर सुट्टीच्या दिवशीही खुले राहील.
- प्रवेशासाठी संपर्क -
प्रा. श्रीशैल मळेवाडी ९९२२३६२०३५ प्रा. प्राजक्ता सप्तश्वा ९८२२२६१४८६
प्रा. सुचेता चौधरी ९८९०८६९८२६ प्रा. प्रविण गौडा ८४२१८६२६४५


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४९९

**मातेपाशी आहे नाही । बालक नेणेची काही ।।**
**जैसे मातेपाशी बाळ । सांगे जीवींचे सकळ ।।**

आई म्हटले की निःस्वार्थ प्रेम, लडिवाळपणा, हट्टाची पूर्तता ही आलीच. आर्थिक दरिद्री असलेली मातासुध्दा आपल्या लेकराचे लळे कोणत्या का पध्दतीने होईनात; पण ते पुरवल्याशिवाय राहात नाही. अर्थात, माता ही आर्थिक दरिद्री म्हणजेच गरीब असली तरी ती लेकराचे लळे पुरवण्यात कमी पडत नाही. आपल्या आईजवळ आपण मागतो ते उपलब्ध आहे का ? याचा विचार कोणतेही बालक करीत नाही. त्याला जेव्हा वाटेल जे वाटेल ते तिच्याकडे मागते आणि त्याची माता आहे त्या परिस्थितीतून मार्ग काढून त्याचा लळा पुरवते. अगदी पंढरीची माऊली सुध्दा भक्तरुपी लेकरांचा अट्टहास असाच पुरवते. **मातेपाशी आहे नाही । बालक नेणेची काही ।।**, सेनाजींच्या या म्हणण्याप्रमाणे या विठू माऊलीकडे काय उपलब्ध आहे, काय उपलब्ध नाही, याचा भक्तरुपी लेकरांनी विचार करायचा नसतो. जगाच्या कल्याणासाठी वाट्टेल ते म गायचे असते आणि या माऊलींनी ते पुरवायचे असते. विठू माऊली भक्तांचे लळे पुरवण्यात कधीच कमी पडत नाही, असा सेनाजींचा विश्वास आहे. भक्तांनी स्वार्थापोटी कांही मागू नये. भक्तीही स्वार्थापोटी करू नये, असेही सेनाजींना वाटते.



सेनाजींची ही अपेक्षा पूर्ण करणाराच खरा भक्त असेल असे आम्हास वाटते. विठू माऊली जशी आई आहे, तसे संतही आई असतात.

**मातेपाशी आहे नाही । बालक नेणेची काही ।।**
**जैसे मातेपाशी बाळ । सांगे जीवींचे सकळ ।।**

कोणत्याही मुलांचे लहानपणी खरे विश्व हे त्यांची आई असते. विश्वाचे सर्व रुप आईच्या ठिकाणी एकवटलेले असते. म्हणूनच हे मूल सुख दुःखाच्या सर्व गोष्टी मनमोकळेपणाने फक्त आईपुढे मांडते. आईपुढे बोलतांना त्याला कसलाच संकोच वाटत नाही. पण या मुलाला जेव्हा तारूण्याचा सहवास लाभतो, तेव्हा मात्र त्याला भौतिक विश्वाची जाणीव होऊ लागते आणि दुर्दैवाने हे मूल तारूण्यात आईरुपी विश्वाला संकुचित करते. पण आपल्या बाबतीत असे घडणार नाही. कारण माझी संत, महात्मारुपी आई ही सदैव विश्वरूप आहे. मी या आईजवळ कसलाच संकोच न करता सातत्याने सर्व कांही सांगत राहतो. असे सांगत असतांना मला तारूण्याची, संसाराची, भौतिक सुख वस्तूची जाणीव होत नाही. सातत्याने मला फक्त आत्मानंदाची जाणीव होते. आत्मानंदाच्या अनुषंगाने बोलतांना आपण संत महात्मारुपी आईशी एकरूप होऊन जातो. **जैसे मातेपाशी बाळ । सांगे जीवींचे सकळ ।।**, असे सेनाजी म्हणतात. आपणाला विठू माऊली तसेच संत महात्मा रुपी आईशी एकरूप होता नाही आले तरी चालेल; पण जन्मदात्या आईपासून तरी दूर होता कामा नये. कारण असे झाले तर जीवनाला, मोठेपणाला काहीच अर्थ उरत नाही. म्हणून आपणही आईपासून दूर होऊ नये व आई वडीलांनी आपल्यापासून दूर करु नये. प्रसंगानुरुप आपली आई ही वडिल होऊ शकते व आपले वडील हे आई होऊ शकतात. त्यामुळे आईवडिलांप्रतीचा भाव सारखा राहील याकडे लक्ष असणे योग्य होईल. जय जय राम कृष्ण हरी ।।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

# जलजीवन मिशनसाठी झेडपीची भरती प्रक्रिया सुरु

## निवृत्त अभियंते व अधिकाऱ्यांना संधी

### करार पद्धतीने नियुक्ती; १४ जुलैपर्यंत अर्ज स्वीकारणार



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ११ जुलै -

ग्रामीण भागातील जलजीवन मिशनची कामे अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने अनुभवी म नुष्यबळाचा आधार घेण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत राज्य पाणी व स्वच्छता मिशनअंतर्गत रिक्त पदे भरण्यासाठी सेवानिवृत्त शासकीय व निमशासकीय अधिकाऱ्यांकडून करार पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.

या भरती प्रक्रियेत सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य) तसेच वर्ग-१ आणि वर्ग-२ संवर्गातील अधिकारी पात्र असणार आहेत.

जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या विविध पाणीपुरवठा योजनांची प्रभावी अंमलबजावणी, तांत्रिक देखरेख आणि प्रशासकीय काम काज अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ही नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेकडून देण्यात आली.

या नियुक्त्या राज्य शासनाच्या १० डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयानुसार करार तत्त्वावर करण्यात येणार असून, त्यामधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील. त्यामुळे अनुभवी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या ज्ञानाचा आणि प्रशासकीय अनुभवाचा लाभ जलजीवन मिशनला मि ळणार असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह १४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

भरतीसंदर्भातील पात्रता, अटी, अर्जाचा नमुना आणि इतर सविस्तर माहिती जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून, पात्र सेवानिवृत्त अधिकारी व अभियंत्यांनी मुदतीपूर्वी अर्ज सादर करून या संधीचा लाभ घ्यावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पत्रकारांसाठी आज मोफत आरोग्य तपासणी शिबीर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ११ जुलै-

स्व. राजेश अण्णा कोठे यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरातील प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडिया प्रतिनिधींसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अक्कलकोट रोड, एमआयडीसी येथील महालक्ष्मी बँकेट येथे पार पडणार आहे. या शिबिरामध्ये पत्रकारांसाठी लिव्हर फंक्शन टेस्ट, हिपॅटायटिस बी आणि सी, रँडम ब्लड शुगर, तसेच संगणकीकृत नेत्र तपासणी या अत्यंत महत्त्वाच्या वैद्यकीय चाचण्या पूर्णपणे मोफत केल्या जाणार आहेत.



पत्रकारितेतील धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीचा विचार करून, ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. श्रीकांत पाटणकर यांचे 'ताणतणाव व्यवस्थापन' या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले आहे. शिबिरात उपस्थित राहणाऱ्या सर्व मीडिया प्रतिनिधींसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व पत्रकार बंधू-भगिनींनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक व गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. सूर्यप्रकाश राजेश कोठे यांनी केले आहे.



## महापौर कोंड्याल यांचा शहरातील नाल्यांवर फोकस

सोलापूर, दि. ११ जुलै-

पावसाळ्यात शहरात पाणी साचून नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी महापौर विनायक कोंड्याल यांनी नाला क्रमांक ४-अ, ४-ब, निरंजन नगर, वजेश्वरी नगर तसेच एमआयडीसी परिसरातील नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनाला तातडीच्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

महापौर कोंड्याल यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून नाल्यांची सद्यस्थिती, पाण्याचा प्रवाह, गाळ साचलेली ठिकाणे तसेच पूरस्थिती टाळण्यासाठी सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यात सभागृहनेते नरेंद्र काळे, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, नगर अभियंता सारिका आकूलवार, गोकुळ चितारे, चंद्रकांत गुंडे, अभिषेक चिंता उपस्थित होते. ज्या ठिकाणी गाळ, कचरा किंवा अतिक्रमणामुळे पाण्याचा निचरा बाधित होत असल्याचे निदर्शनास आले, त्या ठिकाणी तातडीने साफसफाई करून आवश्यक कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पावसाळ्यात कोणत्याही भागात पाणी साचणार नाही, यासाठी नाल्यांची नियमित पाहणी करून पाणी निचऱ्याची व्यवस्था सुरळीत ठेवावी, असे निर्देशही त्यांनी संबंधित विभागाला दिले.

# 'एजी पाटील' च्या विद्यार्थ्यांची पर्यावरणपूरक किमया

## पावलांच्या ऊर्जेतून आता वीज निर्मिती



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ११ जुलै-

सोलापूर शहरातील ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या मेकॅनिकल इंजिनीअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी एक अभिनव आणि पर्यावरणपूरक प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केला आहे. विद्यार्थ्यांच्या या चमूने मानवी पाऊलखुणांच्या मेकॅनिकल ऊर्जेचा वापर करून थेट वीज तयार करणारे स्मार्ट-स्टेप: कायनेटिक एनर्जी हार्वेस्टर यंत्र तयार केले आहे. या मशीनद्वारे दैनंदिन चालण्या-बोलण्यातून वाया जाणारी ऊर्जा साठवून ती वीज स्वरूपात वापरता येते, जी भविष्यातील ऊर्जा टंचाईवर एक उत्तम पर्याय ठरु शकते.

या प्रकल्पामध्ये बी.ई. अंतिम वर्षातील विद्यार्थी विजय बुरा, ओंकार ध्यामे, हर्ष बुरजे आणि हर्षद घोटणे यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या प्रकल्पाला प्रा. अभिजीत मळेकर यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले, ज्यामुळे हा प्रयोग शास्त्रीय दृष्टिकोनातून अचूक रित्या पार पडला.

विद्यार्थ्यांनी या संपूर्ण यंत्राची रचना पायझोइलेक्ट्रिक मॅट्रिक्स वायरिंग आणि चाचण्या स्वतः पार पाडल्या, ज्यामुळे त्यांच्या व्यावसायिक व तांत्रिक कौशल्यात लक्षणीय वाढ झाली.

या उपक्रमास विभागप्रमुख डॉ. एस. बी.गदवाल आणि प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या संशोधनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : रविवार,
दि. १२ जुलै २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - ज्येष्ठ कृ. त्रयोदशी
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- रोहिणी (०८.२८)
योग - वृद्धि (२०.०६)
करण - गरज (१२.१८)
राहू काल : रविवार
दु. ०४.३० ते ०६.००

दिनविशेष :१६७४: छत्रपती शिवाजी महाराजांनी इंग्रजांशी मित्रत्वाचा तह केला.
१९४९: भारतीय क्रिकेट खेळाडू नारायण साठम यांचा जन्म.
१९६१: प्रसिद्ध दाक्षिणात्य (कन्नड) अभिनेते, गायक आणि निर्माते शिव राजकुमार यांचा जन्म.
१९९९: हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते राजेंद्र कुमार यांचा मृत्यू.
२०१२: प्रसिद्ध भारतीय कुस्तीपटू आणि अभिनेते दारा सिंग यांचा मृत्यू.



बालगंधर्व | अपर्णा सहस्त्रबुद्धे | गुरू वठारे

## नटसम्राट बालगंधर्व स्मृतीदिनानिमित्त बुधवारी स्वर आराधना कार्यक्रम

### गुरू वठारे आणि अपर्णा सहस्त्रबुद्धे यांचा होणार गौरव

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ११ जुलै-

मराठी संगीत रंगभूमीचे दैवत नटसम्राट बालगंधर्व यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून कै. सिध्दा पाटील स्मृती समितीतर्फे यावर्षीही भव्य सांस्कृतिक व संगीत कार्यक्रम बुधवार १५ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजिला आहे.

येथील हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात (अॅम्फी थिएटर) 'अनाहत' सोलापूर प्रस्तुत ''स्वर आराधना'' हा बहारदार कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमामध्ये हैदराबाद येथील नामांकित ज्येष्ठ गायिका आराधना कऱ्हाडे-शास्त्री आपल्या सुमधूर आवाजात शास्त्रीय व नाट्यसंगीताची मैफल सादर करणार आहेत. त्यांना तबल्यावर विवेक कायल तर संवादिनीवर (हार्मोनिअम) ओंकार पाठक यांची साथसंगत लाभणार आहे. या कार्यक्रमाचे दिग्दर्शन आणि निवेदन मंजुषा गाडगीळ करणार आहेत. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून नाट्य क्षेत्रातील प्रसिद्ध संयोजक व व्यवस्थापक गुरु वठारे तसेच पाटील परिवाराच्या जुन्या स्नेही, प्रसिद्ध भारूड व कीर्तनकार आणि वि. मो. मेहता प्रशालेच्या माजी मुख्याध्यापिका अपर्णा सहस्त्रबुद्धे यांना त्यांच्या उल्लेखनीय व प्रदीर्घ सेवेबद्दल गौरविण्यात येणार आहे. हा सत्कार सोहळा महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा सोलापूरचे अध्यक्ष व जिल्हा प्रमुख आणि माजी प्राचार्या डॉ. श्रुती श्री. वडकबाळकर यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. संगीतप्रेमी व रसिक प्रेक्षकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन कै. सिध्दा पाटील स्मृती समितीचे अॅड. आर. एस. तथा बाबू पाटील यांनी केले आहे.

# प्रोएज कॉमर्स प्रोफेशनल अकॅडमीचे सीए फाऊंडेशन परीक्षेत यश




तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ११ जुलै-

एस.पी.एम. इंग्लिश स्कूल, सोलापूर यांच्या सहकार्याने सुरू झालेल्या प्रोएज कॉमर्स प्रोफेशनल अकॅडमीने आपल्या पहिल्याच शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय यश संपादन करत सीए शिक्षण क्षेत्रात दमदार सुरुवात केली आहे.

मे २०२६ मध्ये झालेल्या सीए फाऊंडेशन परीक्षेत अकॅडमीच्या पहिल्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवत संस्थेचा लौकिक वाढविला. यामध्ये खुशी नानकानी हिने २६७/४०० गुण मिळवत उत्कृष्ट यश संपादन केले. तसेच अलेख्या कंदुकुरी हिंने २३९/४००, अमानुल्ला सय्यद याने २२२/४०० आणि हमजा पटवेगर याने २०७/४०० गुण मिळवत सीए फाऊंडेशन परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली. विद्यार्थ्यांचा सत्कार सीए राजेश पाटवर्धन, एस.पी.एम. शाळेचे स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य सुरेशबाबू मंकणी तसेच एस.पी.एम. इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या संगीता कोळी यांच्या हस्ते करण्यात आला.

या यशामागे अकॅडमीच्या सीए तन्वी अत्रे, नंदिनी पवार, मोहम्मद सलाहुद्दीन, अंकिता मुर्त्या, अंजली भुतडा, शुभम चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.



# ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेचा वर्धापन दिन उत्साहात

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ११ जुलै-

ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेचा ८१ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या समारंभाला बालविकास मंदिरचे माजी विद्यार्थी अॅड. नितीन हबीब हे प्रमुख पाहुणे लाभले होते.

प्रमुख पाहुणे, संस्थेचे सहकार्यवाह डॉ. अमोल गांगजी, प्रशालेचे विश्वस्त बसवराज बिराजदार, प्रशालेचे विश्वस्त व चैतन्यभुवनचे व्यवस्थापक श्रीरंग कुलकर्णी व मुख्याध्यापिका प्रवीणा काळे यांच्या हस्ते इ.५वी ते १०वी च्या १२३ विद्यार्थ्यांचा २७५ पारितोषिके देवून गौरव केला. या पारितोषिकात इयत्तांनुसार पहिले तीन, सर्व विषयात प्रथम, गुणवत्ता वाढ, क्रीडा, शाळाबाह्य स्पर्धा, वर्षभर उपस्थिती अशा विविध प्रकारच्या पारितोषिकांचा समावेश होता. प्रस्ताविक पर्यवेक्षिका उज्वला अलकुंटे यांनी केले. समारोपात संस्थेचे सहकार्यवाह डॉ. अमोल गांगजी यांनी पारितोषिक प्राप्त सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# जिल्हा वार्षिक आराखडा

## सोलापूरच्या विकासाला नवी दिशा देणारा महत्त्वाचा टप्पा

सोलापूर जिल्ह्याच्या विकासाचा वेग ठरवणाऱ्या जिल्हा वार्षिक आराखड्याची प्रक्रिया आता निर्णायक टप्प्यात आली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजना) तयार करण्याचे काम वेगाने सुरू असून, जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) बैठकीपूर्वी सर्व विभागांनी आपले प्रस्ताव अंतिम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद आणि विविध विभागांमध्ये विकासकामांचे नियोजन, प्राधान्यक्रम आणि निधीची आखणी करण्यासाठी मोठी लगबग सुरू आहे.

जिल्हा वार्षिक आराखडा हा केवळ आर्थिक तरतुदींचा दस्तऐवज नसतो, तर पुढील वर्षभर जिल्ह्यात कोणत्या क्षेत्रात आणि कोणत्या कामांना प्राधान्य दिले जाणार, याचा आराखडा असतो. त्यामुळे या प्रक्रियेकडे प्रशासनाबरोबरच लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य नागरिकांचेही लक्ष लागलेले असते. यंदाच्या आराखड्यात शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, लघुपाटबंधारे, आरोग्य, सामान्य प्रशासन आणि पशुसंवर्धन या विभागांना विशेष प्राधान्य देण्यात येत आहे. ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न या नियोजनातून दिसून येत आहे.

शिक्षण क्षेत्रात शाळांची दुरुस्ती, नवीन वर्गखोल्या, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा आणि शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी निधीची तरतूद प्रस्तावित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ग्रामीण रस्ते, पूल आणि इतर पायाभूत सुविधा मजबूत करण्याचे नियोजन आहे. लघुपाटबंधारे विभागाकडून सिंचन क्षमता वाढविणाऱ्या योजना राबविण्यावर भर दिला जाणार आहे. आरोग्य विभागामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, वैद्यकीय उपकरणे आणि आरोग्य सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी निधीची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय महिला व बालविकास, समाजकल्याण, कृषी, ग्रामीण पाणीपुरवठा आणि पशुसंवर्धन या विभागांच्याही विविध योजनांचा आराखड्यात समावेश करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या योजना, शेतकऱ्यांसाठी सुविधा, महिला व बालकल्याणाच्या योजना आणि पशुधन विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे विकासाचा लाभ केवळ एका क्षेत्रापुरता मर्यादित न राहता सर्व घटकांपर्यंत पोहोचावा, हा उद्देश या नियोजनामागे दिसून येतो. मात्र, जिल्हा वार्षिक आराखड्यासमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे प्रस्तावित आणि मंजूर निधीतील तफावत. दरवर्षी विभागांकडून मोठ्या प्रमाणात निधीची मागणी केली जाते; परंतु प्रत्यक्ष मंजुरी त्यापेक्षा कमी मिळते. परिणामी अनेक विकासकामांना टप्प्याटप्प्याने मंजुरी द्यावी लागते किंवा काही कामे पुढे ढकलावी लागतात. त्यामुळे यंदा अधिकाधिक निधी मंजूर करून घेण्यासाठी प्रशासनाला प्रभावी पाठपुरावा करावा लागणार आहे.

गेल्या काही वर्षांत जिल्हा वार्षिक आराखड्याच्या आकारात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. यंदाही निधीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जर प्रस्तावित वाढीला मंजुरी मिळाली, तर जिल्ह्यातील अनेक प्रलंबित विकासकामांना गती मिळू शकते. विशेषतः ग्रामीण रस्ते, शाळांच्या इमारती, आरोग्य सुविधा, सिंचन प्रकल्प आणि पाणीपुरवठा योजनांना याचा मोठा फायदा होईल.

## जिल्हा परिषदेतून



यशवंत गुरव
मो. ८८८८६५०७५५

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबद्ध खर्च करणे ही काळाची गरज आहे. उपलब्ध निधीचा उपयोग केवळ नवीन कामांसाठीच नव्हे, तर सुरू असलेली कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठीही होणे आवश्यक आहे. विकासकामांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता, गुणवत्तेवर भर आणि वेळेचे नियोजन राखले, तर निधीचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत पोहोचू शकतो. आता सर्वांचे लक्ष आगामी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीकडे लागले आहे. या बैठकीत अंतिम आराखड्याला मंजुरी मिळाल्यानंतर विभागनिहाय निधी निश्चित होईल आणि विकासकामांना प्रत्यक्ष सुरुवात होईल.

त्यामुळे २०२६-२७ चा जिल्हा वार्षिक आराखडा हा सोलापूर जिल्ह्याच्या विकासाची पुढील दिशा ठरवणारा महत्त्वाचा दस्तऐवज ठरणार आहे.एकंदरीत, शिक्षण, आरोग्य, रस्ते, सिंचन, पाणीपुरवठा, कृषी आणि सामाजिक विकास या सर्व क्षेत्रांना बळ देणारा हा आराखडा प्रभावीपणे राबविला गेला, तर ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनमानात निश्चितच सकारात्मक बदल घडू शकतो. त्यामुळे केवळ निधी मंजूर होणे पुरेसे नसून, त्याची वेळेत आणि नियोजनबद्ध अंमलबजावणी होणे हेच खऱ्या अर्थाने जिल्ह्याच्या विकासाचे यश ठरणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



महत्वाचे...



## सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थी पदग्रहण समारंभ

**सोलापूर, दि. ११ जुलै-**

सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव कॅम्पसचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर शहरचे उपायुक्त पोलिस प्रितम यावलकर उपस्थित होते. दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन आणि सिंहगड संस्थेच्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर हेड बॉय, हेड गर्ल, स्पोर्ट्स कॅप्टन, सांस्कृतिक कॅप्टन, हाऊस कॅप्टन्स व विविध समित्यांच्या पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते सॅश, बॅज व पदचिन्हे प्रदान करण्यात आली. यावेळी शौर्य नवले याने हेड बॉय, सानवी सिंगरी हिने हेड गर्ल, समर्थ मगर याने स्पोर्ट्स कॅप्टन, विदिशा अंभोरे हिने व्हाइस स्पोर्ट्स कॅप्टन, पृथ्वीराज शिंदे याने कल्चरल कॅप्टन तर सरस्वती कुरापाटी हिने व्हाइस कल्चरल कॅप्टन म्हणून शपथ घेतली. अध्यक्षीय समारोपात संजय नवले यांनी विद्यार्थी परिषद ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी शाळा असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन मयुरी भोसले व श्रुती साठे यांनी केले.



## करकंब पोलिसांकडून ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन

**करकंब, दि. ११ जुलै-**


करकंब पोलिस ठाणे हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांची महत्त्वपूर्ण बैठक करकंब पोलिस स्टेशन येथे पार पडली. यावेळी नवीन कायदे, ऑनलाईन फसवणूक तसेच विविध सामाजिक विषयांवर संवाद साधण्यात आला. ज्येष्ठ नागरिकांच्या अडी-अडचणी व समस्यांवर चर्चा झाली. सायबर गुन्ह्यांबाबत विशेष जनजागृती केली. ओटीपी, बँक खाते क्रमांक, एटीएम पिन, सीव्हीव्ही, पासवर्ड आदी माहिती कोणालाही देऊ नये. अनोळखी व्यक्तींना घरात प्रवेश देऊ नये आदी सूचना दिल्या. संबंधितांना ११२ व १९३० या हेल्पलाईन क्रमांकांवर गरजेच्या वेळी तत्काळ संपर्क साधण्याचे आवाहन सपोनि योगेश लंगुटे यांनी केले. यावेळी करकंब पोलीस स्टेशन अंतर्गत पो.हे. लक्ष्मण भांगे, पो.ना. शेखर भोसले उपस्थित होते.



## एनसीसी कॅडेट्सची पोलीस शिपाईपदी निवड

**बार्शी, दि. ११ जुलै-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील एनसीसी विभागातील एनसीसी कॅडेट्स सीनियर अंडर ऑफिसर शिवम नलावडे व ज्युनिअर अंडर ऑफिसर तन्मय शेडे या दोघांची मुंबई पोलिसमध्ये शिपाईपदी निवड झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी डॉ. समाधान पवार, एनसीसी विभागाचे एएनओ लेफ्टनंट डॉ. अशोक अनमुलवार उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव प्रकाश पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे यांनी अभिनंदन केले.



## तानाजी जमादार यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान

**वळसंग, दि. ११ जुलै-**

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत सहशिक्षक म्हणून कार्यरत असलेले तानाजी जमादार यांना सोलापूर जिल्हा मराठी अध्यापक संघातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.सदर पुरस्कार प्रदान सोहळा शुक्रवार दि. १० जूलै रोजी सिंहगड इन्स्टिट्यूट, कोर्टी, तालुका पंढरपूर येथे दुपारी ३ वाजता झाला. माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हा मराठी अध्यापक संघाचे अध्यक्ष राजेंद्र आसवे, उपाध्यक्ष सुभाष भिमणवरू, सचिव शशिकांत उपासे व इतर सर्व पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत वरील गुणवंत शिक्षक पुरस्कार तानाजी जमादार यांना देण्यात आला. तसेच फेटा बांधून, शाल, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करून सपत्नीक गौरविण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य वीरेश थळंगे, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले, शैलजा जमादार व साईगंधा जमादार उपस्थित होते.

# 'बळीराजा'च्या उपोषणाला मोठे यश

## भोसरे पाझर तलाव दुरुस्तीची प्रक्रिया सुरू

### ४३ लाख ३८ हजाराचे अंदाजपत्रक तयार

### ८ ते १० दिवसांत तांत्रिक मंजुरीचे लेखी आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. ११ जुलै-**

भोसरे येथील गट क्र. ६२/२ मधील बळीराजा वन पाझर तलाव दुरुस्तीच्या मागणीसाठी बळीराजा वन पाझर तलाव समन्वय समितीने जाहीर केलेल्या बेमुदत अन्नत्याग उपोषणाला मोठे यश मिळाले आहे. प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत तलाव दुरुस्तीचे ४३ लाख ३८ हजारचे अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

मृद व जलसंधारण उपविभाग, मोडनिंब यांनी दिलेल्या पत्रानुसार, ८ ते १० दिवसांत तांत्रिक मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन दिले आहे. त्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), मोहोळ यांनी अंदाजपत्रक जिल्हा जलसंधारण अधिकारी, सोलापूर यांच्याकडे तांत्रिक मंजुरीसाठी पाठविले आहे. जिल्हा जलसंधारण विभागानेही प्रस्ताव तातडीने पुणे कार्यालयाकडे सादर केला आहे. प्रशासनाने लेखी स्वरूपात कार्यवाही सुरू केल्याने बळीराजा वन पाझर तलाव समन्वय समितीने प्रस्तावित बेमुदत अन्नत्याग उपोषण रात्री उशिरा पत्र हाती येताच स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

आंदोलनाला माजी आमदार संजयमामा शिंदे, जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी श्रीपाद दळवे, माजी जिल्हा परिषद सदस्य अप्पासाहेब उबाळे, नगराध्यक्षा जयश्री भिसे, नगरसेविका, यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, शेतकरी व ग्रामस्थांचा पाठिंबा लाभला. समितीने सर्वांचे आभार मानत तलावाची दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले.



१९७२ मध्ये उभारलेल्या या तलावाची ५३ वर्षांत दुरुस्ती झाली नाही. मात्र आता प्रशासनाने सकारात्मक पावले उचलली आहेत. त्याचे स्वागत करतो. तलावाची दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत समितीचा लढा सुरूच राहील.

**हर्षल बागल**
प्रमुख बळीराजा वन पाझर तलाव समन्वय समिती, भोसरे.

### संजयमामांचा फोन; दळवे यांचे ७ तास निर्णायक

उपोषणाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी श्रीपाद दळवे यांनी दुपारी २ ते रात्री ९ वाजेपर्यंत सोलापूर येथील वन विभाग व जलसंधारण विभागाच्या कार्यालयात ठाण मांडून मंजुरी प्रक्रियेचा सातत्याने पाठपुरावा केला. दरम्यान, माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून आवश्यक सूचना दिल्याने अनेक दिवस प्रलंबित असलेल्या प्रक्रियेला गती मिळाल्याची भावना उपोषणकर्त्यांनी व्यक्त केली.

## जिल्हा उपनिबंधकपदी मुकुंद पवार

### पुन्हा बार्शीचीच सरशी; सहकार क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवाचा सहकारी संस्थांना लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै**

सोलापूर जिल्ह्याच्या सहकार प्रशासनात महत्त्वाचा बदल झाला आहे . जिल्हा उपनिबंधकपदी पुणे शहरचे उपनिबंधक मुकुंद पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांची अहिल्यानगर येथे प्रादेशिक साखर सहसंचालक म्हणून पदोन्नतीने बदली झाल्यानंतर रिक्त झालेल्या पदावर पवार यांची नियुक्ती झाली आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे उपसचिव नितीन गायकवाड यांनी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत. बार्शी तालुक्यातील घाणेगाव



येथील मूळ रहिवासी असलेल्या मुकुंद पवार यांनी एम.एस्सी. (अॅग्री) शिक्षण घेतले. २००१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक निबंधक म्हणून त्यांची निवड झाली. भंडारा येथून त्यांनी शासकीय सेवेला सुरुवात केली. त्यानंतर करमाळा, माढा, इंदापूर आणि मावळ येथे सहायक निबंधक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली.

सहकार आयुक्तांचे खासगी सचिव, पिंपरी-चिंचवड झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील सहायक निबंधक, पणन संचालनालयातील सहायक पणन संचालक तसेच गोंदिया जिल्हा उपनिबंधक अशा विविध महत्त्वाच्या पदांवर त्यांनी काम केले आहे.

### कामकाजात अधिक पारदर्शकतेची शक्यता

सोलापूर जिल्ह्यात काम केल्यामुळे येथील सहकारी संस्था, त्यांची रचना आणि स्थानिक सहकार चळवळीची त्यांना चांगली जाण आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या कामकाजात अधिक गती, पारदर्शकता आणि प्रभावी समन्वय साधण्यास त्यांच्या अनुभवाचा उपयोग होईल, अशी अपेक्षा सहकार क्षेत्रातील पदाधिकारी आणि संस्थाचालकांकडून व्यक्त केली जात आहे.

### आठ ते दहा दिवसांत स्वीकारतील पदभार

सध्या पवार यांच्याकडे विशेष मतदारयादी पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेचा अतिरिक्त कार्यभार आहे. पर्यायी व्यवस्था झाल्यानंतर ते पुढील आठ ते दहा दिवसांत सोलापूर जिल्हा उपनिबंधकपदाचा कार्यभार स्वीकारतील, अशी माहिती सूत्रांनी दिली.

## होर्ती येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जुलै-**

होर्ती (ता. इंडी, जि. विजयपूर) येथील श्री रेवणसिध्देश्वरमंदिरपरिसरातीलशासकीयशाळेतील इयत्ता १ ली ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना आशालता जवळेकर आणि अशोककुमार जवळेकर यांच्या स्मरणार्थ शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी अधिक उत्साह निर्माण होण्यास मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

शैक्षणिक साहित्य वाटपाबरोबरच विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, वाचनाची सवय आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास जवळेकर, मुख्याध्यापक मिरगी उपस्थित होते.

## आ. राजेंद्र राऊत यांच्या विधान परिषदेत कांद्यासंदर्भात समस्यांवर मांडणी



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० जुलै-**

कांद्याच्या दरातील चढ-उतार, निर्यातबंदी आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीचा प्रश्न विधान परिषदेत उपस्थित करत आमदार राजेंद्र राऊत यांनी राज्य सरकारने दीर्घकालीन धोरण राबविण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. कांद्याच्या प्रश्नावर दर दोन वर्षांनी निर्माण होणारा गोंधळ थांबविण्यासाठी नियोजनबद्ध निर्णय घेण्याची मागणी केली.

आ. राऊत म्हणाले की, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत दररोज सुमारे ७०० ते ८०० ट्रक कांद्याची आवक होते. बार्शीतील माझ्या खासगी बाजार समितीत हंगामात दररोज सुमारे ३०० ट्रक कांदा दाखल होतो. सोलापूर, धाराशिव, बीड आणि मराठवाड्यातील मोठ्या प्रमाणातील कांदा या बाजारपेठांमध्ये येत असल्याने या भागातील शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणे आवश्यक आहे. निर्यातबंदीच्या निर्णयावर त्यांनी सांगितले की, अचानक निर्यातबंदी लागू केल्याने भारतावर अवलंबून असलेल्या परदेशी बाजारपेठा पर्याय शोधू लागतात. त्यामुळे भविष्यात निर्यातबंदी करावी लागलीच, तर ती नियोजनपूर्वक आणि टप्प्याटप्प्याने करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. यावर्षी कांद्याचे मोठे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना प्रतिकिलो किमान पाच रुपये अनुदान देण्याची मागणीही त्यांनी सरकारकडे केली. तसेच कांदा साठवणूक चाळींसाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

### रब्बी कांद्यासाठी प्रक्रिया उद्योगांची मागणी

रब्बी हंगामातील कांद्याचे उत्पादन वाचविण्यासाठी प्रक्रिया उद्योग उभारणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी कांदा पावडर आणि अन्य मूल्यवर्धित उत्पादनांसाठी उद्योग उभारण्यास केंद्र सरकारच्या सहकार्याने विशेष योजना राबविण्याची सूचना केली.

## एनडीपीएस प्रकरणातील तीन आरोपींना न्यायालयाकडून जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ जुलै-**

बार्शी शहर पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयामधील आरोपी सचिनकुमार मिरगणे यास अटकपूर्व जामीन, तर राजेशकुमार मिरगणे व पांडुरंग सोमनाथ सोनवणे यांना अतिरिक्त सत्र न्यायालय, बार्शी यांनी नियमित जामीन मंजूर केला.

बचाव पक्षातर्फे आरोपींचे नाव केवळ सहआरोपींच्या जबाबावरुन समोर आले असून त्यांच्याकडून कोणताही अमंली पदार्थ जप्त करण्यात आलेला नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला.

तसेच जप्त करण्यात आलेले गांजाचे प्रमाण हे 'स्मॉल क्वांटिटी' स्वरुपातील असल्याने एनडीपीएस कायद्यातील कलम ३७ लागू होत नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

आरोपींच्या वतीने अॅड. अक्षय बिडबाग व अॅड. एस. आर. मते यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरुन अतिरिक्त सत्र न्यायालय, बार्शी यांनी आरोपींना जामीन मंजूर करुन दिलासा दिला.

## सांगोल्यासाठी नीरा देवधर कालव्यातून १ टीएमसी पाण्याच्या कामाला गती

### माजी खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ११ जुलै-**

सांगोला तालुक्याच्या पाणीप्रश्नाच्या कायमस्वरूपी निराकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या नीरा देवधर कालवा योजनेतील १ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याच्या कामाला गती देण्याबाबत मंत्रालयात महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. यावेळी संबंधित १ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासन कटिबद्ध असल्याचे आश्वासन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.

माढ्याचे माजी खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जानेवारी २०२३ मध्ये राज्य मंत्रिमंडळाने नीरा देवधर कालवा योजनेत बाष्पीभवनामुळे होणाऱ्या पाण्याच्या बचतीतून १ टीएमसी पाणी सांगोला मतदारसंघासाठी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. त्या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने ही बैठक आयोजित करण्यात आली. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्वेक्षण अहवाल, प्रस्तावित कामाची तांत्रिक प्रक्रिया, निविदा प्रक्रिया आणि पुढील कामाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना सर्व प्रशासकीय आणि



तांत्रिक प्रक्रिया वेळेत पूर्ण करून कामाला गती देण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. बैठकीत सांगोला मतदारसंघासाठी नीरा देवधर कालव्यातून १ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासन कटिबद्ध असल्याचे सांगत, हे काम प्राधान्याने पूर्ण केले जाईल, असे आश्वासन विखे-पाटील यांनी दिले. याप्रसंगी आ.बाबासाहेब देशमुख, माजी आ.शहाजीबापू पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत तसेच निरा देवधर कालवा समितीचे अधिकारी वर्ग उपस्थित होते. माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नीरा देवधर कालव्यातून सांगोल्यासाठी १ टीएमसी पाणी मंजूर करण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला. आता या निर्णयाच्या अंमलबजावणीला गती मिळत आहे, ही सांगोल्याच्या जनतेसाठी दिलासादायक बाब आहे, असे जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.

### सांगोल्याच्या हक्कासाठी लढत राहणार

शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कासाठीचा हा लढा थांबणार नाही. विकासाच्या प्रत्येक प्रश्नावर देवाभाऊंसोबत खांद्याला खांदा लावून आम्ही उभे आहोत आणि सांगोल्याला त्याचा हक्क मिळवून देण्यासाठी आमचा संघर्ष अधिक जोमाने सुरू राहील.

**-चेतनसिंह केदार सावंत,** सोलापुर जि.प.शिक्षण व आरोग्य सभापती




## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात लोकसंख्या दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. ११ जुलै-**

करमाळ्याच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयांमध्ये अर्थशास्त्र व भूगोल विभागाच्या वतीने ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिमन्यू माने हे उपस्थित होते. त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याने काहीतरी कौशल्य विकसित करून देशासाठी योगदान दिले पाहिजे असे मत व्यक्त केले. यावेळी अर्थशास्त्र व भूगोल विभागातील विश्वंभर लांडगे, सलमा पठाण, शबाना पठाण, शुभम देशमाने व कृष्णा पवार या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. अंकुश करपे यांनी केले. कार्यक्रमासाठी भूगोल विभाग प्रमुख डॉ. विजया गायकवाड, मराठी विभाग प्रमुख प्रा. नितीन तळपाडे, हिंदी विभाग प्रमुख डॉ. विनायक खरटमल, प्रा. प्रमोद शेटे, प्रा. गौतम खरात, प्रा. सुधीर मुळीक, प्रा. हर्षद जाधव, प्रा. महेश जगताप उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर सुपेकर यांनी केले तर आभार अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. कृष्णा कांबळे यांनी मानले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वेळापूर पालखी तळावर जिल्हा प्रशासनाकडून मॉक ड्रिल

**वेळापूर, दि. ११ जुलै -**

वेळापूर ता. माळशिरस येथून श्री ज्ञानेश्वर माऊली यांची पालखी पंढरपूरकडे जात असते. वेळापुरात पालखी तळही आहे. त्या पार्श्वभुमीवर वेळापूर पालखी तळावर आज वारकरी सुरक्षेसाठी जिल्हा पोलिसांकडून मॉक ड्रिल घेण्यात आली.

वारी काळात पोलिसांकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येतो. याउपरही पालखी सोहळा दरम्यान काही अनुचित प्रकार होऊन भाविकांच्या जीवास धोका निर्माण झाल्यास अथवा काही सम ाजकंटकाकडून हल्ला झाल्यास त्यांना चोख प्रतिउत्तर



देऊन भाविकांची सुरक्षा करणे हा या मॉकड्रिलचा उद्देश होता. यावेळी क्विक रिस्पॉन्स टीम, आरसीपी, बीडीडीएस यासारख्या यंत्रणांकडून अशा कठीण प्रसंगांना सामोरे जाण्याबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्याबाबतच्या कार्यवाहीचे प्रात्यक्षिक, चाचणी यावेळी घेण्यात आली.



## पदभारापूर्वीच वारीसाठी १० कोटींच्या औषध खरेदीची चर्चा

### झेडपीच्या सभापतींकडून चौकशीचे संकेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील मुख्य औषध भांडाराच्या फार्मासिस्ट नियुक्तीवरून नवा वाद निर्माण झाला आहे. संबंधित फार्मासिस्टने अधिकृत पदभार स्वीकारण्यापूर्वीच आषाढी वारीसाठी सुमारे १० कोटी रुपयांच्या औषध खरेदी प्रक्रियेत सहभाग घेतल्याची बाबही चर्चेचा विषय ठरली आहे.

संबंधित नियुक्तीसाठी विभागीय आयुक्तांना चुकीची माहिती व प्रमाणपत्र सादर करून दिशाभूल केल्याचा आरोप होत आहे. परिणामी या नियुक्ती प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



जिल्हा परिषदेतून प्राप्त माहितीनुसार, जिल्हा परिषदेच्या मुख्य औषध भांडारात प्रमुख फार्मासिस्ट पद रिक्त झाल्यानंतर लीना पुजारी यांची नियुक्ती झाली. मात्र, या नियुक्तीसाठी आवश्यक अनुभव आणि बदलीसंदर्भातील अटी पूर्ण नसतानाही प्रशासनाने अनुकूल प्रमाणपत्र दिल्याचा आरोप होत आहे. यासाठी जिल्ह्यातील एका लोकप्रतिनिधीच्या शिफारशीचा आधार घेण्यात आल्याचीही चर्चा आहे.

आरोपानुसार, तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी संबंधित फार्मासिस्टला मुख्य औषध भांडाराचा अनुभव असल्याचे आणि बदलीसाठी आवश्यक अटी पूर्ण असल्याचे प्रमाणित केले. त्यानंतर प्रशासन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांनिशी हा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठवून मंजुरी मिळाली. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी यापूर्वी मुख्य औषध भांडारात काम केले नसल्याचा दावा होत असल्याने या प्रम ाणपत्राच्या सत्यतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

मुख्य औषध भांडारात अनुभवी सहाय्यक फार्मासिस्ट उपलब्ध असताना नव्याने नियुक्तीची गरज काय होती, असा सवालही उपस्थित होत आहे. या प्रकरणामुळे आरोग्य विभागातील नियुक्ती प्रक्रिया आणि प्रशासकीय निर्णयांबाबत पारदर्शकतेची म ागणी जोर धरू लागली आहे.

#### आवश्यक कारवाई केली जाईल

या प्रकरणाची माध्यमांतून चर्चा सुरू झाल्यानंतर गंभीर दखल घेतली आहे. नियुक्ती प्रक्रियेतील सर्व बाबींची चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल.

**- चेतनसिंह केदार सावंत, सभापती, जिल्हा परिषद आरोग्य व शिक्षण समिती.**

#### विभागीय आयुक्तांच्या स्तरावरील निर्णय

फार्मासिस्ट नियुक्ती ही पूर्वीच्या कालावधीतील असून विभागीय आयुक्तांच्या स्तरावरील निर्णय असल्याने भाष्य करणे उचित नाही.

**- सतीश कोपुरवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी.**

#### नियुक्ती चुकीच्या पद्धतीने झाली

लीना पुजारी यांनी आरोग्य केंद्रावर औषध निर्माण अधिकारी पदावर काम करत असताना जिल्हा औषध भांडार येथे भांडारपाल पदाचा कार्यभार सांभाळल्याचे सांगून वरिष्ठांची दिशाभूल केली आहे. शिवाय ज्येष्ठता यादीत माझा २५ वा क्रमांक असताना ३६ व्या क्रमांकावरीत पुजारी यांना कशी नियुक्ती मिळू शकते? त्यांची नियुक्ती चुकीच्या पद्धतीने झाली आहे.

**- प्रवीण नडगिडे, औषध निर्माण अधिकारी**

#### विभागीय आयुक्तांकडून नियुक्तीचे आदेश

मी यापूर्वी घेरडी, वळसंग व अनगर प्राथमिक आरोग्य केंद्रात सेवा केली आहे. औषध भांडार येथे वरिष्ठ औषध निर्माण अधिकारी पदावर माझी नियुक्ती नियमानुसार झाली आहे. विभागीय आयुक्तांनी याबाबत आदेश काढले आहेत. वरिष्ठ औषध निर्माण अधिकारी पदावर असलेले सोळंकी हे निवृत्त झाले आहेत. त्यांनी मी या ठिकाणी काम करू नये, यासाठी साडेसहा महिने मला पदभार दिला नाही.

**- लीना पुजारी, औषध निर्माण अधिकारी**

## पंढरपुरात पाच नवीन एसटी बस दाखल

### आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ जुलै-**

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर आगारात ५ नवीन राजम ाता जिजाऊ बस दाखल झाल्या आहेत. नवीन बसचे लोकार्पण आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी आमदार समाधान आवताडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसमवेत एसटीतून प्रवास केला.

यावेळी पंढरपूर पंचायत समि तीचे सभापती शुभम आगावणे, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, आगारप्रमुख योगेश लिंगायत, विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, सांगोला स्थानक प्रमुख पंकज तोंडे, नगरसेवक संजय बंदपट्टे, माजी नगरसेवक किरणराज घाडगे, लखन चौगुले, विनोद लटके, द्रोणाचार्य हाके, विनोद सुरवसे, बशीर तांबोळी, आमीन शेख यांच्यासह एसटी महामंडळाचे अधिकारी,



#### वारकऱ्यांना चांगली सेवा मिळेल

नव्याने दाखल झालेल्या पाच राजमाता जिजाऊ बसमुळे यात्रेच्या काळात प्रवाशांना अधिक चांगली सेवा मिळेल. पंढरपूर आगाराची वाहतूक क्षमता वाढेल.

**- आमदार समाधान आवताडे**

कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.

आषाढी यात्रेत पंढरपूरकडे जाणाऱ्या विविध मार्गांवर अतिरिक्त बससेवा सुरू करण्यात येत असून नव्याने दाखल झालेल्या एसटी बसेसमुळे भाविकांची आणि स्थानिक नागरिकांची सोय होणार आहे. यात्रेदरम्यान वाढणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाने आवश्यक नियोजन केले असून या बस त्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत. याचबरोबर स्थानिक नागरिकांची ही सोय होणार आहे.

## वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी समन्वयाला प्राधान्य

### सदाशिव पडदुणे; पंढरपुरात नोडल अधिकाऱ्यांची आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जुलै -**

आषाढी वारीत वारकऱ्यांची आरोग्य सेवा अधिक प्रभावी, तत्पर आणि समन्वयपूर्ण राहावी या उद्देशाने शुक्रवारी पंढरपूर येथील आय.एम.ए. हॉलमध्ये नोडल अधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सहाय्यक संचालक डॉ. मोहन शेगर, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शिबीर नोडल अधिकारी सदाशिव पडदुणे यांनी वारीच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून कार्य करावे, वारकऱ्यांना वेळेत आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याची सुचना दिली. बैठकीत आरोग्य सुविधांचे सूक्ष्म नियोजन करून प्रत्येक यंत्रणेला जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या.

पालखी मार्गावरील आरोग्य केंद्रे, तात्पुरती वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका सेवा, आवश्यक औषधसाठा, उष्माघात व संसर्गजन्य आजारांवरील प्रतिबंधात्मक उपाययोजना, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता आणि स्वच्छता व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गर्दीच्या ठिकाणी त्वरित वैद्यकीय मदत उपलब्ध होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले. याशिवाय, प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रातील तयारीचा अहवाल सादर केला. संभाव्य आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी समन्वय यंत्रणा अधिक सक्षम करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला.

पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा आणि नागरी सुविधांबाबत तयारीची माहिती दिली.

#### *सर्व विभागांच्या समन्वयाच्या जोरावर वारी निर्विघ्न पार पाडण्याचा निर्धार*

वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी पूर्वतयारीला गती दिली आहे. विभागांमधील समन्वयाच्या जोरावर वारी निर्विघ्न पार पाडण्यात येईल.

**- सदाशिव पडदुणे, उपविभागीय अधिकारी तथा शिबीर नोडल अधिकारी**



*पांडुरंग हरी, विठ्ठल हरी हरी*
*जय जय हरी।*
*मुखे बोला हरी हरी।।*
*हरी मुखे म्हणा, हरी मुखे म्हणा।*
*पुण्याची गणना, कोण करी।।*
*पाप पर्वताचा, होईल लवलेश।*
*जाईल दुःख, सर्वकाळचे।।*
*तुका म्हणे, सोपे आहे सर्व जण।*
*वाचे नारायण, सदा बोला।।*

## वारकऱ्यांच्या सेवेसाठी नगरपंचायत प्रशासन सज्ज

### माळशिरस नगराध्यक्ष रघुनाथ चव्हाण यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ११ जुलै -**

श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २० रोजी माळशिरस येथे एक दिवसीय मुक्काम ासाठी येत आहे. वारकऱ्यांना सेवा सुविधा देण्यासाठी माळशिरस नगरपंचायत प्रशासन सज्ज झाल्याची माहिती नगराध्यक्ष रघुनाथ चव्हाण यांनी दिली.

यावेळी मुख्याधिकारी सुमित जाधव कर अधिकारी अविनाश काळाने उपस्थित होते.

पालखी मुक्कामाच्या अनुषंगाने पालखी विसावा कट्ट्याची रंग रंगोटी केली जात आहे. तळाची जागा मुरूम टाकून समतल केली जात आहे. भाविकांच्या सुविधेसाठी पालखी तळावर भव्य मंडप, दर्शन रांगेची व्यवस्था आणि आकर्षक स्वागत कमान उभारली जात आहे. जलरोधक मंडप ३९०० चौ.फुटावर उभारली जात आहे.

त्यापैकी पालखी तळ ३००० चौरस फूट व मदत केंद्र, आरोग्य केंद्र व हिरकणी केंद्र ९०० चौरस फूट अशी व्यवस्था केली आहे. पालखी तळावर भाविकांसाठी आपत्कालीन मदत केंद्र आणि महिलांसाठी हिरकणी कक्ष उभारण्यात येत आहे.आरोग्याची काळजी घेण्यासाठी तात्पुरते प्रथमोपचार आरोग्य सेवा पथक (केंद्र) कार्यरत केले जाणार आहे.

पालखी तळावर तोट्या बसवून पिण्याच्या पाण्याची सोय करणार आहे. शहरात विविध ८ ठिकाणी वारकऱ्यांसाठी पाण्याचे टँकर भरून देण्याची व्यवस्था केली आहे. पाण्याचे स्रोत शुद्ध ठेवण्यासाठी क्लोरिनेशन करत आहे.



**माळशिरस येथे पालखी तळावर स्वच्छता मोहिमेची पाहणी करताना नगराध्यक्ष रघुनाथ चव्हाण.**

**स्नानगृह व तात्पुरते शौचालय:** महिला भाविकांसाठी तात्पुरती स्नानगृहे व अंघोळीच्या पाण्याची व्यवस्था केली आहे. याशिवाय शहर व पालखी तळ परिसरात विविध १७ ठिकाणी तात्पुरती शौचालये ठेवली जाणार आहेत. त्यांच्यातून १८०० शौचालयांची संख्या ठेवली आहे.

**स्वच्छता मोहीम:** नगरपंचायतीच्या सफाई कर्मचाऱ्यांमार्फत संपूर्ण तळाची स्वच्छता, शहरातील रस्ते व नाले सफाई करण्यात येते. दुर्गंधीनाशक पावडरची फवारणी केली जाणार आहे.

**दिवाबत्ती व जनरेटर:** पालखी तळावर व संपूर्ण शहरात पुरेशी दिवाबत्तीची कामे सुरु आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यास अतिरिक्त बॅकअप म्हणून जनरेटरची सुविधा दिली जाते. सुरक्षेच्या दृष्टीने आपत्कालीन मदत केंद्र आणि पालखी तळावरील विविध संवेदनशील ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत.

**रस्ते दुरुस्ती व दिशादर्शक :** पालखी मार्ग व शहरातील रस्त्यांवरील खड्डे मुरूम टाकून बुजवण्यात येत आहेत. पालखी मार्गावर भाविकांच्या मार्गदर्शनासाठी दिशादर्शक फलक लावले आहेत.

## वारकऱ्यांच्या सेवेसाठी झेडपी अधिकारी व्यस्त

### पालखी मार्गावर निवास, स्वच्छता आणि पाणीपुरवठ्याची चोख व्यवस्था

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जुलै-**

आषाढी वारी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी सोलापूर जिल्हा परिषदेची यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत झाली आहे. पालखी मार्गावरील मुक्कामस्थळांवर निवास, स्वच्छता, पिण्याचे पाणी, स्नानगृहे आणि आरोग्य सुविधांची व्यापक व्यवस्था केली आहे.

यंदा पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील पालखी मार्गावरील मुक्कामस्थळांच्या सुविधांची जबाबदारी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हा परिषदेकडे सोपविली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद प्रशासनाने नियोजनबद्ध पद्धतीने कामाला सुरुवात केली असून वारकरी सेवेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

पालखी मुक्कामस्थळी वारकऱ्यांसाठी प्रशस्त जर्मन हँगर, स्वच्छ स्नानगृहे, मोबाईल टॉयलेट, शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी टँकर, मोबाईल चार्जिंग पॉईट, भजन-कीर्तनासाठी आवश्यक सुविधा, हिरकणी कक्ष, आरोग्य सेवा, स्वागत कमानी आदी सर्व सुविधा उपलब्ध केल्या आहेत. त्यामुळे वारकऱ्यांच्या मुक्कामाची व्यवस्था अधिक सुकर आणि सुरक्षित झाली आहे. सर्व सुविधा वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी अहोरात्र कार्यरत आहेत.

#### पंढरपुरात अधिकाऱ्यांची तपासणी

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली पाणी व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक अमोल जाधव यांच्या नेतृत्वाखालील पथक सातत्याने कामाचा आढावा घेत आहे. लोणी-काळभोर, यवत आणि सासवड येथील मुक्कामस्थळांना भेट देऊन प्रत्यक्ष सोई सुविधा तपासल्या तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.



## आरोग्य विभागाकडून ९.९४ लाखांच्या जनजागृती साहित्याची छपाई

### वारकऱ्यांपर्यंत आरोग्यविषयक संदेश प्रभावीपणे पोहोचवणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जुलै-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागाने व्यापक तयारी पूर्ण केली आहे. वारकऱ्यांपर्यंत आरोग्यविषयक संदेश प्रभावीपणे पोहोचावा यासाठी जवळपास ९ लाख ९४ हजार ७५६ रुपयांच्या जनजागृती साहित्याची छपाई केली आहे. त्याचबरोबर आवश्यक औषधांचा मोठा साठा उपलब्ध करून दिला आहे.

आरोग्य विभागाकडून सोलापूर, पुणे आणि सातारा या जिल्ह्यांसाठी बॅनर, स्टिकर्स, पोस्टर्स, कर्मचाऱ्यांसाठी आयकार्ड तसेच माहितीपत्रके तयार केली आहेत. सुमारे ५.६७ लाख रुपयांचे बॅनर, ८६ हजार रुपयांचे पोस्टर्स, १.९३ लाख रुपयांची आयकार्ड



छपाई, १.४२ लाख रुपयांचे स्टिकर्स आणि १.५७ लाख रुपयांची माहितीपत्रके तयार केली आहेत. यातून उष्माघात, पाणीजन्य आजार, स्वच्छता, संसर्गजन्य रोग आदींबाबत जनजागृती करणार आहे. ताप, अंगदुखी, अतिसार आदी आजारांवरील औषधांचा मोठा साठा केला आहे. डेंग्यू, मलेरिया आणि इतर संसर्गजन्य आजारांवरील उपचारासाठी आवश्यक औषधांसह त्यांचे नियोजन, साठवण, पुनर्भरण आणि वितरणासाठी स्वतंत्र नियंत्रण व्यवस्था कार्यरत आहे. कोणत्याही वारकऱ्याला औषधांच्या कमतरतेमुळे उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी विशेष दक्षता घेतली आहे. आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माण अधिकारी आणि कर्मचारी २४ तास सेवेत राहणार आहेत. हृदयविकाराचा झटका, सर्पदंश, ॲनाफायलॅक्सिस आदी आपत्कालीन परिस्थितींवर तातडीने उपचारासाठी यंत्रणा सज्ज आहे.

#### आपत्कालीन परिस्थितीसाठी मुबलक औषधे

ॲड्रेनालिन इंजेक्शन, ॲट्रोपीन इंजेक्शन, डेक्स्ट्रोज (ग्लुकोज) द्रावण, हायड्रोकॉर्टिसोन इंजेक्शन, फ्युरोसेमाइड इंजेक्शन, कॅल्शियम ग्लुकोनेट इंजेक्शन, सोडियम बायकार्बोनेट इंजेक्शन, सेफ्ट्रियाक्सोन प्रतिजैविक इंजेक्शन, शिरामार्गे दिली जाणारी द्रवद्रव्ये (आयव्ही फ्लुइड्स) आणि ऑक्सिजन यांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. निदानासाठी हेपटायटिस-बी (एचबीएसएजी) तपासणी किट, व्हीडीआरएल तपासणी किट, सर्पदंश निदान किट, नेब्युलायझर, रक्तातील साखर मोजण्याचे ग्लुकोमीटर व ग्लुकोमीटर स्ट्रिप्स उपलब्ध केल्या आहेत. तसेच वारकऱ्यांसाठी ट्रिपल लेयर मास्क आणि हँड सॅनिटायझर यांचाही पुरेसा साठा केला आहे.